
ऑक्टोबर – १९८५ किंमत दोन रुपये

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑक्टोबर-१९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

**श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक**

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए., पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---


**वर्ष ६६ वे ]** **किंमत २ रुपये** **[अंक ७**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

– कार्यालय –

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.



**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

३०

आवडिने नाम जपा जन्मोजन्मीं नये धोका ॥
सांईनाथ गुरु माझे आई मजला ठाव द्यावा पायीं ॥
सांईनाथ सद्‌गुरुनाथ बहु अपराधी घ्या पदरांत ॥
शरण जाई सांईनाथा चरणावरी ठेवी माथा ॥

३१

वंदन करि चरणा । गुरु हो ॥धृ.॥
हृदयाकाशीं वास करोनी । जीवविलें या दिना ॥गुरु.॥
अगम्य सृष्टी पाहुनि नयनीं । विस्मय वाटे मना ॥गुरु.॥
मोह भरला सर्वांठायीं । प्रबल होति वासना ॥गुरु.॥
भावें प्रेमें करितों सेवा । सार्थ करीं जीवना ॥गुरु.॥

३२

वरपांगी नाम घेतां । देव कैसा येई हाता ॥
घडे जैशी हो करणी । तैशी जडलीं भोगणीं ॥
बोल देतो कोण वृथां । बसल्या जागीं खाई लाथा ॥
हृया दृव जरि कां सुटे । तरीच सद्‌गुरु तया भेटे ॥

३३

शांतिसुखाचा सागर । बाप सांई गुरुवर ॥
कृपा साधाया विचार । भक्ति लागे निरंतर ॥
अघटित गुरुची करणीं । अनुभवी तोची जाणीं ॥
मना जाण रे ही मात । सांई-पायीं लावीं चित्त ॥


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख/कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | श्री साईबाबांची महासमाधी | — श्री. मु.ब. निंबाळकर | ७ |
| ३ | आशिष घ्याया | — श्रीमती श्री शहाणे | ११ |
| ४ | श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि.बा. खेर | १२ |
| ५ | मी पाहिलेले साईबाबा–१ | — सौ. सरोजिनी मुळये | १७ |
| ६ | श्रद्धेचा आविष्कार | — सौ. कल्पना मंगेश कोरडे | १९ |
| ७ | माझा साई | — श्री. किशोर तारे | २० |
| ८ | साई दरबारातील माणिक आणि मोती – ३ | — साईनंद | २१ |
| ९ | झंकारत ही वीणा | — श्री. नारायण चिपळूणकर | २५ |
| १० | श्री साईबाबा आणि दादा महाराज पाटगांवकर | — सौ. सुनदा एच्. दैवज्ञ | २६ |
| ११ | अध्याय तेरा | — डॉ. सुमन खानवीलकर | ३० |
| १२ | कोजागिरी | — सौ. उषा भास्कर जोशी | ३३ |
| १३ | अनुपम अनुग्रह | — सौ. उषा अधिकारी | ३४ |
| १४ | श्री साईबाबांचा पैसा (२) | — श्रीमती शालिनी देसाई | ३६ |
| १५ | ॐ नमो गुरु दत्तात्रेयाय | — श्री. शशिकांत पाठक | ३९ |
| १६ | आत्मकल्याण | — सौ. निर्मला चि. राजे | ४३ |
| १७ | साईगणेशाचे गाणे | — श्री. महेन्द जनार्दन गुरव | ४५ |
| १८ | साईनाम सोपे हे | — सौ. भावना दामोदर जेऊरकर | ४६ |
| १९ | सदा मनी बाबा साई | — सौ. भारती म. मोघे | ४७ |
| २० | भविष्यकाळ आणि साईसंदेश | — श्री. शं.ल. अवधूत | ४८ |
| २१ | श्री साईनाम | — श्री. मनोज शंकर बेंद्रे | ५० |
| २२ | श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | ५२ |
| २३ | येणे सोपे टिकणे कठीण | — श्री. अनिल केशवराव रसाळ | ५४ |
| २४ | साई तव कृपेने फुलू दे मम जीवन | — श्री. रमाकांत पंडित | ५६ |
| २५ | पू. नानासाहेब ठोसर उर्फ श्री. नारायणाश्रम स्वामी | — श्री. व्ही.के. शेंडे | ५७ |
| २६ | ज्याच्या पाठी श्री साई, जगी त्यासी भय नाही | — श्री. नंदू लक्ष्मण पाटील | ६० |
| २७ | शिरडी वृत्त – जुलै १९८७ | — | ६१ |

# आकाशात तारका शिरडीत द्वारका
# साईबाबासारखा देव नाही, देव नाही

## संपादकीय



संतचूडामणी भगवान श्री साईबाबांच्या ६९ व्या पुण्यतिथीस त्यांच्याच "श्री साईलीला" या मासिकाचा हा अंक प्रकाशित होत आहे, हा केवळ एक योगायोग आहे. त्यांचे हे मासिक एकावेळी मर्यादित प्रसारित होते पण आज तसे नाही. ते जगभर प्रसारित असून, जिथे जिथे साईभक्तीचा प्रसार-प्रचार झालेला आहे. तिथे तिथे मोठ्या भक्तीभावाने वाचले जाते. भगवंताच्या या मासिकाची त्यांचे भक्त आतुरतेने वाट पाहात असतात.

अनेक साधुसंतांच्या वास्तव्याने पुण्य पावन झालेला असा आमचा हा भारत आहे. जनतेत दैवी संदेश पसरविण्यासाठी व मानव जातीची दुःख तापापासून मुक्तता करण्यासाठी साधुसंतांच्या रुपाने भगवान या अवनीतलावर वेळोवेळी अवतार घेऊन येत असतात.

स्वतः श्रीकृष्ण भगवंतानी गीतेत सांगूनच ठेवलेले आहे की, "मी जन्मातीत, रंगरुपातीत असलो तरी मानव जातीसंबंधाने वाटणाऱ्या अनुकंपेमुळे मी वेगवेगळ्या रुपाने या भूतलावर अवतीर्ण होत असतो. ज्या ज्या वेळी सद्‌गुणांचा लोप होऊन दुर्गुणांचे प्राबल्य माजू लागते, नीतीची जागा अनीतीने घेतली जाते, त्या त्या वेळी धर्माचे व नीतीचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी, सुरळीतपणाने मार्गावर येण्यासाठी म्हणून मी मानव रुपाने जन्म घेत असतो. मला दुष्टांचे निर्दालन करुन धर्माचे राज्य प्रस्थापित करावयाचे असते. यासाठी मी युगायुगातून वेगवेगळ्या रुपांनी या जगात आलो आहे." श्री साईनाथ महाराज हे अशा अवतारी महापुरुषांपैकी एक आहेत, यात शंकाच नको.

अहमदनगर जिल्ह्यातील एका खेड्यात श्री बाबा एका सोळा वर्षे वयाच्या मुलाच्या रुपाने अवतीर्ण झाले. त्यांचा जन्म केव्हा व कुठे झाला व त्यांचे मातापिता कोण होते, हे आजवर निश्चितपणे कुणालाही सांगता आलेले नाही. ते अजूनही एक गुपितच आहे. संत कबीरदासजींच्या बाबतीतही हेच नेमके घडलेले आहे.

एक षोडश वर्षीय मुलगा या नात्यानेही त्यांनी जवळपासच्या लोकांनी थक्क व्हावे असे गुण प्रकट केले. अध्यात्मिक दृष्ट्या ते परिपूर्णतेला पोचलेले होते, त्यामुळे त्यांच्या ठायी कितीतरी दैवी गुणांचा समन्वय साहजिकपणे झालेला होता. लोकांनी देवावर श्रद्धा ठेवावी व त्याची मनोभावे भक्ती करावी या हेतूने त्यांनी प्रसंगोपात

कितीतरी चमत्कार करुन दाखविले. लोकांची दु:खे नाना प्रकारची होती. कुणाला काय तर कुणाला काय हवे होते. त्यांना जे जे हवे होते, ते ते त्यांनी त्यांच्या पदरात टाकले. परंतु त्यात त्यांचा एक अंतीम हेतू होता. तो कोणता? आपल्याकडे येणाऱ्या भक्तांनी ईश्वराभिमुख व्हावे. त्यांनी भगवंताची भक्ती करुन, नामस्मरण करुन आपले कोट-कल्याण करुन घ्यावे.

श्री साईनाथ महाराजांचे साठ वर्षांपेक्षा अधिक काळ शिरडीत वास्तव्य होते. त्या काळात हजारो लोकांची दु:खे व त्यांच्या वाट्यास आलेले दैन्य दूर करण्याचा उद्योग त्यांनी अखंड चालविला होता. त्यांची भक्ती मार्गाची शिकवण देशाच्या निरनिराळ्या भागात वाऱ्याप्रमाणे पसरत गेली. त्यामुळे असंख्य लोकांची दु:खे दूर झाली. दु:खितांना जरुर असलेला दिलासा व आसरा मिळाला. ते देहधारी होते. त्या काळात त्यांच्या भक्तांनी देवसदृश श्रद्धा त्यांच्या ठायी ठेवली व त्यांची कृपा संपादून आपापले कल्याण करुन घेतले. आजही श्रींचे दर्शन सौख्य घेतलेले भाग्यवान आहेत, हयात आहेत, ते पण हेच सांगतात. सध्या हयात असलेल्या अशा भाग्यवंतांच्या आठवणी या अंकापासून आम्ही मुद्दाम प्रकाशित करीत आहोत. त्याचा उद्देश हाच की, श्रींचे सामर्थ्य किती प्रभावी आहे, होते हेच समजावून घेणे हा होय. जे जे कुणी साधक या नात्याने त्यांच्या सन्निध आले, त्यांचा मार्ग बाबांच्या शब्दाने व प्रेरणेने निष्कंटक झाला. आणि बाबांनी नश्वर शरीराचा त्याग केल्यानंतर तरी काय? पडद्याआड राहून, अदृश्य रुपाने त्यांनी आपल्या प्रेमळ भक्तांचे पूर्वी प्रमाणेच त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य, ते आजही करीत आहेत. त्यांनी महासमाधी घेतलेल्यास आता ६९ वर्षाचा काळ मागे पडला आहे. अशावेळी त्यांच्या उज्ज्वल व कल्याणकारक शिकवणूकीचा आपण सर्वांनीच विचार व आचार करणे अत्यंत जरुर आहे.

श्री संत साईबाबांची शिकवण अत्यंत साधीसुधी व आचरणात आणण्यास सुलभ सोपी आहे. आपल्या भक्तांना त्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने त्यांनी जे काही सांगितले, त्यात अवघड किंवा समजण्यास कठीण असे काहीच नाही. आपल्या उद्योगात सतत राहाणे, ज्ञान संपादन करणे, या जगात वावरत असताना सर्वांशी बंधुभावाने व प्रेमाने वागणे व आपल्या अध्यात्मिक कल्याणासाठी अहर्निश झटणे. आपल्यापुढे शूद्र भावनांना उभे राहता येऊ नये. आपण नेहमी उच्च व पवित्र वातावरणात विहार करावा. श्री साईंच्या मते धर्म कोणता? पूजा अर्चा, ध्यान याच गोष्टी नव्हेत. तर त्याही पेक्षा महत्वाचे आणखीन काही तरी आहे. आम्ही सदाचारी बनले पाहिजे. दुष्ट भावनांना तिलांजली दिली पाहिजे. आपल्या दैनंदिन वर्तनात धर्म आढळून आला पाहिजे. कोणताही धर्म हलका किंवा दूषणावह नाही. प्रत्येकाने दुसऱ्याची किंवा दुसऱ्याच्या धर्माची निंदा न करता, स्वधर्मातच राहून व स्वत:चे वर्तन सुधारुन आपले नवकोट कल्याण करुन घेतले पाहिजे.

सध्याच्या या अतिशय दगदगीच्या व धकाधकीच्या जमान्यात श्रींच्या या शिकवणूकीचे महत्व अपरंपार आहे. प्रत्येकाने आपल्या परिस्थितीनुरुप वाट्यास जे कर्तव्य आलेले आहे, ते मनापासून प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी झटावे, व आपले

जीवन वाट्यास जे आले आहे, तो व्यवसाय चोखपणे करावा. आळस हा महारोग आहे. तो आत्मनाश करणारा आहे. त्याचा आपण त्यागच केला पाहिजे. या जगातच नव्हे तर परलोकातही आपले जीवन आनंदाचे व सुखासमाधानाचे जावे, असे आपणास वाटत असेल तर, आपण साऱ्या दुष्ट वासनांचा त्याग करुन जीवनात सर्वंकष पावित्र्य व मंगलता निर्माण केली पाहिजे.

श्री साईमहाराज आपल्यात वावरत होते त्यावेळी आपल्या सतकृत्यांनी व सद्बोधामृताने त्यांनी आपल्या वरील शिकवणूकीचा प्रसाद केला. ते देहाने आज आपल्यात नसले तरी ते आपल्यांतून निश्चितच गेलेले नाहीत. आजही अदृश्य रुपाने आपल्या भक्तांना ते जरुर ती प्रेरणा देत आहेतच. व त्यांचेकडूनच आपले कार्य करवून घेत आहेत.

आज श्री साईनाथ महाराजांच्या ६९व्या पुण्यतिथी निमित्य आपण सारेच भक्तगण एकत्र जमून महाराजांचे त्रिवार स्मरण करुया, त्यांना लाख लाख प्रणाम प्रदान करु या. आणि त्यांची शिकवण आचरणात आणून आपले कल्याण साधू या. त्यातच आपले व आपल्या जन्मभूमीचे कल्याण आहे. आणि म्हणूनच साईबाबांसारखा देव नाही असे पुन्हा पुन्हा म्हणावेसे वाटते.

## ऑल इंडिया साईसमाज, मद्रास
## रौप्यमहोत्सवी अधिवेशन – १९८८

ऑल इंडिया साईसमाज, मद्रास या प.पू. नरसिंह स्वामीजींनी स्थापन केलेल्या विश्वविख्यात संस्थेतर्फे दरवर्षी अखिल भारतीय पातळीवर साईभक्तांचा मेळावा भरविला जातो. येत्या जानेवारी १९८८ मधे या संस्थेतर्फे साईभक्तांचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन भरविले जाणार असून त्याची जोरदार तयारी आतापासूनच सुरु झालेली आहे. जगातील ठिकठिकाणाहून साईभक्त मुद्दाम या रौप्यमहोत्सवी अधिवेशनास हजर रहाणार आहेत. ज्या साईभक्तांना या अधिवेशनाचे निमित्याने सुचना करावयाच्या असतील त्यांनी त्या त्वरीत श्री. मानद सचिव, ऑल इंडिया साईसमाज मैलापूर मद्रास-६०० ००४ येथे पाठवाव्यात

## शिरडी येथील
## श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव गुरुवार ता. १-१०-१९८७ ते रविवार ता. ४-१०-१९८७ असे चार दिवस साजरा होईल असे कार्यकारी अधिकारी श्री. रा.द. बन्ने हे कळवितात.

# श्रीसाईबाबांची महासमाधी

**ले. कर्नल मु.ब. निंबाळकर**
(निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्,
बंड गार्डन रोड, पुणे-४११००१.

श्रीसाईबाबा शके १८४० मिती आश्विन शुद्ध १० मंगळवार,ता. १५ ऑक्टोबर १९१८ रोजी दुपारी २-३० वाजण्याचे सुमारास समाधिस्थ झाले,हे प्रसिद्धच आहे. तसे श्रीसाईसच्चरितात आणि शिरडीत समाधीच्या पायरीवर लिहिलेले आहे. परंतु अध्याय ४३ चे शेवटी वर्णन केल्याप्रमाणे,शिरडीचे ग्रामजोशी लक्ष्मणमामा यांना पहाटे दृष्टांत देऊन,काकड आरती करण्यास कोणत्या दिवशी सांगितले,तसेच बाबांचा देह बुट्टींच्या वाड्यात देऊळाच्या गाभाऱ्यात केव्हा व कधी ठेवण्यात आला,याबद्दल निश्चित कल्पना कोणाला नाही.

लक्ष्मणमामांच्या स्वप्नाबद्दल व त्यांनी केलेल्या काकड आरतीबद्दल,एकदा मी कै. बाळा गुरव यांना विचारले असता,त्यांनी बुधवार ता. १६ सांगितली,तर कै. बाप्पाजी रत्नपारखी यांच्या श्री. प्रभाकर कोलमकर यांनी घेतलेल्या मुलाखतीत (श्री साईलीला ऑक्टोबर १९८२) गुरुवार ता. १७ म्हटले आहे.

तसेच श्रीसाईसच्चरित अध्याय ४३ च्या खालील ओवीत:-

मग पुढें तें कलेवर । कुठें असावें या विषयावर ।
होऊनि **छत्तीस तास** विचार । घडलें होणार जें होतें ॥१५५॥

बाबांनी देहत्याग केल्यावर,तो कोठे व कोणत्या प्रकारे ठेवावा,याचा विचार विनिमय ३६ तास चालला होता,असे म्हटले आहे. हे ३६ तास गुरुवार ता. १८ रोजी पहाटे २-३० वाजता संपतात,म्हणजे बाबांचा देह सुमारे ४० तासानंतर गुरुवारी दिवसा वाड्यात ठेवला गेला असावा,असे होते. परंतु त्यावेळी प्रत्यक्ष हजर असणाऱ्या शिरडीतील काही व्यक्तींना (कै. बाळा गुरव, कै. बाप्पाजी रत्नपारखी, कै. मार्तंड नागरे) मी विचारले असता, त्यांनी बाबांचा देह दुसऱ्याच दिवशी,म्हणजे बुधवारी ता. १६ लाच वाड्यात ठेवला गेला,असे सांगितले.

वरील शंकेबद्दल काही निश्चित पुरावा मिळावा म्हणून मी प्रयत्न करत असताना, मला श्रीसाईलीलेच्या १ ल्या वर्षातील अंक ११ व्याच्या (पौष शके १८४५) पृष्ठ ७८-८१ वर प्रसिद्ध झालेले (श्रीमान बापूसाहेब बुट्टी यांचे जावई) श्री. गणेश गोविंद नरके एम.ए. (कलकत्ता) एम.एस.सी. (मँचेस्टर) यांनी दि ऑनरेबल श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे,ॲडव्होकेट,अमरावती यांना शिरडीहून ता. ५-११-१९१८ रोजी लिहिलेले पत्र वाचण्यास मिळाले, ज्यात वरील दोन्ही प्रसंगांबद्दल अगदी स्पष्ट व निश्चित माहिती मिळते. ती वाचकांना उपलब्ध व्हावी म्हणून व त्यातील बाबांच्या आजाराचे, देहत्यागावेळचे व त्यानंतरच्या उहापोहाचे वगैरे सविस्तर वर्णन वाचकांना आवडेल म्हणून ते पत्रच खाली उद्धृत करत आहे :-

शिरडी ता. ५ नोव्हेंबर १९१८

श्री. दादासाहेब यांस

कृ. अ. शि. सा. न. वि. वि. आपण नागपूरला चि. केशवरावला पाठविलेलें पत्र त्यांनी इथें ती. बापूसाहेबांकडे पाठविलें व तत्संबंधीं माहिती बापूसाहेबांचे सांगण्या वरून आपणास देत आहें.

सप्टेंबर अखेर माझी पुण्याचे नोकरीची टर्म संपल्यावर मी इथें ता. २ आक्टोंबरला आलों. त्या वेळीं श्रीसमर्थ आजारीच होते. ता. २८ सप्टेंबरचे सुमारास श्रींना ताप आला, व त्यानंतर सतरावे दिवशीं श्रींनीं देह ठेविला. ज्वर २/३ दिवसच होता. परंतु त्यानंतर प्रायोपवेशन केल्याप्रमाणें श्रींनीं अन्न वर्ज केलें. त्यामुळें दिवसें दिवस शरीरांत शक्ती मुळीच राहिली नाही. समर्थांचे कांही कांही उद्‌गार निर्याणसूचक होते. परंतु ते कोणाच्याच लक्षांत आले नाहींत. बाहेरील मंडळीपैकीं ज्वर आला तेव्हां फक्त काकासाहेबच इथें होते. परंतु लवकरच त्यांना आपण होऊन मुंबईस पाठऊन दिलें. पुढें समर्थांचे प्रकृतीचें वर्तमान ऐकून ते पुन्हा निर्याणाचे पूर्वी ३/४ दिवस एथें आले. १॥-२ वर्षापासून नानासाहेब निमोणकर श्रीसमर्थांचे निकट राहून रात्रंदिवस सेवा करीत असत हें आपणांस माहिती असेलच. ह्याशिवाय, बुटी, जोग, भाटे, माधवराव वगैरे मंडळी शिरडीस होती. श्रीसमर्थांचे दिवसांतून दोन वेळ लेंडीवर, गांवांत भिक्षेला जाणें वगैरे क्रम, शरीर अगदी विकळ होईपर्यंत चालूच होते. तसेंच चावडींत जाणें वगैरे कायमच होतें. श्रीसमर्थ फेरी वगैरेला पायांनींच जात. परंतु दोन्ही बाजूला धरणारांना (बापू साहेब बुटी व निमोणकर) बहुतेक श्रींना उचलूनच न्यावें लागे. पुढें निर्याणाचे पूर्वी १।२ दिवस ह्या फेऱ्या व सकाळची भिक्षा वगैरे बंद झाली. श्रीसमर्थ "चिंता करूं नका" वगैरे म्हणून सर्वांना धीर देत असत. प्रयाणाचे वेळेचा पत्ता कोणालाच लागू दिला नाही. श्रीसमर्थ अखंड सावधान होते व शेवटले सेकंडापर्यंत सावधं होते व धीर देत होते. **मंगळवारी ता. १५ आक्टोंबरला दुपारचे आरतीनंतर** बापुसाहेब काकासाहेब वगैरे मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिलें. ही सर्व मंडळी मशिदींत श्रीसमर्थांबरोबर रोज जेवीत असत. ह्या दिवशी अशा रीतीने त्यांना घरोघर पाठवून आपण तिकडे इहलोक सोडून प्रयाण केलें. त्यावेळीं जवळ लक्ष्मीबाई (पाटलीण) बयाजी, भागूजी, बाळा शिंप्याचा लक्ष्मण, नानासाहेब निमोणकर व आणखीं कांहीं मंडळी हजर होती. माधवराव देशपांडे खालीं पायरीवर बसले होते. लक्ष्मीबाई पाटलीणीला खिशांतून कांहीं रुपये (९ रुपये) काढून दिले व थोड्या वेळानें म्हणूं लागले "अरे आतां मला इथें बरें वाटत नाहीं, वाड्यांत (बापूसाहेब बुटीचे दगडी वाड्याचा उल्लेख श्री "दगडी वाडा" "वाडा" ह्या शब्दाने करीत) घेऊन चला म्हणजे बरें वाटेल. हीच शेवटची आज्ञा व पुढें ह्याचप्रमाणें झालें, बयाजीचे अंगावर प्राण सोडला. श्रीसमर्थ नेहमी प्रमाणें बसलेलेच होते. सबंध दुखण्यांत श्रीसमर्थ बसूनच असत. चावडींत थोडा वेळच कायतो थोडे लांब होत असत. श्रींचा श्वास हलका होऊं लागला. भागूजींचे लक्ष गेलें व त्यांनीं नानासाहेब निमोणकर खालीं

बसले होते त्यांना सांगितलें. नानासाहेब पाण्याची झारी घेऊन समर्थांना पाणी पाजूं लागले तों पाणी तोंडांतून बाहेर येऊं लागलें त्या सरशी त्यांनी "देवा" म्हणून मोठ्यानें किंकाळी मारिली. श्रींनी एकदां डोळे उघडून पाहिलें व हलकेच "आ" म्हणून होकार दिला व प्रयाण केले. **मंगळवारी (ता. १५ ला) दुपारी २॥ चे सुमारास देह ठेविला.**

श्रींचे वाड्यांत नेण्याचे उद्गार लक्षांत घेऊन सर्वांनीं बापूसाहेब बुटीचे वाड्यात श्रींचा देह ठेवण्याचा बेत केला व त्याप्रमाणे देवळाचे गाभाऱ्यांत श्रींना समाधी देण्याकरितां खोदकाम सुरु झालें. सायंकाळी राहत्याहून फौजदार वगैरे आले व हाच निश्चय कायम झाला. जेथे श्रीगोपाळकृष्णाच्या मूर्ति स्थापण्याचा बेत होता तेथेंच श्रींची समाधी झाली. त्या मजबूत गाभाऱ्यांत खोदकाम रात्रभर चालू होतें. दुसरे दिवशी थोडें विघ्न आलें. सकाळी मुंबईहून अमीरभाई आले व कोपरगांवचे मामलेदारसाहेबही येऊन पोंचलें. फूट झाली. कांहीं मंडळी श्रींना बाहेर शेतांत घेऊन जाण्याविषयीं आग्रह धरुन बसली. मामलेदार साहेबांनी मतें घेतली, तेव्हां दोन विरुद्ध एकमते श्री. बापूसाहेबांचे वाड्यांत श्रींना ठेवण्याविषयी दिसून आलीं. मामलेदार साहेब नगरचे कलेक्टराकडे प्रकरण सोंपवूं लागले व त्याप्रमाणें काकासाहेब दीक्षित नगरला जावयास सिद्ध झाले. तेव्हां श्रीचे प्रेरणेनें विरुद्ध मंडळीनीं अनुकूल मतें देण्याचे ठरवून सर्वानुमतें बापूसाहेबांचे वाड्यांत समाधी करण्याचा बेत कायम झाला. **बुधवारी सायंकाळीं एकादशीचे दिवशी श्रींचा देह मिरवत आणून वाड्यांत देऊळाचे गाभारांत ठेवण्यांत आला.** त्या जागेला आलेली शोभा आतां प्रत्यक्ष येऊन पाहिल्याशिवाय कळायची नाहीं. देऊळाचे गाभाऱ्याची लांबीरुंदी सुद्धां असावी तेवढीच भरली. वाड्याचें काम हाती घेतलें तेव्हां श्रीसमर्थ इतकी पुढें शोभा करतील अशी कल्पनाच नव्हती. कल्पना होणार कशी? श्री नेहमीं म्हणत की "आम्ही वाड्यांत जाऊन राहूं?" परंतु श्री हयात असतांना कोणाला ही पुढची इच्छा व्हावी? वाड्यांत समाधीजवळ मन फार आनंदांत असतें. शिरडीत मनाला पूर्ववतच आनंद होतो. श्री. बापूसाहेबांचे भाग्याची थोरवी कोणी वर्णन करावी. प्रत्यक्ष देव घरीं येऊन बसले, देऊळ बांधलें, त्याचें श्रींनी सार्थक करुन दाखविले. इथें आतां पूजा, अर्चा सर्व प्रकार हिंदू तऱ्हेनें पूर्णपणें चालू आहेत. कसलीही आडकाठी होण्याचा संभव नाही. "भेट लोकांची" बाजू देवानी संभाळली व स्वतःचा देह त्यांचे हवाली केला. निर्याणाचे पूर्वी ४।५ दिवस सोनीचे आईला बोलावून श्रींनी सांगितले होतें "आतां मला मशिदीचा कंटाळा आला, चावडीचा कंटाळा आला, आतां मी वाड्यांत जाऊन बसेन तेथें भेट लोक माझा सांभाळ करतील." जोगांचे ताईला ४।५ वर्षांपूर्वीच हात धरुन आणून सांगितले होते "ही हगदोडीची जागा माझी आहे. इथे दगडी इमारत होईल तेथें मी बसेन—वगैरे" श्री समर्थांचे संकल्प पूर्वीच ठरलेले होते असें दिसतें. परंतु श्रींनीं कशाचाच कधीही उघड पत्ता लागूं दिला नाहीं. आंतून प्रेरणा करुन सर्व काम करुन घ्यावयाचें. असो फार आनंद झाला. श्री. बापूसाहेबांवर आतां विशेष जबाबदारी पडली आहे. देऊळाचें काम पुरे करावयाचें आहे. श्रींचे पूजेअर्चेला कायमचें स्वरुप द्यावयाचे आहे. तें आता समाधी सोडून जातील असें मला वाटत नाही.

श्रींनी निर्याण केल्यावर ठिकठिकाणीं दृष्टांत दिले. सकाळीं लक्ष्मण भटाला दृष्टांतांत येऊन सांगितलें कीं, "तो बापूसाहेब निजला आहे, चल ऊठ माझी काकडआरती कर" त्याप्रमाणे **लक्ष्मण भटांनी स्नान करुन बुधवारीं सकाळीं मशिदींत जाऊन देहाची पूजा आरती केली.** पंढरपूरला मंगळवारी दासगणूचें दृष्टांतांत जाऊन सांगितले की, "मशीद पडली माझे अंगावर "बख्खळ" फुले घालावयास या." ता. २७ आक्टोबरला श्रींचे तेरावे दिवशीचा मोठा उत्सव झाला. ठिकठिकाणाहून भक्त मंडळी आली होती. भंडाऱ्याकरितां लाडवाचे प्रयोजन केलें होतें. भांडाऱ्याची वर्गणी रु. २४०० पर्यंत जमली होती. नानासाहेब चांदोरकर वगैरे सर्व मंडळी एथें जमली होती. पूर्वी श्री. राधाकृष्णाबाई गेल्यापासून भक्तमंडळींनीं वर्गणी करुन "कोठी" ही संस्था चालविली होती. श्रीसमर्थांचे पूजेअर्चेचा सर्व खर्च त्यांतूनच चालत असे. ती कोठी अजूनही पूर्ववतच चालू आहे. तूर्त मंडळींनी एक पंधरा इसमांची कमिटी नेमिली आहे. श्री. बापूसाहेब बुटींना तिचे अध्यक्ष निवडले आहे. व ते व्यवस्था करतील ती प्रमाण अशी व्यवस्था ता. २४ डिसेंबर पर्यंत ठरली आहे. नाताळांत ता. २४/२५/२६ ला सर्व भक्तमंडळी एथें शिरडीला येणार आहेत तेव्हां श्रींचे संस्थाना करितां नियम वगैरे होऊन संस्थेला मूर्त स्वरुप देण्यांत येईल. तेवेळीं आपण एथें जरुर येण्याचें करतील. पत्र सविस्तर घाईघाईनें लिहिले आहे. लिहिण्यांतील चुका माफ करतील. मी दोन तीन दिवसांनी नागपूरला जाणार आहे. तेथे भेटीअंती आणखी वर्तमान सांगेन. कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र
गणपती नरके

ता.क. :– श्रींचा देह २४ तासाचे वर राहूनही stiff झाला नाहीं. दुसरे दिवशीं तोंडांतून थोडें रक्त येत होतें, हात पाय इकडून तिकडे मोकळे हलत असत. कफनी फाडून काढावी लागली नाहीं. शेवटची कफनी वाड्यांतच आपले घरी आहे.

वरील पत्रावरुन खालील गोष्टी स्पष्ट होतात आणि त्या नरकेंसारख्या परदेशात उच्च शिक्षण घेतलेल्या, पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये भूगर्भ आणि रसायन शास्त्रांचे प्राध्यापक असलेल्या गृहस्थाने प्रत्यक्ष पाहून ३ आठवड्यांचे आंतच लिहिलेल्या असल्याने त्यातील वेळ, तारीख व वार अगदी बिनचूक असण्याबद्दल कोणालाच शंका राहणे शक्य नाही :–

(१) बाबांनी मंगळवार ता. १५-१०-१९१८ रोजी दुपारी २-३० चे सुमारास देहत्याग केला.

(२) बाबांनी बुधवार ता. १६-१०-१९१८ रोजी पहाटें लक्ष्मणमामांना स्वप्नांत दृष्टांत देऊन काकड आरती करण्यास सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी मशिदीत जाऊन बाबांच्या देहाची पूजा व आरती केली. नंतर दुपारी बापूसाहेब जोगांनी माध्यान्ह आरती केली. मंगळवारी १५ तारखेला बाबांनी देहत्याग करण्याआधी नेहमीप्रमाणे दुपारची आरती झालेलीच होती. म्हणजे बाबा समाधिस्थ

झाले तरी आरतीला खंड पडला नाही. बाबांची तशी इच्छाच असावी. म्हणूनच कदाचित त्यांनी लक्ष्मणमामाला जागविले आणि आरती करावयास लावली. लक्ष्मणमामासारख्या कर्मठ ब्राह्मणाने व ग्रामजोशाने प्रेताचीही नेहमीप्रमाणे आरती केल्यामुळे त्याच्या योग्यायोग्यतेबद्दल शंका कोणाला राहिली नाही.

(३) बाबांचा देह द्वारकामाईतून उचलून त्याची गावातून मिरवणूक काढून बुट्टींच्या वाड्यात बुधवार ता. १६ रोजी एकादशीचे दिवशी सायंकाळी ठेवण्यात आला.

## 'आशिष घ्याया'

आशिष घ्याया शिरडीस येते
हरवून मी तव पायी रमते ॥धृ॥
सांगू कसे रे साई तुजला
भाव मनींचा पायी वाहिला
देहभाव मग कोठे उरला
चरणी तुझिया लोळण घेते ॥१॥

किती दिसांच्या मनी सांचल्या
सुखदु:खाच्या जखमांच्या खपल्या
येऊनी पायी तुला सांगण्या
मन माझे रे आतुर असते ॥२॥

जवळी येता काय सांगू मी
आनंदे मन भरुनी जाते
मनी ठरलेले हितगूज सारे
तुला पाहता मनीच राहते ॥३॥

तुझ्या दर्शने मिळते शांती
आणिक नुरते कसली भ्रांती
तुझ्याच रुपे या जन्मी मज
असे मिळाले दुर्लभ नाते ॥४॥

परि सांगते तुला ठाऊके
काय करावे माझ्याकरिता
दु:खे भरल्या ह्या जीवाला
काय हवे अन् काय नको ते ॥५॥

सतत दर्शन आणशील तू
हाच धरोनी मनी भरोसा
काही नाही दुजे मागणे
चरणी येता सौख्यच मिळते ॥६॥

**श्रीमती श्री शहाणे**
लक्ष्मी निवास, रा.ग. गडकरी पथ,
सि.के.पी. हॉल जवळ,
डोंबिवली (पूर्व).

# श्री साईनाथांचा शरणार्थी – २८

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि.बा. खेर

[श्री साईनाथांचा शरणार्थी' ह्या लेखमालेचा हा शेवटचा २८ वा लेखांक आहे. एप्रिल १९८५ मध्ये ही नाविन्यपूर्ण लेखमाला सुरु झाली, व ती सातत्याने प्रकाशित होत राहिली. "श्री साईनाथने शरणे" ह्या स्वतः स्वामी साईशरणानंद यांनी गुजराथी भाषेत लिहिलेल्या आत्मकथेचा हा संपादित मराठी अनुवाद आहे.

स्वामी साईशरणानंदजी हे साईंच्या सहवासात कसे आले, त्यांना श्रींच्या सान्निध्यात कोणकोणते आध्यात्मिक अनुभव आले, श्रींनी त्यांची घडण कशी केली व महासमाधी नंतर सुद्धा स्वामीजींचा श्रींच्या प्रेरणेने कसा पारमार्थिक विकास होत गेला, याची ही रम्यकथा आहे. आमच्या साईलीला वाचकांनी ह्या लेखमालेचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

मूळ गुजराथी ग्रंथ ३९९ पृष्ठांचा असून मुंबईच्या श्रीमती उषाबेन मधुसूदन भट यांनी तो प्रकाशित केला आहे. सदर पुस्तकाची किंमत ३० रुपये आहे.

– का. सं.]



**स्वामी साईशरणानंदजींचे त्यांच्या अखेरच्या काळातील एक अप्रसिद्ध छायाचित्र.**

१२ डिसेंबर, १९५३ रोजी डाकोरहून अहमदाबादला जाऊन, तेथून १४ डिसेंबरला तलोदला गेलो व घनश्यामभाईंच्या घरापासून काही अंतरावर असलेल्या शंकराच्या देवळात पुजाऱ्याच्या खोलीत मुक्काम केला तेथे ६ जानेवारी, १९५४ च्या सुमारास (कदाचित एक दोन दिवस अगोदर) जागृतावस्थेत उघड्या जबड्याच्या

सिंहावर आरुढ झालेल्या भवानीदेवी–उमादेवीचे सुंदर दर्शन झाले. नंतर लगेच उपनिषद द्वारा महावाक्यांचा उपदेश *मिळाला. कदाचित मी समजेन की, हा माझ्या कल्पनेचा आभास आहे व महावाक्यांचा उपदेश भगवान शंकरांनी केला नाही, म्हणूनच की काय भगवान शंकरांनी ओळख दिली आणि सांगितले की, १९२३ मध्ये प्रणवाचा उपदेश तुला दिला होता व त्याचे सर्वव्यापीत्व प्रत्यक्ष दाखविले होते, व त्याच्याच अनुसंधानात आता मी महावाक्यांचा उपदेश करीत आहे. १९२३ साली 'ॐ'कार प्रत्यक्ष करुन तुला जणू काय यज्ञोपवित दिले. आता महावाक्ये प्रबोध करीत आहे. ''ततो ब्रह्मोपदिष्टं वै सच्चिदानंद लक्षणम्, जीवन्मुक्तस्सदाध्यायन्नित्यत्वं विहरिण्यसि'' तुझा गुरु शुकदेव आहे. शुकदेवाला उपदेश भगवान श्रीशंकरांनी दिला, म्हणून या रितीने हेच भगवान शंकर माझे परमगुरु आहेत.

'*अथर्ववेद– 'अयं आत्मा ब्रह्म'– म्हणजे शरीरात असणारा प्रत्यगात्मा हाच प्रत्यक्ष ब्रह्म आहे अन्य कोणीही नाही. अशा प्रकारे जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य दाखवून देतात.

सामवेद– 'तत्वमसि'– तत् शब्दाचा लक्षार्थ निर्गुण ब्रह्म व त्वं या शब्दाचा लक्षार्थ प्रत्यगात्मा. 'असि' त्वं व तत् चे ऐक्य दर्शविते.

यजुर्वेद– 'अहं ब्रह्मास्मि'– अहं म्हणजे देहापासून निराळा असा साक्षी (आत्मा) पूर्ण निर्गुण ब्रह्म आहे या अवस्थेची प्रत्यक्ष अनुभूति घेणे.

ऋग्वेद– 'प्रज्ञानं ब्रह्म'– ब्रह्म ज्ञानस्वरुप आहे व तेच ज्ञान सर्वव्यापी सत्-चित्-आनंद या गुणांनी दाखविलेले परब्रह्म.

या सुमारास फणसवाडी विठ्ठल मंदिराचे मालक श्री. वसंतराव वामनराव पणशीकर यांचे मुंबईहून पत्र आले. बाबांनी त्यांना केलेल्या आज्ञेनुसार, निरनिराळ्या तेरा स्थानात पादुका स्थापून बाबांचा प्रचार करण्याचा त्यांचा संकल्प कळवून, त्यांनी माझा आशीर्वाद मागितला. त्यांना उत्साहप्रेरक उत्तर पाठविले असता, ते स्वतः तळोदला मला भेटण्यास आले. ते म्हणाले की, त्यांनी पुण्यात पादुका अर्पण केल्या होत्या. दुसऱ्या स्वतःच्या विठ्ठल मंदिरात स्थापन केल्या होत्या व आता तिसऱ्या अहमदाबाद येथे अर्पण करण्याचा त्यांचा मानस होता.

२३ मे, १९५४ ला घनश्यामभाई, केशवलाल, सौ. शारदाबहेन व गौरीबहेन यांच्यासह मी मुंबईला गेलो. बॉम्बे सेंट्रल स्टेशनवर पणशीकर त्यांच्या काही सभासदांसह आले व आम्हाला विठ्ठल मंदिरात घेऊन गेले. तेथून पादुकांसाठी चांदी देणारे सोनार प्रभुदास कानजी आम्हाला आपल्या घरी घेऊन गेले व भोजन वगैरे आटोपल्यावर संध्याकाळी प्रभुदासनी आम्हाला विठ्ठल मंदिरात नेऊन सोडले. मंदिरात ज्या पादुका पणशीकर अहमदाबादला नेऊन अर्पण करणार होते, त्यांची माझ्याकडून विधिपुरस्सर करवून, नंतर मंदिराच्या बाहेर पिंपळाच्या झाडाखाली बाबांचा फोटो होता, त्याची त्यांनी आरती केली. तेथून आम्ही सरळ बोरीबंदरला जाऊन नागपूर एक्सप्रेसमध्ये बसलो. पणशीकरांनी आमच्या बरोबर दोन माणसांना

पादुका घेऊन, त्या प्रासादिक करण्यासाठी शिरडीस पाठविले. शिरडीला पादुकांवर अभिषेक करुन, बाबांचे सिंहासन, ज्यावर श्रींचा फोटो ठेवला होता, त्याच्याखाली पादुकांना प्रासादिक करण्यासाठी चोवीस तास ठेवले. अशा रितीने पादुकांना प्रासादिक करुन ते दोघे मुंबईला दुसऱ्या तिसऱ्या दिवशी परतले. आम्ही सर्व २९ मे, १९५४ रोजी शिरडीहून निघून मुंबईला आलो व नरहरिप्रसादांनी आमची व्यवस्था मालाडला केली होती, तेथे मुक्काम केला. त्यावेळी डिलाईल रोडवर ९४-डी माधवभुवनात चालणाऱ्या साईमंडळात संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहावरुन गेलो. त्यातून स्तवनमंजरीचा गुजराथीत अनुवाद करण्याची प्रेरणा मिळाली. या प्रेरणेनुसार स्तवनमंजरीचा गुजराथी अनुवाद प्रसिद्ध झाला, ज्याची आता तिसरी आवृत्ती निघाली आहे.

त्यानंतर ३ जून रोजी मी, घनश्यामभाई व शारदाबेन बडोद्याला गेलो व तेथे दोन दिवस राहिलो. त्या दरम्यान एका संध्याकाळी घनश्यामभाई व त्यांच्या माडीवर राहणारे श्री.वकील व त्यांचे मित्र यांच्याबरोबर ज्युबिली बागेमध्ये फिरावयास गेलो. तेथे मुलं थोड्या अंतरावर खेळत होती. घनश्यामभाई व वकील हे गप्पागोष्टीत गुंतले होते व मी विचारमग्न होतो. मी या निर्णयावर येऊन पोचलो की, पंचतत्वाचे शरीर, मन, बुद्धी, अहंकार, चित्तासह विलीन होते आणि मग तर काहीच उरत नाही. प्रलय झाल्यावर जगताचे राहतेच काय? काहीच नाही. या निष्कर्षावर आलो आणि आम्ही सर्व मुक्कामावर परतण्यास बागेबाहेर पडलो. तेथे पीत वस्त्र परिधान केलेला एक साधू उभा होता. मला जाताना पाहून त्याने मला विचारले,"तुम्ही कोण? जैन साधू आहात?" मी ताबडतोब उत्तर दिले, 'मी तर शंकराचार्यांच्या संप्रदायाचा संन्यासी आहे.' माझे भगवे वस्त्र पाहून सुद्धा ज्या अर्थी या साधुने मला वरील प्रश्न केला, त्यावरुन मी समजलो की, बागेत तत्वासंबंधी केलेला विचार जैनांच्या शून्यवादाचा आहे आणि मी तर शंकराचार्यांचा चुस्त अनुयायी, सत्वादी आहे. लगेच मला माझी चूक उमगली आणि मला वाटले, 'मी चुकेन तेव्हा टोचणी देत रहा' ही माझी साईबाबांना भक्तमंडळातर्फे विनंती होती, ती ऐकून श्री साईबाबांनी स्वतः प्रकट होऊन माझ्या विचारातील दोष सुधारला किंवा त्या साधूच्या जिव्हेवर आरुढ होऊन त्याने जो मला प्रश्न केला, तो पुसण्यास प्रेरणा दिली.

तलोदहून पणशीकर अहमदाबाद येथील तारकस भुवन येथे गेले होते व त्यांनी पादुकांची प्रतिष्ठापना अहमदाबाद येथे करण्याचा आपला निश्चय व्यक्त केला. मी त्यांना तारकस भुवन येथे पाठविले, हे पण त्यांनी सांगितले. तरीही तारकस भुवनात कोणीही त्यांचा आदर-सत्कार केला नाही व उलट काही उणे अधिक बोलले असावे. म्हणून त्यांनी त्या वेळीच तारकस भुवनाला पादुका अर्पण न करण्याचा दृढ निश्चय केला. मी श्री साई-सुमनचे चालक चोकसी यांच्या मार्फत पणशीकरांना कळविले की, सध्या पादुका अर्पण करण्यांचे तहकूब करावे. अहमदाबादला साईमंदिर होईल तेव्हा पादुका मागवून घेण्यात येतील आणि त्या वेळी त्यांनी तेथे जाऊन त्या अर्पण कराव्या. परंतु पणशीकर आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत व त्यांनी नक्की केले की

कुठल्याही परिस्थितीत ठरविलेल्या दिवशी म्हणजे ज्येष्ठ शुद्ध १२ वीला रविवारी ते सर्व भक्तांसह अहमदाबादला येऊन मला पादुका अर्पण करणारच करणार. पत्राने व तारेने न येण्याची त्यांना विनंती व पादुका अर्पणविधि पुढे ढकलण्याचा आग्रह केला. संन्याशाला पादुका-स्वीकृति अयोग्य गणली जाते, इत्यादि त्यांना कळविले.

पादुका स्वीकारण्यास माझी नाखुषी पाहून मला कळविल्याशिवाय पणशीकरांनी १ जूनपासून उपोषण सुरु केले व १२ जून, १९५४ ला पादुका अर्पण करण्याचा आपला दृढ निश्चय पोस्टकार्डाने कळवून माझी स्वीकृति कळविण्यास सांगितली. मी त्यांना काहीच उत्तर पाठविले नाही. तरीही ते स्वतः शुक्रवार ता. १० जून रोजी दत्त म्हणून उभे राहिले आणि मला म्हणाले, 'माझ्या उपोषणाचा आजचा दहावा दिवस आहे. जोपर्यंत तुम्ही या पादुकांचा स्वीकार करणार नाही, तोपर्यंत मी माझे अनशन व्रत सोडणार नाही. त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न सौ. कुमुदबहेन रावळ व त्यांचे गुरु श्री. नानुभाई व शेठ रतिलाल यांनी केला पण त्यांनी आपला हट्ट सोडला नाही. उलट ते मला म्हणाले, 'तुम्हाला या बाबतीत काहीच खर्च करावा लागणार नाही. आमच्या येण्याजाण्याचा, राहण्याचा, सोहळ्याचा व बँडचा सर्व खर्च आमच्या अंगावर आहे. आम्ही येथे नवखे आहोत, म्हणून आमचा कार्यक्रम नीट पार पडावा म्हणून पैशाशिवायची बाकीची मदत तुम्हाला करायची आहे. तुम्ही पादुका स्वीकारल्या नाहीत तरीही मी येऊन तुम्हाला त्या अर्पण करुन येथे ठेवून जाईन. तुम्ही पादुकांचा स्वीकार करणार नाहीत, तोपर्यंत माझे उपोषण चालू राहिल, हे नक्की समजा.'

पणशीकरांचे प्रेम व आग्रह पाहून मला श्री साईकृपेने स्फुरले, 'संन्याशाचे व्रत, काया वाचा मने प्राणिमात्रांविषयी अहिंसा पाळण्याचे असते. त्याच्याकडून प्रत्येकाला अभय प्राप्त झाले पाहिजे. ब्राह्मणाला भुके मारणे, निष्काम प्रेमाची अवगणना करणे हा संन्याशाचा धर्म खचित नाही.' या विचाराने पणशीकरांकडून पादुका स्वीकारण्यास मी राजी झालो. त्यामुळे त्यांना संतोष झाला. अनशन व्रत सोडण्यास सांगितले असता, 'पादुकाविधि झाल्यानंतर तुम्ही त्या स्वीकाराल तेव्हा ता. १३ जूनला मी भोजन करेन, तोपर्यंत माझे व्रत मी सोडणार नाही, असे ते उत्तरले व आपल्या निर्धारास चिकटून राहिले.

रविवारी सकाळी त्यांच्या बावीस एक माणसांचे भक्तमंडळ अहमदाबादला आले. त्यामध्ये राष्ट्रवाणीचे चालक, पडते कुटुंब व वाद्य वाजंत्रीसह संगीतकार होते. मी काही भक्तांसह गाडीवर त्यांना उतरुन घेण्यास गेलो व त्यांचे स्वागत केले. वेटिंग रूममध्ये त्यांना बसवून श्री. दादुभाईंनी स्वागत-गीत गायले. नंतर भीखुभाई रावळांच्या मोटारीत फोटो, तसेच पादुका ठेवून सर्वजण भजन करत करत त्यांना धर्मशाळेत नेण्यात आले. दुपारी भीखुभाईंच्या मोटारीत पादुका व छबी सन्मानाने ठेऊन सर्व पाहुणे भजन करत बँडसह वाजतगाजत खजुरी पोळ येथे आले. पोळाच्या नाक्यावर त्यांचा सत्कार करण्यात आला व पताकांनी सुशोभित केलेल्या चौकात अर्पणविधि झाल्यावर पादुकांचा मी स्वीकार केला, नंतर भजन झाले. माझ्या वतीने सौ. कुमुदबहेनचे गुरु यांनी स्वागतपर भाषण वाचले व नंतर रात्री त्यांना साधे भोजन

देऊन स्टेशनवर भावपूर्ण निरोप देण्यात आला.

बाबांनी मला या पादुका माझ्या इच्छेविरुद्ध स्वीकारावयास लावल्या, त्यावरून बाबा सांगत असावे की, केवळ ध्यान-समाधिच्या पाठीमागे न जाता मला गुरुपूजेचे अंगसुद्धा सांभाळले पाहिजे. मठात आचार्यांच्या पादुकांचे पूजन करतात हे आपल्या पाहण्यात येते. दुसऱ्या कोणाची अशी योग्यता दिसत नाही. तेव्हा माझी योग्यता तर काय? कुमुदबहेनने एकदा मला लिहिले होते की, मी साईबाबांच्या भक्तांच्या आचार्यपदी आहे, असे बाबा सुचवू इच्छितात. १९५३ साली संन्यास घेतल्यावर थोड्याच दिवसात दिगंबर अवधूत होण्याची माझी पात्रता नाही, हे बाबांनी अनुभवद्वारा मला दर्शविले. त्याप्रमाणे या पादुकांच्या घटनेवरुन बाबा सुचवू इच्छित होते की, सामान्य रित्या संन्यासी स्वर्गीय गुरुचे नाव क्वचितच कुठेतरी सांगतात, घेतात किंवा गातात, परंतु ते घेतले पाहिजे व लोकहितार्थ त्याचा प्रचार करणे आवश्यक आहे. गुरुपूजेचे माहात्म्य मला दाखविले पाहिजे. शिवाय याने मला असे पण समजले की, या जगताचा, संसारी सृष्टीचा त्याग करुन राहयचे नाही. उलट गुरु किंवा ईश्वरावर प्रेम, श्रद्धा आदि अनुकरणीय कर्मे करुन लोकांना तसे करण्यास प्रेरणा दिली पाहिजे.

फोटोची पूजा चालू असताना सुद्धा पादुकांच्या पूजन-अर्चनेचे महत्व काही आगळे आहे, ते काही अंशी मला समजले. भरताने प्रभु रामचंद्राकडून पादुका मागून घेऊन त्यांच्या अनुपस्थितीत पादुकांचा आदेश घेऊन त्या अनुसार राज्य चालविले. मला पण माझ्याकडे येणाऱ्या माणसांबरोबर याच प्रकारचा व्यवहार करायचा आहे. शिवाय पादुकांचे अलग पूजन अपरोक्ष ज्ञान होण्यासाठी असते. अलग प्रतीकाच्या पूजेने भेदमय भावना उपस्थित झाल्यास, त्या भावनेला स्वशरीरात अपरोक्ष करण्याचे हे एक साधन गणू शकतो. कारण षट्चक्रांचा विचार करता शिरोभागात जे सहस्त्रदळ आहे, त्याच्यात ह्या गुरुपादुका आहेत, अशी भावना करता करता अपरोक्ष ज्ञान होऊ शकते, म्हणजे ज्ञानमय दशेचा, परब्रह्म-अनुभव येऊ शकतो आणि आपण ब्रह्ममय होऊन जातो.

संन्यास घेतल्यानंतर बाबांनी मला आतापर्यंत वाचन, पाठ, पारायण आदि आदि साठी दिलेल्या सूचनांचा उल्लेख विगतवार न करता थोडक्यात मी एवढेच म्हणेन की, माझ्या अध्यात्ममार्गातील प्रगतिसाठी श्री साईबाबा सदैव माझ्यासह असल्याचा सतत अनुभव संन्यास घेतल्यावर येतच राहतो. दुसऱ्या कुणालाही गुरुस्थानी न ठेवण्याच्या माझ्या दृढ निश्चयामुळे, त्यांनी मला श्री उमादेवीचे दर्शन करवून महावाक्योपदेश सुद्धा भगवान शंकरामार्फत तलोद मुक्कामी दिला. संन्याशाची नित्यादि कर्मे, भिक्षा आदि नियमांचे ्की माहिती मिळवून दिली. अध्यात्मिक प्रश्नांची अडचण उभी राहताच, पुस्तक प्रकरणे तसेच अमुक खंड वाचण्याची सूचना पण वारंवार केली आहे, आणि अजून जरूर पडते तेव्हा करतच असतात. याच्यापेक्षा मला अधिक काय पाहिजे? शेवटी माझी त्यांच्या चरणी एवढीच प्रार्थना आहे की, ज्या ज्या सूचना त्यांनी या रितीने केल्या आहेत व यापुढे करतील, त्यांना अनुसरुनच माझे आचरण निरंतर राहो.

## माझ्या आठवणीतून-

# मी पाहिलेले साईबाबा - १

**- सौ. सरोजिनी मुळ्ये**
सरस्वती सदन, साऊथ तुकोगंज
६ नाथ मंदिर कॉलनी,
मु. पो. इंदूर (म.प्र.).

**[श्री साईबाबांचे एक लाडके भक्त व बाबांच्या या 'श्री साईलीला' मासिकाचे पहिले संपादक श्री. काकासाहेब महाजनी यांच्या कन्या सौ. सरोजिनी मुळ्ये यांनी लिहिलेल्या या आठवणीवजा लेखाद्वारे ही नवीन माहितीपूर्ण लेखमाला सुरु करीत आहोत. आमच्या वाचकांना ती नक्कीच आवडेल.]**



**सौ. सरोजिनी मुळ्ये**

माझा जन्म १९१० मध्ये झाला. माझ्या जन्माच्या आधी कित्येक वर्षांपासून माझे आई-वडील साईभक्त होते. माझ्या वडिलांचे नाव लक्ष्मण गणेश महाजनी असे होते. त्यांना सर्वजण 'काका' या नावाने संबोधित असत. त्यांना साईशिवाय अन्य दैवत नव्हते. प्रत्येक उत्सवाला ते शिर्डीला जात असत व आम्हालाही नेत असत, असे ते सांगत. हा साई भक्तीचा वारसा तेव्हापासून मला मिळाला आहे, तो आजतागायत तसाच आहे. अगदी लहानपणापासून जरी मी शिरडीला जात होते तरी तेव्हा मला काहीच समजत नसे. पुढे मी सात आठ वर्षांची झाले तेव्हाची मला चांगली आठवण आहे

८व्या वर्षी मी वडिलांबरोबर जेव्हा शिर्डीला गेले तेव्हा म्हातारी माणसे म्हणजे आजोबा असतात एवढे माहीत होते. प्रथम दर्शनी ते मला आजोबाच वाटले. गेल्याबरोबर बाबांनी मला मांडीवर बसवून घेतले व पाठीवर हात फिरवून म्हणाले, ही माझी '**मैना**' आहे. व त्यांनी मला आपल्या हाताने उदी लावून प्रसाद दिला. त्यांना लहान मुले फार आवडत असत. त्यांच्या जवळ भेदभाव नव्हता. घाणेरडी मुले जरी त्यांच्या जवळ आली तरी ते कंटाळा न करता त्यांना स्वच्छ करीत असत. सर्व धर्मियांना त्यांच्या जवळ सारखीच वागणूक असे.

आमचे घरी रोज श्रींची आरती पूजा, दर गुरुवारी बाबाना हार व शिंन्याचा नैवेद्य न चुकता माझी आई करीत असे. कोणीही फकीर भिक्षेला आला तरी त्याला रिक्त

हस्ते जाऊ देवू नये, ही शिकवण लहानपणापासून मिळाली.

माझ्या लहानपणी शिर्डीला जाण्याकरिता हल्लीसारखी सर्व साधने उपलब्ध नव्हती. कोपरगाव पर्यंत आगगाडीने जावयाचे व पुढे टांग्यातून किंवा बैलगाडीतून शिर्डीला जावे लागत असे. याही गोष्टीची तेव्हा मजा वाटावयाची.

लहान वयात घरातील वातावरणाचा व संस्कृतीचा परिणाम मनावर ठसतो. तोच परिणाम माझ्यावरही झाला व श्रद्धा दृढ झाली. मी बाबांना पाहिले तेव्हा त्यांचा चेहरा आकर्षक वाटला. ते गोरेपान व उंच होते. त्यांचे बसणे, उठणे, रहाणे, झोपणे वगैरे बहुतेक मशिदीतच असे. ते एक दिवस चावडीत व एक दिवस मशिदीत झोपत असत. ते जेव्हा मशिदीत बसत तेव्हा कठड्याजवळ लांब पाय करुन, कठड्यावर हात ठेवून धुनीसमोर बसलेले असत. हे दृष्य अद्यापही डोळ्यांसमोर आहे. उजव्या हाताला माधवराव देशपांडे त्यांच्या सेवेला बसलेले असत. त्यांची बाबांवर एवढी श्रद्धा असे की, त्यांना विचारल्याशिवाय ते काहीही करत नसत. त्यांची बाबांशी इतकी सलगी होती की, ते बाबांना एकेरी नावाने हाक मारीत. बाबांना काही सांगावयाचे असले तर म्हणत, 'म्या म्हटलं दचेवा तूं असेच कर'. ते त्यांचे सर्व ऐकतही असत. माधवरावांच्या मध्यस्थिने पुष्कळ लोक बाबापाशी आपला कार्यभाग उरकून घेत असत. आम्ही शिरडीला त्यांच्याच घरी उतरत होतो. त्या काळी हल्ली सारखी भक्तांना उतरण्याची सोय नव्हती. शिर्डी अगदी खेडेगाव होते. बाबांच्या शिर्डी वास्तव्यामुळे आज शिर्डीला राजवैभव प्राप्त झाले आहे.

बाबांची झोपण्याची फळी मी पाहिली आहे. त्यांना मशिदीत अंधार आवडत नसे. ते सदोदित पणत्या लावीत असत. तेल न मिळाल्यामुळे, त्यांनी पाण्यात पणत्या पेटवून दाखविल्या होत्या, हे सर्वांना माहीतच आहे.

ते स्वभावाने रागीटही होते व मायाळूही होते. ते ज्या दगडावर बसत असत, तो दगड अद्याप शिर्डीला आहे. ते एक ईश्वरी अवतार होते. बाबांची आमच्यावर पूर्ण कृपा व छत्र सदैव आहे. अनेक संकटांतून त्यांनी वाचविले आहे व आजही ते आम्हाला संभाळीत आहेत. आमच्या माहेरी व सासरी ते प्रगट होऊन गेलेले आहेत. बाबांचा श्यामसुंदर नावाचा घोडा होता. त्याला आरतीच्या वेळी साजशृंगार घालून आणीत असत, हे मी पाहिले आहे. तो आरती संपेपर्यंत उभा रहात असे व संपल्यावर पुढील दोन पाय उंच करुन बाबांना वंदन करीत असे.

साधूसंतांची भेट होणे व अगदी जवळून त्यांचा सहवास घडणे, ही परमभाग्याची गोष्ट आहे. ते भाग्य मला लाभल्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. ह्या वरून मला जी कविता सुचली ती त्यांच्याच प्रेरणेने म्हणून येथे देत आहे.

मजसम भाग्यवान मी असेन
प्रत्यक्षांत मजला घडले साईचे दर्शन
घडले तयांचे चरण तीर्थ सेवन
केले तयां हातचे उदी प्रसाद सेवन

मजवरी असे कृपा प्रेम भारी बाबांचे
सौख्य लाभले मला, तयांच्या मांडीवर बसण्याचे
अनेक अनुभव मजला आले, बाबांच्या लीलांचे
आशीर्वाद मला लाभले, माझ्या वडिलांचे
'साईनाथा' मजवरी करी, कृपा तूंच आतां
अंत होऊं दे, नामस्मरण ते करितां करितां
एवढीच ती मनीषा माझी पुरवी तूं आतां
तुला विनविते, आणि प्रार्थिते श्री साईनाथा

श्री साईचरणी शतशः प्रणाम करुन सदैव त्यांची कृपा अखंड रहावी, हीच साई चरणी प्रार्थना.

# श्रद्धेचा आविष्कार

**– सौ. कल्पना मंगेश कोरडे**
४ था मजला, आर्य समाज समोर,
१८ काकडवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४.

श्रद्धा सबुरी भक्ति । मनुष्याचा विसावा
न धरी अहंकार मनी । ते संतांचे निकट पांखरु ॥

श्रद्धा, सबुरी, भक्ती हे माणसांचे तीन मौल्यवान गुण आहेत. पण ते तो जेव्हा अंगिकारु शकेल, तेव्हाच त्यांचा उपयोग होतो.

भक्ती माणसाने कोणत्याही प्रकाराने करावी. उदा. (१) नामस्मरण (२) फळे, फुले वाहून (३) ध्यान करुन (४) भजन. यापैकी आपल्याला आवडेल त्या मार्गाने भक्ती करावी. जशी शरीरास अन्नाची जरुरी आहे, शौचास जाणे जरुर आहे, तसेच नामस्मरण त्याही पेक्षा जरुर आहे.

परमेश्वराच्या श्वासाने पाने हलतात, फुले बहरतात. आपले शरीरपण कसे सुंदर, व्यवस्थित निर्माण केले आहे. नाकाच्या जागी नाक, डोळ्याच्या जागी डोळा, कानाच्या जागी कान, हातापायाची बोटे वगैरे गोष्टी व्यवस्थित करतो. तेच जर जरा इकडे तिकडे झाले तर काय होईल?

आपले शरीर हे मंदिर आहे, व प्राण हा त्यातला देव आहे. परंतु त्याला आपण जागृत करायला हवे. तरच आपल्यात देवत्व उतरते. संतांनी म्हटले आहे की, **तुम्हाला दिलेले शरीर । ते माझे विश्रांतीचे मंदिर । कशाला जातोस मंदिराशी । शोध मला तू अंतरीशी ॥**

संसार करता करता आपण परमार्थ करायला हवा. तुकाराम, नामदेव, जनाबाई, गोराकुंभार वगैरे संत संसाररुपी सागरात आपली भक्तिरुपी नाव सोडून श्वास असे

पर्यंत तरत राहिले. परमेश्वराची आठवण करायला तुम्हाला पैसा लागत नाही, कष्ट करावे लागत नाहीत, फक्त तुम्ही त्याला तुमच्या अंतरंगात आणायला पाहिजे.

छोटासा भक्त प्रल्हाद, ज्ञानेश्वर, ध्रुवबाळ इतकी छोटी मुले ते करु शकतात, ते इतरांना का होऊ नये!

मद, मत्सर, राग, लोभ, धन ह्यांनी आपण अगदी भारावून गेलो आहोत. पण जेव्हा आपल्याला न आवरणारे संकट आले की,मग आपण, 'देवा, धाव बाबा, मी आता काय करुं?' म्हणून देवाला, परमेश्वराला हाक मारतो. पण त्या अगोदर सुखवस्तू मध्ये असताना आपल्याला त्याची आठवण होत नाही. त्याला तुच्छ लेखतो. मग तो तुम्हाला संकटाच्या वेळी का बरे धावेल?

परमेश्वर आहे—नाही म्हणणारे नास्तिक अखेरीस नत मस्तक होतात. आपल्या अंगी नम्रता येण्यासाठी आपण कुणाकडे तरी धावले पाहिजे. कुणाला तरी मोठे समजले पाहिजे. त्या कडून सगळ्या चांगल्या गोष्टी, सुविचार शिकले पाहिजे. म्हणून संसारात असताना जिवंत गुरु करावा. तरच आपल्याला सन्मार्ग मिळतो, आनंद मिळतो, आपल्या हातून सत्कार्य होते.

गुरुशिवाय मोक्ष नाही. प्रत्येक संताने गुरु केलेला आहे. आपण तर काय साधीसुधी माणसे! मग आपल्याला गुरु करायला हवा.

गुरु ब्रह्मा: गुरु विष्णू: गुरु देवो: महेश्वरा:
गुरु साक्षात् परब्रह्म: तस्मै श्री गुरु देवो नम:

# माझा साई

साई-साई मुखात बसला।
साई माझ्या मनात बसला।।
साई चरणी जीवन-अर्पण।
साई सुख दु:खात बसला।।

दीन दुर्बलांचा तू कैवारी।
संकटातून तूच वारी।।
कष्टी पडता येसी धावूनी।
तुझ्याच ठायी तुझ्याच दारी।।

हाक मारता धावून येई।
मना सांत्वना भरून देई।।
भक्तासाठी पदो-पदी तू।
जीवन हारा प्रेमा साई।।

छंद लागला तुझ्या भक्तिचा।
गळून जाई अभिमान शक्तिचा।।
वेड लागले साई चरणी।
तारी आता माऊली माई।।

**— श्री. किशोर तारे**
१११/५६, शिवाजी नगर,
मु.पो.-भोपाळ, म.प्र.-४६२ ००६

साईदरबारातील माणिक आणि मोती ... ३

# श्री. कृष्ण जागेश्वर भीष्म


– साईनंद



कै. कृष्णराव जागेश्वर भीष्म, जन्म–१८५४, मृत्यू–८-८-१९३५



कै. कृष्णराव जागेश्वर भीष्म ह्यांची मोहपा (जि. नागपूर) येथील समाधी.



कै. कृष्णराव जागेश्वर भीष्म ह्यांचे हस्ताक्षर

आमचा भारत हा अनेक संत पुरुषांच्या वास्तव्याने पुनीत झालेली भूमी आहे. कबीर, सूर, तुलसी, मीरा, रहीम हे अखिल भारतीय सुकीर्तीचे संत म्हणून ओळखले जातात. आमच्या महाराष्ट्रात तर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम या संत श्रेष्ठींनी तर उभा महाराष्ट्र गाजवला. अलीकडल्या काळात तर संत बाळेकुंद्रीकर महाराज, गाडगे महाराज, गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी महाराज व संत चूडामणी भगवान श्री साईनाथ महाराज यांनी आपल्या भक्तांना अभयदान देऊन त्यांची भरपूर सेवा केली. अनेक भक्तांसमोर चमत्कार करुन त्यांनी त्यांना अक्षरशः

चकीत करुन सोडले. या साऱ्या संतांची आठवण देश व त्यांचे भक्त आज करीत आहेत.

या संतांची सेवा तन मनानें करण्यासाठी अनेक भक्त मंडळी पुढे आली. त्यांनी या संत पुरुषांची अनेकविध सेवा केली. त्यांना जपले, त्यांची शुश्रूषा केली. संत साईबाबांची सेवा तत्कालीन अनेक भक्तांनी केली. गोदातीरी निवास करणाऱ्या या संत श्रेष्ठीच्या सहवासात अनेक मोठी विद्वान भक्त मंडळी आली. दाभोलकर, नूलकर, चांदोरकर, दिक्षित, बुटी, शामा देशपांडे, म्हाळसापती भगत, लक्ष्मण गणेश महाजनी इ. नावे सहज ओठावर येतात. नागपूरचे श्री. कृष्ण जागेश्वर भीष्म हे सुद्धा भक्त साईदरबारात त्यावेळी वावरले आणि त्यांनी बाबांची चिरकाल सेवा आरती अभंगरुपाने करुन ठेवलेली आहे. खरोखरच ही त्यांची महान सेवा होय. श्री. भीष्मांनी तयार केलेल्या श्री बाबांच्या बऱ्याचशा आरत्या सकाळी, दुपारी, सायंकाळी व रात्री शेजारतीस भक्तगणांकडून तालबद्ध व सूरावर रोजच्या रोज म्हटल्या जातात.

अशा श्री. कृष्णराव भीष्मांचा जन्म इ.स. १८५४ साली बोरी-जिल्हा नागपूर येथे झाला. त्यांचे बरेचसे शिक्षण नागपूरलाच झाले. त्यांचे जवळ जवळ सारेच शिक्षण मराठीतून झाले. शिक्षणानंतर त्यांनी शाळा खात्यात नोकरी केली. पुढे कायदेभंगाच्या राष्ट्रीय चळवळीतून त्यांनी भाग घेतला व देश सेवेच्या व्रताला वाहून घेतले. राष्ट्रीय कार्याला वाहून घेतलेल्या मंडळीनी कालांतराने आपापल्या नोकऱ्याही सोडून दिल्या होत्या. त्याप्रमाणे भीष्मांनीही आपली मास्तरकीनंतर पकडलेली महसूल खात्यातील नोकरी सोडून दिली व काही काळ शेती करण्यात घालविला. धर्मवीर डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार हे भीष्मांचे परममित्र होते.

१९१२ साली त्यांनी साईनाथ महाराजांचे प्रथम दर्शन घेतले. अमरावतीच्या दादासाहेब खापर्ड्यांशीही त्यांचे मैत्रीचे संबध होते. खापर्ड्यांनी त्यांना "शिरडीस चलता काय?" असा एकदा प्रश्न केला. तेव्हा होकार देऊन ते खापर्ड्यांचे समवेत शिरडीला गेले. तिथे त्यांना साईंचे दर्शन घडले, त्यांनी साईंना मनापासून नमस्कार केला. साईंबरोबर तिथे गोपाळराव गुंड, तात्या कोते, नाना निमोणकर, दामुअण्णा कासार, शामा यांचीही प्रथम भेट झाली.

श्री. कृष्णरावांची बाबांशी प्रत्यक्ष गाठभेट होण्यापूर्वी एक जबरदस्त घटना घडलेली आहे, ती अशी–

श्री. कृष्णरावांचे कुटुंब अवेळी निवर्तले. त्यामुळे त्यांच्या आयुष्यात पोकळी निर्माण होऊन त्यांचे चित्त साहजिकच अस्थिर झाले. त्यांच्या मित्रमंडळींनी व हितचिंतकांनी त्यांना पुन्हा विवाह करण्याचा सल्ला दिला खरा पण त्यांना तो पटला नाही. पुन्हा जबाबदारी कुणाचीही नको म्हणून त्यांनी त्या सल्ल्याकडे लक्ष दिले नाही. असेच दिवस कंठीत असताना शके १८३० श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस म्हणजे नारळी पौर्णिमेला त्यांना रात्री एक स्वप्न पडले. एक काळ्या रंगाचा पुरुष त्यांना दिसला. त्याने अंगाला केशरी रंगाची उटी लावलेली होती. कपाळाला त्रिपुंड्र होते व त्याच्या पादुकांचीही फूल गंध लावून पूजा झालेली होती. त्या पुरुषाने भीष्मांच्या हाती एक

वर्तमानपत्र दिले. तेव्हा भीष्मांनी त्यास विचारले, "तू बाबा कोण? तुझे नाव काय?" पण या प्रश्नांना त्या पुरुषानें कोणतीच उत्तरे दिली नाहीत, फक्त त्या वर्तमानपत्राकडे बोट दाखवून निर्देश केला तोच भीष्मांनी नजर टाकताच त्यांना 'सच्चिदानंद' ही ठळक अक्षरे दिसली. लगेच त्या पुरुषाने "ही अक्षरे वाच" अशी आज्ञा केली. भीष्म पुन्हा त्या वर्तमानपत्राकडे पाहू लागले तेव्हा त्यांना "मंत्र व शिकावा" असे एका ठिकाणी लिहिलेले होते ते दिसले. हे काय स्वप्न आपणाला पडले याचा अर्थ तरी काय असा प्रश्न त्यांना पडला. ते विचार करु लागले एवढ्यात ते वर्तमानपत्रही तिथे नाहीं व तो काळा वर्ण असलेला पुरुषही नाही. ते चकीत झाले. इतक्यात त्यांच्या मित्राने दार ठोठावले. त्या सरशी त्यांना जागा आली. त्यांनी आपले हे स्वप्न ताबडतोब आपल्या दैनंदिनी मध्ये लिहून ठेवले पण या स्वप्नाचा उलगडा त्यांना होईना.

काही दिवसांनी त्यांचे घरी एक गाणपत्य साधु आले. त्यांना त्यांनी हे स्वप्न सांगितले. तेव्हा त्यांनी सच्चिदानंद स्वामी तुमचे गुरु आहेत. असे सांगून 'शिकावा' हा मंत्र दिला.

पुढे भीष्म १९१२ साली खापर्ड्यांचे बरोबर शिरडीला गेले असताना, त्यांनी बाबांना नमस्कार केला बाबांनीही हात जोडले व 'जय सच्चिदानंद' असे बाबा म्हणाले. ते ऐकताच भीष्म घोटाळ्यात पडले. आपल्याला काही दिवसापूर्वी स्वप्नात दिसलेले सच्चिदानंद व हे एक की दोन असा त्यांना प्रश्न पडला. एक म्हणावे तर स्वप्नातील साधुपुरुष वैष्णव होते व साईबाबा तर मुसलमान दिसतात. बरे दोन म्हणावे तर बाबांनी आपल्यालाच पाहिल्याबरोबर सच्चिदानंदाचेच नाव कां घेतले? अशा भ्रमात ते पडले. साईंच्या भेटीच्या वेळी तिथे सर्व मंडळी बाबांचे चरणोदक घेत होती पण भीष्मांनी ते घेतले नाही. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत. भीष्म बाबांचे जवळ जरी बसले होते तरी बाबांनी त्यांना सुरुवातीस चिलीम पिण्यास दिली नाही. पण पुढे बाबांशीच गोष्टी चाललेल्या असताना एका सेवकाने चिलीम भरली व बाबांचे हाती ती दिली. बाबांनी ती त्यावेळी नुसती ओठास लावली व जवळ बसलेल्या भीष्मांना देऊन 'पी' असे म्हटले. त्यांचे आज्ञेप्रमाणे भीष्म चिलीम प्याले व बाबांचे हाती ती परत त्यांना दिली. बाबांनी ती घेतली व तोंडाने 'आपण सगळीकडे फिरतो. गड्या, मुंबई, पुणे, सातारा, नागपूर ही सगळी शहरे रामानी भरली आहेत, असे बोलून ते भीष्मांना चटकन म्हणाले, "अरे, तू लाडू एकटा एकटाच खातोस, आम्हास एकही देत नाहीस, आता तरी तू मला पाच लाडू दे." श्री साई प्रत्येक भक्ताकडे दक्षिणा मागत व त्याचा विनियोग ते परोपकाराकडे करीत असत हे सर्वांनाच माहीत आहे. बाबांच्या या बोलण्याचा भीष्मांचे मनावर योग्य तोच परिणाम झाला. आपल्याला नारळी पौर्णिमेला स्वप्नात दिसलेले सच्चिदानंद वेगळे व साईनाथ वेगळे ही अनेक दिवसांची भावना तात्काळीच मावळली व तीर्थ वाटप करणाऱ्याकडून त्यांनी मुद्दाम तीर्थ मागून घेतले व बाबांच्या पायावर डोके ठेवले. त्यावेळेस बाबांनी आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर दोन मिनिटे ठेवला.

नंतर भीष्म आपल्या बिऱ्हाडी गेले. पण या परक्या जागी आपण लाडू कसे काय करणार यांची त्यांना चिंता लागून राहिली. बरे लाडू केले तरी दुसऱ्याच्या मदतीने ते

केले हे बाबा नक्कीच ओळखणार. बरे त्यांनी अवघे पाचच लाडू मागितले ते कां? नुसते लाडूच का मागितले नाहीत? असा विचार मनाशी करीत त्यांनी सबंध दिवस घालविला. रात्री त्याच चिंतनात त्यांना झोप लागली पण लौकरच ती उघडली व एक श्लोक तयार करण्याची त्यांना स्फूर्ति झाली. लगेच तो श्लोक तयारही झाला. सकाळी त्यापुढील श्लोक ते करीत बसले. काकासाहेब दिक्षितांनी बाबांकडे जाताना वाटेत तो श्लोक पाहिला. काही वेळाने स्नान करुन भीष्मही बाबांच्या दर्शनास गेले. गेल्याबरोबर बाबांनी त्यांना लाडवांची आठवण पुन्हा करुन दिली. भीष्म त्यावर काहीच बोलले नाहीत, पण दिक्षित म्हणाले, "लाडू तयार होऊन राहिले आहेत." हे ऐकतांच श्रींची स्वारी स्वस्थ बसली. दुसरे दिवशी भीष्मांनी पाच श्लोक तयार केले. पुढे त्यांनी बरेच डोके खाजवले परंतु पाचापेक्षा अधिक श्लोक त्यांना त्यावेळी स्फुरले नाहीत. बाबांचे हातात पाच श्लोकांचा कागद दिल्यावर त्यांनी तो भीष्मांनाच वाचावयाची आज्ञा केली. ते श्लोक वाचीत असताना पुन्हा बाबांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. त्यावेळी त्यांचे मनाची जी काय स्थिती झाली ती शब्दात वर्णन करुन सांगता येणारी नाही, असे भीष्मांनी लिहून ठेवले आहे. त्यानंतर प्रत्येक कविता तयार करावी व बाबांना दाखवावी व त्यांचे आज्ञेने ती वाचून दाखवावी असा क्रम सुरु झाला व अशा तऱ्हेने 'श्री साईनाथ सगुणोपासना' हा श्री बाबांचा आरती संग्रह असा तयार झालेला आहे. यातील सर्व आरत्या स्वत: श्रींनी ऐकलेल्या आहेत हे विशेष होय. केवढी ही भीष्मांची जबरदस्त सेवा आहे पहा.

ही साईनाथ सगुणोपासनेची आरती पुस्तके १९२२ सालापर्यंत नामदार गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे स्वखर्चाने छापत असत, वाटत असत, पण नंतर साईबाबा संस्थानच्या स्थापनेनंतर भीष्मांचेच संमतीने नवीन नवीन आवृत्या काढल्या गेल्या आहेत. श्री बाबांच्या आरती संग्रहाची ही अशा प्रकारची कथा आहे. सध्या या सगुणोपासनेची ३५वी आवृत्ती बाहेर पडलेली आहे.

खापर्डे यांच्या बरोबरच भीष्म शिरडीला गेले होते. याचवेळी नेमका रामनवमीचा उत्सव साजरा करण्याची बाबांनी संमती दिली. रामजन्माचे पावित्र्य लक्षात घेऊन रामजन्म साजरा करावा अशी इच्छा बाबांनी भक्त मंडळीकडे केलेली होती, ती कल्पना सर्वांनाच पसंत पडली. यावेळी कीर्तनाची अडचण भीष्मांनीच दूर केली. त्यांनी स्वत: रचलेले रामजन्माख्यान सांगण्याचे ठरविले. काकामहाजनींनी पेटीची साथ करण्याचे कबूल केले. राधामाईंनी आपल्या घरातला सुंदर पाळणा आणून द्वारकामाईत ठेवला. गुढ्यातोरणे सर्वत्र उभारली गेली व रामजन्माच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. बाबा प्रथम शांत होते. त्यांनी स्वत: काकांच्या गळ्यात एक हार घातला व दुसरा कीर्तनकार म्हणून भीष्मांच्या गळ्यात घालण्यास दिला. केवढे भाग्य या भीष्मांचे!

पुढे भीष्म किर्तनकार म्हणूनही साईदरबारात गाजले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. ब्रह्मर्षिविश्वामित्र, रामायणातील राक्षस, साईनाथ सगुणोपासना, भक्तराज जटायू, रामाची अवतारात गणना, परशुराम पराभव, रामायण ही कादंबरी की इतिहास.

सीतादेवीचा अग्नीप्रवेश, अहिल्योद्धार, गुरुप्रसाद, समुद्रदर्शन, सुवर्णमृग, रामेश्वरदर्शन अशी १३ पुस्तके त्यांची प्रकाशित असून लंकादहन, अंगावतरण, रामाचे सैन्य, सीतादेवी, रामभक्त हनुमान, दशरथाश्वमेध असे त्यांचे हे लिखाण अप्रसिद्ध असे आहे.

श्री साईचे परमभक्त श्री कृष्ण जागेश्वर भीष्म हे मोहपा येथे दिनांक ८ ऑगस्ट १९३५ रोजी साईचरणी विलीन झाले. त्यांचे नातू श्री. रमेश दिनकर भीष्म हे सध्या पुणे येथे कायम वास्तव्य करुन आहेत.

# झंकारत ही वीणा

झंकारत ही वीणा सुस्वर
    लहर लहर उठते
गीत मी तुजसाठी गाते ॥धृ॥

मोरपीस मी सुंदर होते
    तुझिया किरीटावरी बैसते
मोरपिसाच्या डोळ्यामधुनी
    प्रेम गीत गाते — गीत मी ॥१॥

मी वेळूची मुरली होते
    तव अधरावर नित्य राहते
सात स्वरांना आळवून मी
    मधुर गीत गाते — गीत मी ॥२॥

मी तालाची टिपरी होते
    सुरावटीवर रास खेळते
टिपरी नादे रास रंगता
    मीच रंग होते — गीत मी ॥३॥

पदकमलाची मी छुम-छुम-छुम
    नाच नाचते रुम झुम रुम झुम
नाच गायनी मी समचरणी
    एकरुप होते — गीत मी ॥४॥

— **श्री. नारायण चिपळूणकर**
श्री सिद्धारुढ बिल्डिंग,
७५, भवानी शंकर रोड,
दादर, मुंबई-२८.

# श्री साईबाबा आणि श्री दादामहाराज पाटगावकर

सौ. सुनंदा एच्. दैवज्ञ
सरस्वती निलय, कामत बिल्डिंग,
होसमने एक्स्टेंशन, शिमोगा.



श्री दादामहाराज



श्री साईबाबा

आपली पवित्र भारतभूमी खरोखरच सुवर्णभूमी आहे. आजतागायत या पुण्यभूमीत हजारो संतमहात्मे होऊन गेले. आज आहेत व पुढेही होत राहतील. अनेक संताच्या परमात्मप्राप्ती करिता अनेक परंपरा व संप्रदाय निर्माण झाले आहेत. त्यात नवनाथांची मुख्य परंपरा पुढील श्लोकात गुंफली आहे.

गोरक्षजालंदरचर्पटाश्च अडबंगकानिफमछिंदराद्या ।
चौरंगिरेवाणकभर्त्रिसंज्ञा S भूम्यां बभूवुर्नवनाथसिद्धाः ॥

याच परंपरेतील श्री जालंदर संप्रदायात कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूरपासून जवळच एका खेड्यात पाटगांव येथे श्री. बाळकृष्ण केशव वैद्य या नावाचे एक थोर संत होऊन गेले, हेच श्री सद्‌गुरु दादामहाराज होय! संसारी अज्ञानी जनांच्या हातून, पिशाच्चपीडा व इतर संसारातील दुःखे निवारण होण्यासाठी, जप तपादी सेवा, श्रीगुरुचरित्र पारायणे, व्रतवैकल्ये इत्यादि होणे शक्य नाही, हे जाणून हे कार्य त्यांनी हाती घेतले, व लक्षावधी लोकांना दुःखमुक्त करुन भक्तीचा मार्ग दाखवून दिला.

शिरडीचे श्री साईबाबा व श्री दादामहाराज हे समकालीन. जगाचे कल्याण व्हावे. मोह, माया, क्रोध, लोभ या प्रापंचिक जाळ्यातून लोकांची मुक्तता करावी, त्यांना स्वधर्मी लावावे, यासाठी या महापुरुषांनी कलीयुगात जन्म घेतला.

श्री दादामहाराज व श्री साईबाबा हे समकालीन. एक पाटगांवात तर एक दूर शिर्डीला. दोघांनी एकमेकांना कधी पाहिले नव्हते, पण अंतरांतून ते दोघे एकच

होते. दोघांचे संदेश एकमेकांना जात येत असत. यासंबंधीच्या दोन कथा पुढे देत आहे.

मुंबईच्या एका गृहस्थास भूतबाधा झाली होती. झपाटलेल्या अवस्थेत तो गृहस्थ इतका अनावर होई की, त्याला बांधून घालावे लागे. अशी बाधा झालेल्या गृहस्थास त्याच्या नातेवाईकांनी उपचारासाठी साईबाबांकडे आणून त्यांच्या समोर त्याला उभे केले. त्याला पहाताच साईबाबा म्हणाले, "अरे, ये जबरदस्त सैतान है। इसका इलाज मेरे पास नही। इसको पाटगावके बाला के पास ले जाव और उसको बोलो मैने भेजा है।" साईबाबांच्या सांगण्याप्रमाणे ती मंडळी पाटगांवचा शोध घेत,पंधरा दिवसांनी येऊन पोहोचली. त्या दिवशी सकाळीच श्री दादामहाराजांनी जवळच्या मंडळीना सांगून ठेवले होते की, शिर्डीच्या साईबाबांकडून आज एक जबरदस्त पिशाच्च येणार आहे. ती मंडळी पाटगांवी आल्यावर श्री दादामहाराजांची राहणी सामान्य माणसाप्रमाणेच असल्याचे त्यांना दिसले. साईबाबांनी सांगितलेला बाळ कोण, हे काही त्यांना ओळखता आले नाही. पण त्या पिशाच्चाने बरोबर ओळखले. दादामहाराजांचे दर्शन होताच त्याने पायावर लोळण घेतली. दादांनी त्या व्यक्तीला आठ दिवस ठेवून घेतले व त्या सैतानाला मुक्ती देवून त्या गृहस्थाला सोडविले.

एकदा एका भक्ताने दादांचे दर्शन घेऊन परत जाताना 'मी आता शिर्डीला जाणार आहे' असे सांगितले. तेव्हा दादामहाराजांना अत्यंत आनंद झाला व त्यांनी साईबाबांना देण्यासाठी एक जरीचे उपरणे दिले व सांगितले की, 'ही घडी बाबांच्या हाती दे व नमस्कार कर, काही बोलू नकोस.' शिर्डीस जावून त्या गृहस्थाने उपरणे साईबाबांना अर्पण केले व न बोलता त्यांच्यासमोर हात जोडून उभा राहिला. साईबाबांनी ते उपरणे डोक्याला गुंडाळले व ते आनंदाने नाचू लागले. तोंडाने, 'मेरे, बालाने मुझे जरी की धोती भेजी है। मेरा बाला कितना अच्छा है।' असे ते म्हणत होते. तो संबंध दिवस बाबा ते उपरणे डोक्याला बांधून होते व भेटेल त्याला, 'ये देखो मेरे बालाने दि हुअी धोती कितनी अच्छी है।' असे म्हणून ती भेट त्याला दाखवीत होते. अशाप्रकारे त्या दोन महान योग्यांची एकात्मता होती. या संबंधातील पुढे दिलेली घटना तर आणखीनच अतर्क्य आहे.

विजयदुर्ग खाडीलगतच्या मुटाट गावचा विष्णू घाटे हा दादामहाराजांचा भक्त होता. तो दर गुरुवारी न चुकता महाराजांचे दर्शनास येई. त्याच्या मनात महाराजांनी आपल्या घरी पायधूळ झाडावी असे फार होते. महाराज त्याला 'येईन' असे म्हणत. पण प्रत्यक्ष ते कधी गेले नाहीत. त्यामुळे विष्णू घाटे निराश झाला, व त्याने अगदी काकुळतीने विनविले, "महाराज, तुम्ही नक्की कधी येणार ते सांगा. नाहीतर 'येणार नाही' असे तरी सांगा." तेव्हा महाराज म्हणाले, "विष्णू, मी तुझ्याकडे पंधरा दिवसांनी येईन. तोपर्यंत तू एक काम कर. शिर्डीला जाऊन साईबाबांना भेटून ये." विष्णूने ते मान्य केले व शिर्डीस जाण्यापूर्वी तो महाराजांचा निरोप घेण्यासाठी आला. महाराजांनी त्याला पेढ्याचे दोन पुडे दिले व 'त्यापैकी मोठा साईबाबांना दे व लहान

तुझ्या घरच्या मंडळींना वाटून टाक.' असे सांगून त्याला बजावले की, 'तू प्रथम मुंबईला जाणार आहेस, तर पैसे जपून ठेव. सर्व पैसे एकाच खिशात ठेवू नकोस. एखाद्या खिशातील पैसे गेले, तरी दुसऱ्या खिशात पैसे असल्याने अडचण पडत नाही. नीट लक्षात ठेव.'

विष्णू घाटे घरी आला. सामानाची बांधाबांध करताना चुकून लहान पुडा सामानात बांधला व मोठ्या पुड्यातील पेढे घरात सर्वांना वाटून टाकले. घरुन निघाल्यापासून शिर्डीला पोहचण्यास चार दिवस लागले. प्रथम त्याने महाराजांच्या सांगण्याप्रमाणे दोन तीन खिशांत पैसे ठेवले होते, पण मुंबईहून शिर्डीस जातेवेळी मात्र नेहमीच्या सवयीप्रमाणे एकाच खिशात सर्व पैसे ठेवले. विष्णू शिर्डीला पोहचला तेव्हा बाबांच्या भोवती बरीच मंडळी बसलेली होती. त्यातून वाट काढून विष्णूने साईबाबांच्या हातात पुडा दिला व त्यांना नमस्कार करुन तो समोर हात जोडून उभा राहिला. पेढ्यांचा पुडा हातात घेऊन तो त्यांनी उलटसुलट करुन पाहिला व ते विष्णूला एकदम रागावून म्हणाले, "अरे चोरा, माझे पेढे खाल्लेस व मला हा लहान पुडा देतोस काय? हरामखोर, तुला शिक्षा केली पाहिजे." आणि त्यांनी त्याच्या एका खिशातील सर्व पैसे काढून घेतले व पुन्हा सरबत्ती सुरु केली, "हरामखोरा, मी काय तुझ्या बापाचा देणेकरी लागतो काय? मला सारखा घरी बोलावतोस? मी काय रिकामटेकडा आहे का रे? याद राख, परत मला बोलावलेस तर. बघ, तुला पाहिजे तर तू येत जा."

बाबांची ही वाणी ऐकून विष्णू घाबरला व मनात काय समजायचे ते समजला. दादा व बाबा यांचे काय नाते आहे, याची त्याला कल्पना आली. 'आपण राहोनिया दूर । हलवी कळसूत्रीची बाहूली ॥' अशी दादांची योग्यता असल्याचे त्याला पटले. त्याने साईबाबांचे पाय घट्ट धरले व त्यांची करुणा भाकली, "बाबा, मला क्षमा करा. मी तुमचे लेकरुं तू माझी आई. लेकराला पदरात घ्या." विष्णूची मनोमन प्रार्थना ऐकून बाबांचे मन, हृदय द्रवले. त्यांनी त्याच्या पाठीवरुन हात फिरवून त्याला पोटाशी धरले व म्हणाले, "अरे, तू माझ्या बाळाला ओळखले नाहीस. तो प्रत्यक्ष शंकर आहे, दत्त आहे. सर्व काही तोच आहे. त्याला उगाच त्रास देवू नकोस. उद्या परत जा."

विष्णू द्वारकामाईत स्वस्थ बसला होता. पोटात भुकेचा डोंब उसळला होता. खिशातील सर्व पैसे तर बाबांनी काढून घेतले होते. त्याच्याजवळ एकही पैसा शिल्लक नव्हता. काय करावे, हे त्याला सुचत नव्हते. पण संतमहात्म्यांच्या भूमीत आपण आहोत. आपले सद्‌गुरु व साईबाबा हे एकच आहेत. ते माझी सोय केल्याशिवाय राहणार नाहीत, असाही त्याला विश्वास वाटत होता. म्हणून तो स्वस्थ होता. इतक्यात एक वयस्कर गृहस्थ त्याच्या जवळ आले. त्यांनी विष्णूची विचारपूस केली. त्याला 'काही काळजी करु नकोस' म्हणून सांगितले. ते गृहस्थ म्हणाले, "मीही मुंबईला चाललो आहे. मी तुम्हाला मुंबईला तुमच्या भावाच्या घरापर्यंत पोहचवितो. चला उठा. आता जेवण करुया. मग विश्रांती घ्या. उद्या सकाळी आपण निघूया." तेव्हापासून त्या गृहस्थाने विष्णूची सर्व व्यवस्था केली व त्याला मुंबईस आणून सोडले. तो गृहस्थ

मुंबईच्या गर्दीत कोठे नाहीसा झाला, हे कांही विष्णूला समजले नाही.

दोन दिवस मुंबईत राहून विष्णू घरी आला व दुसरे दिवशी महाराजांच्या दर्शनास गेला. महाराजांपुढे लोटांगण घालून त्यांना म्हणाला. "महाराज, मला शिक्षा करावयाची होती, तर तुम्हीच का नाही केलीत? इतक्या दूरवर कशाला पाठविलेत?" महाराज म्हणाले, "अरे, सोनाराने कान टोचले म्हणजे बरे असते." या घटनेपासून दादामहाराजांची शक्ती त्याला कळून चुकली व त्यांच्यावर तो मनापासून भक्ती व सेवा करु लागला.

'प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थसुविवेका' हे महाराजांनी आपल्या आचरणाने जगाला दाखविले.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारे ॥

श्री. सखारामजी बेलवलकर, रा. मुंबई व पुण्याचे भाऊराव आठवले हे दोघे श्री दादामहाराजांचे लाडके भक्त होते. महाराजांचे त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम होते. त्यांच्या सनिध्यात ते बराच काळ होते. समर्थांचे चमत्कार त्यांनी फार जवळून पाहिलेत. बाळशास्त्री जांभेकर सारख्या श्री क्षेत्र काशी येथे अभ्यास करुन, वेदशास्त्र संपन्न झालेल्या, दशग्रंथी शास्त्रीबोवांनी, महाराजांचा सहवास लाभावा म्हणून काशी क्षेत्र सोडून पाटगांवी मुक्काम ठोकला. त्यांच्या मतानुसार, त्या काळात प्रत्यक्ष काशी विश्वेश्वरच पाटगांवी श्री दादा महाराजांच्या रुपाने वास करीत होता.


अशा या थोर पुरुषाने बालपणापासून दुःखी, कष्टी, व्याधीग्रस्त, भूतबाधा झालेल्या असंख्य व्यक्तींना पीडामुक्त करण्याचे कार्य अविरतपणे व आमरण केले. अखेरपर्यंत भक्तांवर वात्सल्यप्रेम करीत राहिले. अशा प्रकारे कार्य करुन इ.स. १९४१ साली कार्तिक वद्य ६ ला श्री दादामहाराज ब्रह्मस्वरुपी विलीन झाले.

आजही आम्हा भक्तगणांना श्री दादामहाराज यांचे चमत्कार, त्यांची प्रचिती अनुभवास येत आहे.

तुझ्या कृपेने व्हावे तुझे स्मरण सदा ।
अन्य कांही मज नको, सद्‌गुरु दादा ॥

## बडोद्यात साईभक्त संमेलन

श्री साईनाथ भक्तपरिवार या संस्थेतर्फे बडोदा येथे १० व ११ ऑक्टोबर ८७ रोजी अखिल भारतीय साईभक्तांचा भव्य मेळावा भरविला जात आहे. संमेलनास हजर रहाणाऱ्या भक्तांनी त्वरीत संपर्क श्री. मधुकर अंबाडे, अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर, दांडीया बाजार येथे साधावा.



# अध्याय तेरा

– डॉ. सुमन खानवीलकर
बॉंबे पूना रोड
लोणावळा

आकारे सूत्रमय अति लहान । अर्थ गांभीर्ये अतिगहन
व्यापकत्वं बहु विस्तीर्ण । संकीर्ण तरी तितुकेच
ऐसे ते बाबांचे बोल । अर्थे तत्त्वें अति सखोल
कल्पांतींही नव्हती फोल । समतोल आणि अनमोल

खरंच, वरील श्लोक तंतोतंत खरा आहे. प्रत्येक शब्दात किती अर्थ भरला आहे. त्यामुळे पोथीचे श्रद्धायुक्त वाचन, मनन केले तर सुखाला तोटा नाही. कारण सुख म्हणजे आत्मिक समाधान, हे पटते.

यामुळे बाबांनी या संसारी लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी अध्याय "तेरा" निवडला. तेरा हा शब्दच इतका गोड आहे. मी तेरा सब तेरा. मेरा मेरा करुन आपली कर्म जमा करण्यापेक्षा, सब कुछ तेरा म्हणणे म्हणजे आपले काहीच नाही, अर्थात आपण सुखी. जसे आपल्याजवळ धन दौलत नसली की, जशी चोरांची भीती नाही. तसे आपली कर्मच तयार होत नाहीत कारण आपण सारे परमेश्वराला देऊन टाकले ना की षढरिपू चोरांची भीतीच नाही.

तन मन धन से । जो होवे मेरा । समज लो फीर मैं हूं तेरा
बाबाका आशिश है ये न्यारा । इसिलीये बाबा है हमारा प्यारा.

या अध्यायात संसारी जीवनातले सार आहे. आपण संसारी माणसे अशांत आहोत. शारीरिक, मानसिक, आर्थिक कोणत्या ना कोणत्या त्रासाने गांजलेले आहोत. त्यामुळे कोणालाच सुख शांती नाही. तरी ती का मिळत नाही व कशी मिळू शकेल, हे सांगितले आहे.

पूर्वापरानुसंधान रहावे । यथा प्राप्तानुवर्ती व्हावे
नित्य तृप्तसदा असावे । नसावें संचित कदापि

माणसाने कर्म करण्याचे न सोडता, जे वाट्याला आले ते करावे. त्यात कोणाचा दोष म्हणू नये. आपले कर्म आपण आनंदाने परमेश्वरावर भार टाकून करावे. कारण संसारी माणूस नेहमी निरनिराळ्या अपेक्षा धरुन असतो, त्या पुऱ्या झाल्या नाहीत की दु:ख होतो.

प्रत्येकाला वाटते मीच कष्ट का करायचे? साऱ्यांसाठी मीच नमतं घ्यायचे, मीच सारा खर्च करायचा, असे का, असे का? अशा अनेक विचारांनी जीवांचा संताप चाललेला असतो. घरात अशांती माजते. सुखाचा क्षण वाट्याला येत नाही.

तेव्हा बाबा या अध्यायात सांगतात, मागील जन्मजन्मांतरीच्या पाप-पुण्याप्रमाणे तुला हिशेब देण्यासाठी हा जन्म मिळाला आहे. तरी तुला बुद्धी दिली आहे. सारासार

विचार करुन तुझी कर्तव्यं कर्म आनंदाने कर नी मागील ऋणातून मोकळा होच. पण आळसाने च दुसऱ्याला दोष देत कर्म करु नको कारण ते पुढील जन्मासाठी बाकी राहील.

तेव्हा प्रारब्धानुसार आलेले कर्म आनंदाने कर, काळजी करत बसू नको, समाधानी रहा. खरंच,आपण स्वतःला व इतरांकडे जर पाहिले,तर ज्याच्या वाट्याला जे आलेले असते, त्यात तो सुखी नसतो. नी मग निरनिराळे विचार करुन तर्क लढवितो व पुढील जन्मासाठी निरनिराळ्या कर्मांची झाडे लावतो. आणि त्यांची फळे खाण्यासाठी जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडतो.

आपण पूर्व प्रारब्धानुसार जन्माला तर आलो. आता तुम्ही काय करा, ते पण बाबा सांगतात. प्रथम मायेपासून सावध रहा. ती महानटनाटकी आहे.

अरे जिने माझ्यासारख्या फकीराला सतवायला कमी केले नाही, नव्हे नव्हे देवादिकांना सतवायला कमी केले नाही, ती तुम्हाला कशी सोडील? तेव्हा तिला सोडण्यासाठी काय करा, प्रथम माया म्हणजे काय ते पाहू.

माया म्हणजे कोणत्याही गोष्टीबद्दलची आसक्ती. संसारातल्या बारीक सारीक वस्तूंपासून, आप्तेष्ठांपर्यंत असणारी आसक्ती, तीच आपल्याला दुःखी करते. व बंधनांत पाडते, मनाची चलबिचल करते, मनाला मरकटायला लावते नी मोहात पाडते, दुःख करते नी पुढील जन्मासाठी बऱ्यावाईट कर्मांचा साठा करते. कारण माणसाची धडपड सुखासाठी असते. दुःखाला तो टाळू पहातो. पण दुःख मात्र बरोबर त्याला शोधत येते. आपण झटकले तर उलट चिकटते, पण माणूसखरे सुख कशात आहे, हे समजूनच घेत नाही.

माया कधी त्रास देते. जेव्हा आपण काय करु, कसे करु, असे वाटून निराश होतो. मनस्वास्थ्य लयाला गेलेले असते व वातावरण निरस होते. कारण आपले आचारविचार संकल्प तसे आजूबाजूचे वातावरण तयार होते. आपण आनंदी वातावरण आनंदी म्हणून अशा निराशाजनक वातावरणाचा माया फायदा घेते व झडप घालते. अर्थात आपणच तिला बोलावतो.

तसेच ही माया संसारी जीवनात सतावतेच. परंतु ज्या परमेश्वराने आपल्याला मानव जन्माला घातले, बुद्धी दिली, त्या परमेश्वराच्या भक्तीत रमू लागलो, त्यांचे चिंतन मनन करु लागलो, की ही नाना तऱ्हेचे विचार, संकल्प विकल्प मनात आणून त्याच्या पासून दूर करण्यासाठी धडपडत असते. कारण एकदा परमेश्वराचा हा झाला तर हा आपल्या हातून जाईल, तिला इतका राग येतो. ती मग निरनिराळी आमिषे दाखवून भुलवत असते. त्या तिच्या खेळाला आपण भुलतो आणि तिच्या आहारी जातो.

तेव्हा बाबा सांगतात, अरे बाळांनो, असे करु नका, तुम्ही परमेश्वराला शरण जा, सतत त्याच्या स्मरणात रहा, कसे ते पहा, बाबा काय म्हणतात.

विना अविच्छिन्न हरिभजन । माया निरसन नाहे पां

जेव्हा सतत तुम्ही परमेश्वरी चिंतनात,स्मरणात, ध्यानात रहाल, त्याला एक सेकंद सुद्धा विसरणार नाही, तेव्हाच माया तुमचा पिच्छा सोडील.

कारण परमेश्वर हा भावभक्तीचा भुकेला आहे. परमेश्वराला काही नको असते. द्यायचे असेल तर तुमचे मन द्या. तुम्हाला दानाची, उदारतेची सवय लागून तुमचा मोह थोडा थोडा कमी होत जावा, यासाठी हे सारे नियम केलेले आहेत.

न लगे मज पूजासंभार । षोडश वा अष्टोपचार
जेथें भाव अपरंपार । मजला थार ते ठायीं
ऐसे बाबा वेळोवेळा । बोलून गेले भक्त जिव्हाळा

पहा किती थोडक्यात संतुष्ट आहे हा साई. मला तुमचे काही नको, फक्त मला तुमचा प्रेमळभाव, निष्ठायुक्त भक्ती पाहिजे, की मी तुमच्या जवळच आहे,नव्हे तुमच्याच आहे. माझ्यावर विश्वास पूर्ण भार टाका, सतत माझे चिंतन करा.

"खा अक्रोड पिस्ते बदाम" । येणें पटकीस पडावा आराम
शब्दचि बाबांचा विश्वासधाम । शंकेचे काम ना तेथें

कुणाची मोडोशी, कुणाचा क्षयरोग, उलटी-जुलाब. नानाभक्तांचे नाना रोग श्रद्धायुक्त भावामुळे बरे झाले, कीत्येकांना जिवदान मिळाले, बाबांचे बोल म्हणजे शंका घेण्याच कामच नाही. श्रद्धायुक्त भक्तीने परमेश्वराला भक्तांचा दास बनावे लागते.

जुलाबावर हे काय औषध । परी औषध तो संतांचा शब्द
देतील तो जो मानी प्रसाद । तया न अगद आणीक.

अर्थात औषधापेक्षा संताच्या शब्दांवर विश्वास निष्ठा. त्यामुळे जे औषध सांगितले, ते बरोबर आहे की नाही, याचा विचारच केला नाही. ओल्या जमिनीवर झोपायचे कसे, छे बाबांनी सांगितले ते बरोबरच. बाबा म्हणाले, बरा होशील ठीक. दृढ विश्वास अर्थात संपूर्ण श्रद्धा साईवर, साईच्या शब्दावर. मग रोग का बरा होणार नाही?

केवळ बाबांचा शब्द प्रमाण । तेंच औषध रामबाण

या कलीयुगात सुख मृगजळासारखे आहे. ते तुम्हाला भुलवते आहे, तरी तुम्ही त्यांना फसी पडू नका. शांती अशा र्‍याच्यात शोधू नका, उलट अशांत व्हाल.

सत् नी संत संगत धरा म्हणजे तुमच्या जीवनात खरा मार्ग सापडेल. शाश्वत अशाश्वत सुखसमाधान कशात आहे. काय चुकते आपले ते समजेल. सज्जनांची किंवा संतांची संगत भाग्यानेच मिळते, कारण ती फार दुर्मिळ असते.

तथापी भाग्यें संतदर्शन । हें एक व्याधीचें उपशमन
व्याधिग्रस्त मगव्याधींचें सहन । दुःखेंवीण सहज करी
व्याधी दावी भोगदारुण । संत ठेवी दृष्टी सकरुण
तेणें भोक्तृत्व दुःखावीण । संत निवारण करितात.

जसे हिऱ्या जवाहीऱ्याच्या दुकानात गर्दी कमी असते, मिरची मसाल्याच्या दुकानात चिक्कार गर्दी, तशी संतांकडे गर्दी कमी पण पिक्चर, भांडण, मारामारी अलोट गर्दी.. कारण हे सारे रोजच्या व्यवहारातले अर्थात बुद्धीला पेलणारे असते. कारण

जन्मोजन्मीचे या देहावर संस्कार झालेले असतात ना, संतवाक्य पेलणारी नसतात.

संताचा सहवास हा सुगंधी फुलासारखा असतो. फुल मातीत पडले तर मातीला वास देते, मातीचा वास घेत नाही. तसे संत दुर्जनांमुळे बिघडत नाहीत, दुर्जनांना सुधारतात.

पण आपण माणसे संताच्या संगतीत जातो, प्रवचन, किर्तन ऐकतो, मनाला पटते. तेथून येताना आपसात किती ज्ञानी माणूस, खरच, या संसारात काही अर्थ नाही बघा.

घरी येताच माशीसारखी पलटी खातो. माशी जशी मध दिसला तर अगदी पोटभर खाते, इतक्यात घाणीकडे लक्ष जाते आणि ते ठिकाण सोडून त्याच्यावर आनंदाने ताव मारते. अगदी असेच आम्हा संसारी जीवांचे होते.

सत् व संत संगतीत रमतो, पण संसारात आलो की, माया मोहाच्या चिखलात रमतो आणि परत असमाधानी होऊन जगत असतो. नवीन नवीन प्रारब्ध तयार करत असतो. तरी माणसाने मागील जन्मीचे प्रारब्ध आनंदाने संपवावे व पुढच्या जन्मासाठी शुद्ध आचरणाने, सत् व संत संगतीने सुख शांती समाधान मिळेल, अशी कर्मे करावीत.

*******

# कोजागिरी

कोजागिरीचे टिपूर चांदणे पडले चौफेर  
कोजागिरी साजरी जाहली शिरडी नगरीत  
पाहूनी मुखकमल साईचे मंत्रमुग्ध झाले  
भावसमाधीमध्ये तत्क्षणी रंगुनिया गेले  
हसत पाहती साई मजकडे हस्तपुढे केला  
म्हणती तुझियासाठी आणिला दुग्धाचा पेला  
पिऊन टाक तू दूध झडकरी नको करू अनमान  
दूध नव्हे हे अमृत वेडे होशिल आयुष्मान  
म्हणून स्वहस्ते ओठी लावला दिव्यामृत पेला  
काय तयाची रुचि वर्णावी नसे तया तुलना  
'साईनाथ की जय' शब्द हे कानावर पडले  
भावसमाधी तदा उतरली भानावर आले  
कोजागिरीचा पूर्ण चंद्रमा होता नीलांबरी  
सौम्यशीतल तेज झळके साई वदनावरी

**— सौ. उषा भास्कर जोशी**  
साईप्रसाद, ४२, श्रीकृष्णनगर,  
बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.

# अनुपम अनुग्रह

– सौ. उषा अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड,
रत्नागिरी.

श्रीबाबांच्या विश्वासास पात्र झालेले, बाबांविषयी अनन्य निष्ठा असणारे,बाबांचे जे काही भक्त होते,त्यात श्री. दादासाहेब खापर्डे यांचा वर नंबर लागतो. ते अमरावतीतले प्रसिद्ध वकील. पैशांचा ढीग पुढ्यात पडत होता. अतिशय विद्वान पण कसलाही गर्व नाही. प्रथम शेगावच्या श्रीगजानन महाराज यांचेकडे भक्तीभावाने जात असत. लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली तेव्हा श्रीगजानन महाराजांना त्यांचे सुटकेसाठी ह्यानीच साकडे घातले होते. श्रीगजानन महाराजांच्या समाधीनंतर त्यांच्याच आज्ञेने ते शिरडीस जाऊ लागले. श्रीबाबांचे प्रथमच दर्शन त्यांना आकर्षण ठरले. अनेक वेळा प्रत्यक्षच श्रीबाबांच्या लीला पाहून, त्यांचे अगाध, अफाट सामर्थ्य पाहून त्यांचे चित्त साईचरणी स्थिर झाले. श्रीबाबांचे काही भक्त बाबांच्या तोंडाशी तोंड देत, हुज्जत घालीत,पण खापर्डे यांची श्रीबाबा हे प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत,ही खात्री असल्याने ते शांतपणे बसून राहात. श्रीबाबांविषयी प्रेम भक्ती वाढत गेली,तसतसे त्यांचे शिरडीत अधिक वास्तव्य होऊ लागले. त्यामुळे सौ. खापर्डे वहिनीपण त्यांचेबरोबर येऊन राहू लागल्या. एकदा ग्रंथीज्वराची साथ शिरडीत येऊन, त्यांच्या लहान बाळाला त्या साथीने घेरले. तेव्हा त्यांनी श्रीबाबांना त्याला वाचवा म्हणून विनविले. श्रीबाबांनी त्याचे दुखणे स्वत: घेऊन आईचे कष्ट वाचवले व बाळाचे प्राण वाचवले. श्रीबाबांना आपण स्वत: क्लेश दिले, याचे त्यांना वाईट वाटले. त्याचबरोबर श्रीबाबा परमेश्वरच आहेत, ही भावना दृढ झाली. आपण आपल्या परमेश्वराची दररोज काहीतरी सेवा केली पाहिजे,या भावनेने त्या रोज नैवेद्याचे ताट तयार करुन,मशिदीत (द्वारकामाईत) नेऊन,श्रीबाबांना अर्पण करीत. श्रीबाबांनी नैवेद्य ग्रहण केल्याशिवाय त्या स्वत: अन्न ग्रहण करीत नसत. श्रीबाबांनी अनेकवेळा नैवेद्य ग्रहण करण्यास विलंब लावला पण त्या परिक्षेत त्या उतरल्या. त्यांनी आपला नेमधर्म सोडला नाही. एके दिवशी त्यांनी शिरा, पुरी, चटणी, कोशिंबीर, वरणभात, पापड अशा पदार्थांनीयुक्त असलेले ताट भरुन भक्तीभावाने ते श्रीबाबांच्या पुढ्यात नेऊन ठेवले. त्यावेळी इतर भक्तांचीही ताटे आलेली होती. कोणाचे श्रीखंड, कुणाची बासुंदी, कुणाच्या पुरणपोळ्या तर कुणाचा साखरभात होता. काहींची ताटे तर चांदीची होती. त्याकडे ढुंकूनही न पहाता,श्रीबाबा आपल्या जागेवरुन उठले व भोजनाच्या जागेवर जाऊन बसले आणि खापर्डे वहिनींचे ताट ओढून त्यांनी जेवायला सुरवात केली. श्री. माधवराव देशपांडे त्यावेळी जवळ होते. त्यांचा स्वभावच चिकित्सक असल्याने संतांच्या वागण्यात असा भेदभाव का, असा त्यांना प्रश्न पडला. शिवाय हा प्रकार रोजचाच असल्याने आज त्याची शहानिशा करायची,असे ठरवून ते बाबांना म्हणाले,

"देवा, तू पक्षपाती आहेस. अरे कितीजणांचे उत्तमोत्तम पक्वान्नांनी भरलेले नैवेद्य तुझ्या पुढ्यात आहेत. अनेक नेत्र आतुरतेने तुझ्याकडे बघत आहेत. त्यांचेकडे न पहाता,हे शिरापुरीचे साधे जेवण तू जेवतो आहेस. बाकींच्यांचा तुझ्या ठिकाणी तसाच भक्तीभाव नाही का? तसा नसता तर पंच पक्वान्नानी भरलेली ताटे तुझ्या पुढ्यात कशी आली असती? हेच अन्न तुला जास्त गोड का लागते? वेळेनुसार तू चांदीची ताटेही भिरकावतोस व हिचेच अन्न खातोस. तुझे गारुड तुलाच माहीत. मला मात्र आज याचे उत्तर हवे आहे.

श्रीबाबा मनमोकळेपणाने निर्मळ हसले आणि म्हणाले, "श्याम्या, या अन्नाची गोडी तुल काय सांगू?" ही स्त्री पूर्वी एका वाण्याची लठ्ठ दुधाळ गाय होती. नंतर ती कुठे नाहीशी झाली. मग माळ्याकडे जन्माला आली. नंतर क्षत्रियाकडे गेली. त्यानंतर ब्राह्मणाच्या पोटी जन्माला आली आणि लई दिसांनी माझ्या नजरेला पडली आहे. तिचे सगळे जन्म मला ठाऊक,ते तुला कसे कळणार? लई दिसांनी तिच्या हातचे गोड घास खायला मिळतायत आणि मी ते खातोय,ते तिची माझ्यावरची दृढ श्रद्धा आणि निर्व्याज निरपेक्ष भक्ती म्हणून. मी तिला तिचा परमेश्वर वाटतो. माझ्या मुखी घास गेल्याशिवाय ती अन्नग्रहण करीत नाही. दादासाबच्या श्रीमंतीने ती चढून गेली नाही. तिने माझी जी सेवा चालवली आहे, जी भक्ती करीत आहे,त्या भक्तीला मी पावणार नाही, असं कसं होईल? एवढे बोलून तृप्ततेचे ढेकर देत श्रीबाबा पानावरुन उठले. त्यांनी हात धुऊन टाकले व आपल्या आसनावर येऊन बसले. श्रीबाबांनी अन्नग्रहण केले,याचा आनंद वाटून खापर्डे वैनी श्रीबाबांजवळ येऊन बसल्या व त्यांचे पाय दाबू लागल्या. तो देखावा पाहून श्री. माधवरावांनी श्रीबाबांची चेष्टाही केली, पण बाबांनी त्याकडे दुर्लक्ष केले. कारण तो क्षण सौ. खापर्डे वैनींच्या भाग्याचा होता. ज्या हाताने त्या बाबांचे पाय दाबत होत्या. तो हात हातात घेऊन श्रीबाबा म्हणाले, "आये, दुसरं काही करु नकोस.फक्त 'राजाराम – राजाराम' असं म्हण. याने तुझं चित्त शांत होईल आणि तुला परम सुख लाभेल. उपाशी राहून, आत्म्याला तळमळत ठेऊन,तू माझी भक्ती केली नाहीस म्हणजेच माझे विचार तुला पटले, त्यावर मी खूष झालो आहे. तुझे कोटकल्याण होईल" श्रीबाबांचा प्रत्यक्ष परमेश्वराचा हात आपल्या हातात आहे, आपला परमेश्वर आपल्याशी बोलत आहे, गुह्यातले गुह्य आपणाला सांगत आहे, या विचाराने खापर्डे वहिनींना गहिवरुन आले. त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरले. आपल्या साध्यासुध्या सेवेला शिरडीश्वर भुलला व त्याने आपल्याला हवे ते दिले. या विचाराने त्या कृतार्थ झाल्या. त्यांनी आपले अश्रू मुळीच आवरले नाहीत. द्वारकामाईत अन्य भक्त होते,ते हा प्रकार पहात होते, पण झालेला प्रकार म्हणजे सौ. खापर्डे वहिनींवर अनुग्रह आहे, हे त्यांना कसे कळणार? तो देणाऱ्याला आणि मिळणाऱ्यालाच ते समजणार. या अनुग्रहाने खापर्डे वहिनींचं कल्याण झाले. त्यांचे चित्त साईचरणी कायमचे स्थिर झाले आणि त्यांचे जीवन श्रीसाईकृपाशीर्वादाने पूर्ण सुखात,मानसिक शांतीने उजळून निघाले.

# श्री साईबाबांचा पैसा (२)

– श्रीमती शालिनी देसाई
एम्.एस्सी., एम्. फिल्.
२१ राजस,
अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६९.

**'सबूरी'**

आपण सर्वांनी 'बाबांचा एक पैसा' (श्रद्धा) यावरील विवेचनाचा अभ्यास केला. ('साइलीला' मार्च १९८७) यावर आणखी बरेच लिहिण्यासारखे आहे, पण पानांच्या संख्येचा विस्तार वाढवण्याऐवजी जरुरीपुरते आपण जाणून घ्यावे,या इच्छेने,बाबांच्या इच्छेने व कृपेने तो लेख लिहिला. 'मागणे लई नाही । पोटापुरती देई देवा॥' असे सन्तानी म्हटले आहे. रणरणत्या उन्हात वाऱ्याची एक मन्द झुळूक काय सांगून जाते? तिचे जे महत्त्व, तेच आजच्या या जगात कृपाळू सन्तांच्या दुर्मिळ वचनाचं महत्त्व. ज्यांच्या हे ध्यानी आले, ते महद्‌भाग्यवान. गगनाला गवसणी घालणाऱ्या योगेश्वर साईंची अफाट शक्ती. ती सर्व सामान्य जनांना कशी कळणार? त्यांना समजावे म्हणून साईबाबा अगदी सोप्या भाषेत बोलून जात. अंधारात लावलेल्या दिव्याप्रमाणे या मोहमयी अंधकारी दुनियेत अध्यात्मज्ञानाचा किंचित् कवडसाही पृथ्वी मोलाचा वाटतो आणि म्हणूनच बाबांच्या बोलाचं चिन्तन बरच काही सांगून जातं. याकरिता आपण बाबांचा पैसा "सबूरी" याचा चिन्तनशील अभ्यास करण्याचा प्रयत्न करु. कृष्णयजुर्वेदातील श्वेताश्वतरोपनिषदांत ब्रह्मवादी ऋषि अशीच जगत्‌कारणाची अभ्यसन-मीमांसा करीत असता ध्यानयोगात गढून गेले आणि त्यांना त्याचं उत्तर दर्शन रुपांत स्वतःजवळच आढळलं. तसंच साईबाबांच्या अनमोल बोलाचं चिन्तन करीत असतां अचिन्त्य साईतत्त्व आपल्याला गवसतं का ते पाहू.

'श्रद्धा' आणि 'निष्ठा' या मराठी शब्दांचा उगम जसा संस्कृतमधून तसाच 'सबूरी' या शब्दाचे मूळ अरबी भाषेत. 'भाषासु मधुरा रम्या' आणि तेवढीच प्रखर ओजस्वी वेदाची भाषा देववाणी संस्कृत,त्याचप्रमाणे कुराणातील प्रेषितांची हृदयंगम नुकत्याच उमलणाऱ्या नर्गिसी फुलांची नजाकती भाषा.अरबी संस्कृतचे जसे प्राकृत रुप मराठी, तसे अरबीचे प्राकृत उर्दू,यावरही अनेक भाषांचा प्रभाव होऊन त्याचे वेळोवेळी रुपान्तरही होत गेले. 'सबूरी' हा मूळ अरबी स्त्रीलिंगी शब्द. त्याचा अर्थ धैर्य किंवा धीर असा होतो. पण अरबीच मातृभाषा असणारे भक्त कुराणाचे वाचन त्यावर हुकूम करत असतां 'सबूर' न म्हणता "सबर" म्हणतात. हा बोली पाठभेद ('नमाज पढते' वेळचा) आहे. तर श्री साईबाबांना या शब्दाने काय सांगायचे आहे? तर "धीर धरीं रे धीरापोटीं । असती मोठी फळे गोमटी ॥" "सबर" शब्दाचा उल्लेख असलेला केवळ एक फातिहाचा अर्थ अत्यन्त शुद्ध अन्तःकरणाने आणि निर्मळ मनाने पाहिला तर

अगदी सहज ध्यानात येईल बाबांना काय म्हणायचं ते– 'रञ्ज और तकलीफ मे **सबर** और नमाजसे मदद किया करे और बेशक नमाजगरा है मगर उन लोगोंपर जो आजिजि करनेवाले है जो यकीन किए हुए है कि वह अपने परवर दिगारसे मिलनेवाले है और उसकी तरफ लौट कर जानेवाले है।'– कुरान ए शरीफ सुरा २।४५ पवित्र कुराणातील सुरा २च नाव आहे 'अल् बकरह' (Al Buqurah = The Cow) यांत परमेश्वरप्राप्तीसाठी लागणारी प्राथमिक साधना भक्तांसाठी सांगण्यात आली आहे. यात प्रमुखत्वे विनम्रता, दुःख आणि संकटात धीर आणि प्रार्थना या तीन गोष्टी अगदी आवर्जून सांगितल्या आहेत. (संदर्भ The holy Quran — English Translated by Marmaduke Pickthel Urdu translated fateh muhmmad jallendur 1985 Ed. publi. by Taj Co. 3151 Turkman Gate Delhi) यातील दुःख आणि संकटकाळी **धीर** (सबूर) यालाच श्री साईबाबांनी प्राधान्य दिले आहे. हे कामधेनुचे पयोमृत बाबांनी अत्यन्त सोप्या भाषेत भक्तांना सांगितले आहे. जसे बोंडल्याने अगदी लहान मुलाला आई दूध पाजावी तसे–

'धैर्य तीच गे बाई सबूरी। ...... ॥'– ५३

'पुरुषाचे पौरुष ती ही सबूरी। ........ ॥'– ५४ श्री साई सच्चरित, अध्याय १९. तसेच 'सबूरीची जोड अटळ। परमार्थ सबळ तयांचा ॥९२ श्री. सा. च, अ. २३. अगदी नेमके हेच श्रीमद्भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे, 'यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ। समदुःख सुखं **धीरं** सोऽमृतत्वाय कल्पते॥' गीता अ. २/१५ अर्थ– 'हे पुरुषश्रेष्ठा, सुखदुःख समान मानणाऱ्या ज्या धीर (ज्ञानी) पुरुषाला हे ('इन्द्रिय विषयांच्या संयोगामुळे होणारे सुखदुःख' – अ. २/१४ गीता) पीडा देत नाहीत, तोच मोक्षाला योग्य होतो. तत्पूर्वी अ. २/श्लो. १३ मध्ये धीर पुरुष शरीराविषयी मोह पावत नाहीत– 'धीरस्तत्र न मुह्यति।' असे भगवन्तानी म्हटले आहे. ज्याच्याकडे सहनशक्तिचे धैर्य, तो धीर पुरुष नुसता मोक्षाचा अधिकारीच नव्हे, तर ज्ञानीच ठरतो. कठ उपनिषदातही (८/४६) धीर पुरुष 'ज्ञानी' याच अर्थाने वापरला आहे.

आत्मज्ञानासाठी लागणारी प्राथमिक तयारी म्हणजे साधन चतुष्टय (विवेक, वैराग्य, शमादि षटक् व मुमुक्षुत्व) यातील शमादि षटकांतील [१)शम २)दम ३)श्रध्दा ४)उपरम ५)समाधान आणि ६)तितिक्षा] सहावा गुण म्हणजे सबूरी. श्री साईबाबांनी श्रध्दा आणि सबूरी (तितिक्षा) हे कमीत कमी दोन तरी गुण भक्तांचे अंगी बाणावेत म्हणून कळकळीने या दोन पैशांची मागणी केली. गीतेत अ. २/१४ मध्येही याचा उल्लेख केला आहे. **'मात्रास्पर्शास्तु कौन्तेय ....।.... तांन्स्तितिक्षस्व भारत ॥'** तितिक्षा म्हणजे क्षुधा, तृषा, शीत, उष्ण, रोग, दुःख ("रञ्ज") व पीडा ("तकलीफ") हे सर्व कशावाचून सहन करणे (व्याख्येसाठी 'पंचदशी'-विद्यारण्य संदर्भासाठी पहाणे) या शास्त्रोक्त शब्दांचं महत्व बाबांनी अगदी थोडक्यात सुलभतेने सांगितलं, 'धीर धर', 'धीराने घे' किंवा 'थांब थोडसं' अगदी हळूवारपणे सहज समजेल असंच. जसं की, आपण बस येण्याची वाट पहातं ताटकळतो आणि (बहुतेकवेळा नाईलाजानेच) ते कंटाळवाणं, जीव घेणं बसची वाट पहाणं आपण सहन करतो. ही जणू प्रतीक्षेमध्ये

तितिक्षा. पण ही सोशिकता वा सहनशीलता अगदी सहजतेने आनन्दाने जो पेलतो, तो धीर पुरुष. त्या धीर पुरुषाच्या धैर्याला बाबांनी पुरुषाचे पौरुषत्व, तेच धैर्य तेच सबूरी म्हटले आहे. ज्या स्वभावगुणामुळे तो चारही पुरुषार्थ साधू शकतो (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) यासाठी सबुरीचं महत्व श्री साईबाबांनी सांगितलं आहे. वेद असोत वा कुराण, ज्यांना हा सबूरीचा सहजानन्द साधला, तो ज्ञानी (धीर पुरुष) ध्येयाप्रत पोहोचतो, अशी श्री साईबाबांची वाणी अमृततुल्य, आनन्दमयी वैखरी बाबांच्या भक्तांसाठी सहस्त्रधारांनी चित्स्पन्दाचे कारंजे फुलवते. असा हा बाबांचा पैसा! याचा आपण अगदी थोडक्यात सारांशाने गोषवारा काव्यरुपाने पाहू—

अडचणी येतां
चाले कुरबूर ।
बाबा म्हणताती
"जरा धरा धीर" ॥१॥

मनाचा आवेग
काही आटोपेना ।
'सबूरी' धराया
शक्ति द्या हो मना ॥२॥

दौडत धांवते
मनाचे हे तट्टु
विषय पहातां
होते तेथे लट्टु ॥३॥

काय म्हणावे या मना
मुळी नावरे कामना ।
बाबांसी अर्पूया
सर्व तया वासना ॥४॥

साईसी समर्पितां,
दिसेल 'सबूरी' ।
मनाला उमगेल
बात भली बूरी ॥५॥

बाबांचा हा पैसा
किती तरी मोठा ।
नाही ठरणार
कदापिही खोटा ॥६॥

एका सबूरीने
गवसेल साई
धीर धरी मना
नको करु घाई ॥७॥

किती जन्मांची हो
सबूरी लागे गांठी ।
तेव्हां दृष्टि पडे
गुरु जगजेठी ॥८॥

भेद मुळी नाही
गुरु तोचि सांई
"बाबा – शपथ" सांगे
शालिनी देसाई ॥९॥

टीप : ज्या ईश्वर निष्ठांच्या सौजन्याने कुराण शरीफचा अभ्यास करता आला, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख अधुरा राहील म्हणून प्रेम व आदरपूर्वक त्यांची नावे नमूद करीत आहे.

(१) वयोवृद्ध तपस्वी सन्त अवलिया कोळगाववाले बाबा-कोळगांव, नगर.
(२) पीरजादे नगरवाले बाबा – नागपाडा, मुंबई.
(३) एक साईप्रेमी भक्त – लखनौ
(४) श्री. युसुफभाई काझी (चाचा) पेशइमाम मशीद – पाटण, गारगोटी, जि. कोल्हापूर.
(५) (मञ्जूभाभी) सौ. खानताई, ६१ राजस, अंधेरी, मुंबई–६९.

# ॐ नमो गुरु दत्तात्रेयाय

श्री. शशिकांत पाठक
५१४/अ, मंगळवार पेठ,
"चैतन्यधाम", सातारा.



ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे
त्या त्या स्थळी हे निज रुप तुझे
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥

या जगात जो आला, तो जाणार, हे त्रिवार सत्य आहे, पण आला (जन्माला) तो जाणार (मृत्यूपर्यंत) इथपर्यन्त काय करणार? व जे काही केले ऐहीक, तेसुद्धा जाताना बरोबर येणार नाही. आपले घर, बायका, माणसे, मुले, श्रीमंत असेल तर त्याची श्रीमंती अर्ध्यावरच टाकून जावे लागेल. कोठलीही धनदौलत किंवा ऐहिक सुख हे बरोबर घेवून जाता येणार नाही. एवढेच काय, शरीराची साधी मूठभर राख जाताना बरोबर नेता येणार नाही. सर्व काही इथल्या मातीतच ठेवून निघून जायचे. जसे पाव्हण्यासारखे जसा आपला यजमान ठेवील, तसे आपण राहतो तसे राह्यचे. जसे इश्वराने आपणास ठेवीले तसे आहे, यात समाधान मानून राहण्यात सुख आहे.

मी जो आत्मा आहे, त्याचा शोध घेवून त्या इश तत्वाच्या आनंदाच्या आविष्कारात डुंबून जायचे पण अशा डुंबण्याच्या वेळी चांगला मार्गदर्शक, पथसंचालक, भेटला तर तो ज्ञानाच्या प्रकाशात, भक्तिच्या प्रांगणात अन श्रद्धेच्या कल्पतरुखाली नेवून मोक्ष,

पूर्णावस्था, कैवल्यपद, ब्रह्मपद अशी जी शून्यावस्थेपुढील दैदिप्यमान दालने आहेत, त्यातून प्रवास करीत शेवटी ब्रह्मरुपी आनंदाच्या डोही, -आनंदाचे तरंग इश्वराचे अंगी इश्वर दंग दिपासी नाही दिपतरंग । तैसे होई इशत्वे इश्वर । जे हे अध्यात्म निखळ ज्ञान आहे. ते स्वतःचे स्वतः श्रीगुरुकृपेने अनुभवण्याचे असून इथे गुरु कृपा झाल्यास ते विज्ञानाच्या पलीकडे बुद्धीच्या पलीकडे की ज्याला नेती नेती म्हणतात अशा स्वरुपाकडे घेवून जो जन्म मरणाच्या सोहळ्या पलिकडील आनंदाच्या सोहळ्याकडे नेतो.

जेथे दुःख नाही, सुख नाही, अज्ञान नाही किंवा ज्ञान नाही पण केवळ चैतन्यमय असे आनंदाचे स्तोत्र आहे, जेथे जरा मरण नाही अशा स्थितीला नणारी या विश्वातील एकच शक्ती म्हणजे गुरु व ती म्हणजे कलीयुगातील दत्त अवतार व तेच विद्यमान सर्व जगतांचे चराचर सृष्टीचे आदिशक्तीचे, आदि मायेचे आदि ज्ञानाचे सकलधर्मांचे प्रणेते सकलमंत्राचे मंत्राक्षर तर सकल मानवतेचे कारूण्यमूर्ती, दयेचे दिव्यमूर्ती, ब्रह्मांडाची ब्रह्मांडमूर्ती, आकाशाची पोकळी, तारकांचे तेज, पंचमहाभूतांचे प्रणेते, नादब्रह्म, अक्षरब्रह्म व ज्योतीर्ब्रह्म स्वरुप असून तेच पूर्ण ब्रह्म असून त्यांच्याच दिव्य अशा रुपाने ते आपणांस सद्‌गुरु लाभलेले आहेत. त्यांचाच संदेश आज निनादत आहे.

संदेश- १) सत्य, दया, क्षमा, शांती, प्रेम या पांचाच्या रुपाने तत्व होते. २) ज्ञान, भक्ती, वैराग्य, त्रिपुटीने साधन होते. ३) श्रद्धा, निष्ठा द्वयीने रुप साकारते. ४) सर्वस्वाच्या दानाने (तन, मन, धनाने) ज्ञान प्रकाशते. ५) सर्व समर्पणाने (गुरुचरणार्पणाने, म्हणजे संपूर्ण दिल्याने) इश्वरमय होते. ६) भावातीत व परिपूर्ण बुद्धी बुद्धीसहीत आत्मार्पणाने निर्गुण निराकार परब्रह्म स्वरुपमय होते.

येथे नाही जात पात, फक्त तेजोमय मानव धर्माचे उत्थान, येथे नाही कोणतेही धर्मबंधन, फक्त मनाचे असावे सदा निर्मळ. येथे कोणत्याही भूमीचे नाही बंधन, फक्त आहे वात्सल्यमय प्रमळ कुशीतील आईचे प्रेम, इथे नाहीत कोणतेही विकार, केवळ शांतीचा खरा आधार, इथे केवळ असत्याचा नाही बाजार, तर आहे सत्यंशिव व सुंदरतेचा मिलाफ, इथे नाही लढाया भांडण तंटे, तर आनंदे नांदतील दया क्षमतेचे वीर कणखर, इथे नाही सुख दुःख, प्रेमात सारे हरवतील विश्वही विश्व, केवळ आनंदही आनंदाचा काळ. श्रद्धा, निष्ठा नेतील आम्हांसी मार्गातून, जरी तुफान ज्ञान, भक्ती, वैराग्याच्या जोरावरे जीवनांचे गलबत हाकारु.

या विशिष्ट अफाट मायेच्या सागरातून सर्वस्वाचे दान देवून अज्ञान अंधःकाराला हरवून ईश भक्तीच्या मिताने वल्हवू हे जहाज सर्व समर्पणाने सर्व शक्तीने पैलतीर गाठू, ईश्वरमय त्या किनारपट्टीचे. शेवटी तिथेच एकरुप होवू, ॐ सोहंस्वाहा, ॐ शांती शांती शांती च्या तेजोमय तेजश्रीत. हा आहे दिव्य संदेश, ही आहे धवल वाट, हा आहे प्रकाश, स्वयंप्रेरणा, स्वयंप्रकाशित संबंध ब्रह्मांडाला उजळणारा ज्ञान दिप, ज्ञान प्रकाश, ज्याच्या गतीची तुलना करता मन अवगुंठीत होते. ताऱ्यांची प्रकाश वर्षे क्षणात संपतात, नादांचा नाद या महाकाशात लीन होतो. तेजांची उजळण तारे तारे

तुटून होत आहे. त्याच्या पलीकडे आहे केवळ शांती शांती शांती. आपण या अनुभवा आणि देवदू प्रेशीत न होता, केवळ इश्वरस्थ होतो, व सर्व ईश्वरमय होवो.

पैसा, अडका, घरद्वारा, बायका-मुले, सोने-चांदी, जमीन-जुमला इतकेच काय पण नोकरी-चाकरी, कारखाना अथवा सिनेमा ही सर्वच अल्पकालीन सुखे आहेत, अशाश्वत आहेत, पण शाश्वत सुख परमेश्वराच्या सगुण अगर निर्गुण भक्तीत आहे. सगुण म्हणजे गुणसहीत गुण म्हटले म्हणजे डोळ्यांना दिसणारे रुप आले व त्या रुपाने आतापर्यंत जे जे चांगले कार्य केले, जे जे भव्य दिव्य केले, ते सर्व सगुण, की ज्यामुळे मानवी मनाला सुख दिले, तो आंतरबाह्य सुखावला व अशा श्रेष्ठ गुणांचे जे संकिर्तन, त्यास आपण भक्ती म्हणतो. ती हृदयापासून निघाली पाहिजे. तिच्यात प्रेम, वात्सल्य, आदर आणि तिव्रता असली पाहिजे. मग तो सगुणरुपाला आत्यंतिक व्याकुळता असता आपणांस दर्शन देतो, दिसतो, बोलतो, हसतो, खातो, नाचतो व तो आपल्याला रामकृष्ण गोविंद विठ्ठल, तोच अल्ला, तोच जीझस या येशूच्या रुपाने दिसतो, अवतरतो. तोच गुरु नानकांच्या रुपाने, तर तोच शंकराचार्य, ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, राघवेंद्रस्वामी, स्वामी रामकृष्ण, स्वामी विवेकानंद तर महर्षी वाल्मिकीऋषी, नारदमुनी यांच्या रुपांत, म्हणजे कधी देव तर कधी ऋषीमुनींच्या तर कधी साधुसंतांच्या स्वरुपात भेटतो.

आपला देह हा दृष्य स्वरुप असल्याने, प्रथम मानवाला हा त्याच्या समाधानासाठी त्या सगुण रुपाच्या पायरीवर दृश्य स्वरुपातच मनात साठवलेल्या रुपातच परमेश्वर दर्शन देतो. त्यालाच आपण सगुण साकार रुप म्हणतो, पण जेव्हा सगुणाकडून निर्गुणाकडे वळावयाचे, तेव्हा आपणालाही, म्हणजे मनालाही निर्गुणावस्थेत नेणे अगत्याचे आहे. जसे लाकूड घेतल्यास त्यात अग्नी आहे, पण तो आपणास दिसत नाही परंतु तेच लाकूड घासताच अग्नी तयास होऊन दिसतो. अग्नी असून न दिसणे ही निर्गुण अवस्था परंतु घासल्याने सगुण व निर्गुण यांचे ज्ञान झाले. तसेच परमेश्वर ही शक्ती आहे. ती प्राप्त करण्यासाठी का होईना, निर्गुण मन करणे भाग आहे.

निर्गुण म्हणजे गुणातील अत्यंत स्वच्छ, कलंक रहित पाण्यासारखे निर्मळ व जशी गंगा समुद्राला मिळाली म्हणजे गंगा न रहाता समुद्रच होते. तसे आपले मन, चित्त आत्मा हा परमेश्वराला येवून मिळाला म्हणजे मग आपणही निर्गुण परमेश्वरच होतो. परंतु हा अवघड घाट चढताना सद्गुरुंची आवश्यकता फार आहे व यातून आपणास सद्गुरुंना निवडून काढणे व त्यांनी आपणास आपलेसे करुन गुरुशिष्य म्हणून घेणे, ही काही सुलभ व सोपी गोष्ट नाही व आता अनेक संप्रदाय, अनेक गुरु, अनेक साधूसंत, महंत, फकीर, मौला, फादर, मदर व त्यांच्या देवदेवता अनेक आहेत व यातून निवड करावयाची म्हणजे सर्वस्वी सामान्य माणूसच काय पण ज्ञानी माणसाला सुद्धा संभ्रम पडतो की, कोणत्या देवतांची आराधना करावी, अगर कोणत्या साधूमहंताकडून, गुरुकडून हे ज्ञान प्राप्त करावे.

कारण आता पूर्वीसारखे पूजा, पाठ, स्तोत्र, मंत्र करण्यास वेळ नाही, जागा नाही, दोन्ही आहे पण शांतता नाही व ज्याच्याकडे हे सर्व आहे, त्याकडे श्रद्धा नाही.

परंतु तुम्ही भांबावून न जाता तुम्हास एकच दैवत की सद्‌गुणांनी नटले आहे. ज्याच्यांत पूर्णपणे ज्ञान आहे व जे या विश्वाचे विश्वगुरु आहेत.या त्रिगुणशक्तीचे व स्वयंगुरु आहेत की,जे या कलीयुगात न जन्म घेताच अवतरले आहेत व जन्म नसल्यामुळे मरण ही अवस्था नंसल्याने, जन्ममरणरहीत अवस्थेत या पृथ्वीवर मानवाचा उद्धार करण्यासाठी अवतरले आहेत,की जे नुसत्या स्मरणाने संतुष्ट होतात. त्याच्या गायनाने आनंदीत होतात. व त्यांच्या पूजनाने ते स्वयंदर्शन देतात, ज्याच्यात योग, ज्ञान,भक्ती व वैराग्य हे सर्व एकाच ठिकाणी पहावयास मिळते. असे हे ज्ञान संपन्न, विचार संपन्न, दयाळू, कृपाळू, अज्ञान बाहू मूर्ती श्री दत्तगुरु, की ज्यांनी युगानुयुगे अवतार आता रुपांचे एक रुप, तीन गुणांचे एकच गुण व तीन शक्तींचे एकच पीठ, ते म्हणजे ब्रह्मदेव, की जो विश्वाचा विश्वकर्ता. विष्णु, की जो विश्वाचा, ब्रह्मांडाचा नियंता, पालनकर्ता व महादेव, जो या विश्वाचा, ब्रह्मांडाचा लय म्हणजे प्रलय कर्ता आहे. अशा तीन देवतांत्री, तीन गुणांत्री तीन शक्ती देवतांत्री एकच देवता म्हणजे दत्त हे अवतरले आहेत.

अशा या रुपाला शरण गेल्यास त्यांचे संकिर्तन भक्तीयुक्त गायन केल्यास,त्याची सहज सुलभ प्राप्ती होऊन, ज्ञान,भक्ती,वैराग्य पाहून आपण मानव जातीचे कल्याण व स्वतःच्या मानवी जन्माचे सार्थक करुन घेण्यात आजच दृढनिश्चयपूर्वक प्रयत्न करा व मार्गदर्शन मिळवा,ही सर्व दत्तगुरुंची प्रेरणा आहे.

## श्रीसाईलीला
## नूतन नाविन्यपूर्ण लेखमाला
## श्री साईबाबा उवाच

श्री सद्‌गुरु साईनाथांचा 'श्री साईसच्चरित' हा जगातील एक अद्वितीय असा ओवीबद्ध चरित्रग्रंथ आहे. स्वतः श्री बाबांनी या ग्रंथातील काही अध्याय ऐकलेले आहेत व या ग्रंथाला शुभाशिष प्रदान केले आहेत. मुंबापुरीतील ज्येष्ठ नि वयोवृद्ध साईभक्त उद्योगपती व श्री साईलीलाचे एक चोखंदळ वाचक श्री. डी. जी. उर्फ आबासाहेब देशपांडे यांनी या श्री साईसच्चरित्रातील अगदी नेमकीच श्री साईनाथांनी उच्चारलेली, म्हटलेली, बोललेली, उपदेश केलेली अशी बहुमोल चरण-वाक्ये हुडकून काढून त्यांचा संग्रह तयार केला आहे. संपूर्ण चरित्र ग्रंथातील अध्यायांचे वाचन, मनन करुन त्यांनी हा तयार केलेला संग्रह साईभक्तांसाठी सादर केला असून तो "श्री साईबाबा इति उवाच" या नावाने साईलीलाच्या येत्या जानेवारी १९८८ च्या अंकापासून अध्यायानुसार क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमचे वाचक या नूतन लेखमालेचे स्वागतच करतील.

# आत्मकल्याण

**सौ. निर्मला चि. राजे**
लिला भुवन, राजारामपुरी,
७वी गल्ली, कोल्हापूर.

आजचा लिखाणाचा विषय मी आत्मकल्याण हा घेतला आहे.

सत्संगतीचा व श्री साईचरण सेवेचा महिमा फारच गोड व मार्मिक आहे. या संसार सागरातून निभावून नेण्याला श्री साईबाबांची भक्तीरुपी नावच समर्थ आहे. श्री साईबाबा स्वत: दयाळू होऊन स्वत: सुकाणू घेऊन बसतात व प्रत्येक वेळी मार्गदर्शन करतात. त्यावेळी त्या नावेला कोणतेही भय नसते. पैलतीरी पोहोचणार हे नक्कीच.

आपण नेहमी दुसऱ्याच्या कोणत्याही उचित कार्यात मदत करण्यात चंदनासारखे झिजले पाहिजे. झिजल्यानंतर त्या सुंगधाचा सुवास सर्वत्र दरवळणे, म्हणजेच आत्मकल्याणाचा अेक छोटासा अनुभव संत व भक्त मंडळी ज्यावेळी अेकमेकाला भेटतात, त्यावेळी परमेश्वरभक्तीचे व ज्ञानाचे अनुभव एकमेकांना कथन करतात. ते भक्ती ग्रंथात नमूद केलेले आहेत. ते वाचून जो आनंद मिळतो, तो फक्त निस्सीम भक्तच जाणतात. त्यातच ते आपले कल्याण आहे, असे मानतात.

माझे वैयक्तिक मत असे आहे की, आत्मकल्याण म्हणजे काय, तर ते म्हणजे आपण परमेश्वराला आपल्यातच शोधणे. यासाठी पाळावयाची साधने म्हणजे, एक खरे बोलणे, इतरांना जेवढी मदत करता येईल तेवढी करणे, आपल्याकडे कोणी काही विचारण्यासाठी अगर मदतीसाठी आले तर शांतपणे ऐकून घेणे व आपल्याला जे ज्ञात आहे ते सांगणे, अगर देणे या सर्व आत्मकल्याणाच्या पायऱ्या आहेत.

बाबांच्या ठायी भक्त रक्षणाचे ब्रीद कायमचे घास करुन असते. त्यांच्या चरणकमलापाशी कोणी रक्षणासाठी प्रार्थना केली आणि त्याचे रक्षण झाले नाही, असे कधीही झालेले नाही. या प्रसादासाठी आपणास तपश्चर्या करणे आवश्यक असते.

आपण आपल्या आत्मकल्याणासाठी दैनंदिन जीवनात कोणत्याही गोष्टीचा वृथा अभिमान न धरता श्री साईबाबांचा नामस्मरणाचा अखंड जप करणे जरुरी आहे. त्यामुळे आपल्या मनाची योग्य ती मशागत होऊन ते फक्त चांगल्या कार्यासाठी व निस्सीम भक्तीसाठीच उद्युक्त होईल.

जसा ज्याचा भाव तसा त्याचा अनुभव. श्री साईबाबांचे अस्तित्व हे प्रत्येकाच्या भावनेचे व श्रद्धेचे स्थान आहे. त्याच्या ठिकाणी ज्या गुणांचे अस्तित्व मानावे, ते गुण अनुभवास येतात. बाबा तर परिपूर्ण व सर्वगुणसंपन्न आहेत. निरनिराळे लोक आपआपल्या कल्पनेप्रमाणे व सांसारिक गरजेप्रमाणे श्री साईबाबांवर श्रद्धा ठेवून त्यांना भजतात. त्या सर्वांना त्याच्या श्रद्धेप्रमाणे फळे मिळतात. बाबांकडे कोणताही भेदभाव नाही. श्रीमंत-गरीब, लहान-मोठा, उच्च-निच, पुरुष-स्त्री सर्वांना श्री साईबाबा सारखेच मानतात. हे जे भेद भाव अस्तित्वात आहेत, ते मानवानेच निर्माण केले आहेत. श्री साईबाबा कधीही भेदभाव करत नाहीत. ते शुद्ध प्रेमाच्या भक्तीचे

भुकेले आहेत. सर्वकाळी भक्तांच्या रक्षणासाठी श्री बाबा धाऊन जातात,हा माझा दृढ विश्वास आहे. बाबांशिवाय आपल्याला दुसरा कोणीही त्राता नाही.

दुसरे आत्मकल्याणाबाबत मला असे वाटते की, बाबा सर्व चराचर व्यापून राहिले आहेत. सर्व ठिकाणी, सर्व प्राणीमात्रामध्ये त्यांचे अखंड अस्तित्व असते. श्रीबाबांनी श्रद्धा व सबुरी ही जी दोन नाणी आपणाला दिली आहेत,त्यांचा ह्या संसारात चांगल्या तऱ्हेने उपयोग करुन घेतला पाहिजे. तो फार मोठा ठेवा आहे व त्याचे खऱ्या अर्थाने जतन केले पाहिजे.

आता आपण श्रद्धा या नाण्याचा विचार करु. श्रद्धा म्हणजे विश्वास. आपण एकदा का बाबांवर विश्वास ठेवला व त्याला थोडाही तडा जाऊ दिला नाही, तर बाबा आपल्याला दुप्पट फळ देतील. बाबांवर विश्वास ठेवणे,म्हणजे श्री साईबाबारुपी बँकेत भक्तीरुपी मुद्दल ठेवण्यासारखे आहे. बाबा आपल्याला त्याचे दामदुप्पटीने व्याज देणार.हे व्याज म्हणजेच त्यांनी आपल्या भक्तीला दिलेले फळ. त्यांच्या आशीर्वादाने आपण आपले आयुष्य चांगल्या तऱ्हेने व्यतीत करु शकू,हा झाला आत्मकल्याणाचा एक भाग.

दुसरे नाणे म्हणजे सबुरी. सबुरी म्हणजे शांततेने व चिकाटीने घेणे. बँकेत पैसे ठेवल्यावर आपल्याला लगेच त्यावर व्याज मिळत नाही. काही काळ थांबणे आवश्यक असते. एकदा का हे दैवी व्याज मिळाले,की मानव आपले जीवन शांततेने व धैर्याने जगू शकतो. बाबा म्हणतात, कोणतीही गोष्ट सबुरीने व शांततेने घ्या. एकदमच सर्व प्राप्त होऊ शकणार नाही. खरोखरच श्रद्धा व सबुरी ही दोन नाणी म्हणजे बाबारुपी बँकेने दिलेले अनमोल व्याजच होय. सबुरी हा आत्मकल्याणाचा दुसरा भाग आहे.

आपण रोजची साधना करताना आपले आत्मकल्याण साधले पाहिजे. एकनिष्ठपणे आचरण करीत राहिले म्हणजे प्रत्येक संकटाच्यावेळी बाबा आपले अस्तित्व प्रकट करुन भक्ताचे रक्षण करणार हे नक्कीच. असा आजपर्यंतचा पुण्यमार्गाने गेलेल्या सर्व भक्तांचा अनुभव आहे. असे असून सुद्धा अनेक जन्माच्या पुण्याईने ज्यांना हा मार्ग प्राप्त झाला आहे, अशा सद्‌भक्ताच्या मनात काहीवेळा संशय व अश्रद्धा निर्माण होते. त्याचे कारण एवढेच की,त्यांचे मन पूर्णपणे बळकट व निश्चयी झालेले नसते. हा कलिकालाचा महिमा आहे. या काळात प्राप्त झालेला परमार्थ मार्ग सुद्धा आक्रमण करणे फार कठीण आहे. कोणत्याही गोष्टीची संसारात निश्चिती नसल्यामुळे आघात वेळोवेळी होऊन मन पुन्हा अस्थिर होते व मनाला नैराश्य येते,हे सर्व बाबांच्या नामस्मरणाने नष्ट होते. शरण आलेल्या भक्तांचा सर्व भार बाबा आपल्यावर घेतात. तुमचे सदैव रक्षण करण्यास 'हे मी माझे कर्तव्य समजतो' अशी ग्वाही बाबा देतात. सारांश,बाबा आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करत नाहीत. आपण बाबांच्या भक्तीत व सेवेत एकरुप असणे आवश्यक असते. ध्यानी,मनी,संसार करत असता नामस्मरण करणे जरुर आहे.

आता शेवटी मला असे सांगावेसे वाटते की, मानवाचे आयुष्य अती अल्प आहे

म्हणतात ना 'life is short and art is long' माझ्या मते, art ह्या शब्दाच्या ठिकाणी भक्ती हा शब्द योग्य ठरेल. आपल्याला ह्या जन्मी जेवढे श्रीसाईबाबांचे नामस्मरण व भक्ती करुन श्री बाबांकडे धाव घेता येईल तेवढी घ्यावी. त्यासाठी आपण सद् आचरण, सौजन्य, सत्संग व सत्याची कास कधीही न सोडणे,ह्या पायऱ्यांचा उपयोग करणे आवश्यक आहे. ह्या चार पायऱ्यांनी आपण आपली संसाररुपी इमारत उभारुन त्यात श्री साईबाबांची मध्यभागी स्थापना करावी. देह दुसऱ्याच्या उपयोगासाठी चंदनासारखा झिजवून त्या गंधाची उदबत्ती करावी. त्या उदबत्तीचा वास सर्वत्र दरवळेल. त्याचप्रमाणे खोटे बोलणे, दुसऱ्याला कळत न कळत दुखवणे इत्यादींचा त्याग करुन संसाररुपी इमारतीला कुलूप लावावे. म्हणजे देह खाली ठेवताना बाबा आत्म्याला सद्‌गती प्राप्त करुन देतील व त्याला त्यांच्या चरणाजवळ जागा देतील, यात संदेह नाही.

## 'साईगणेशाचे गाणे'

(चाल – 'ॐकार प्रधान रुप गणेशाचे')

ॐकार प्रधान रुप हे साईचे,
शिर्डी हे भक्तांचे तिर्थस्थान ॥धृ॥
कृपाळू तो साई, दयाळू तो साई,
प्रेमळ तो साई भक्तांचा मायबाप ॥१॥
ॐकार प्रधान रुप हे साईचे.
बालरुपी साई हा शिर्डीत अवतरला,
त्याच्या सर्व भक्तांना तारण्यास ॥२॥
ॐकार प्रधान रुप हे साईचे.
'सा' म्हणजे साक्षात, 'ई' म्हणजे ईश्वर,
असा हा परमेश्वर आहे तिन्ही लोकी ॥३॥
ॐकार प्रधान रुप हे साईचे,
साई माझा सद्‌गुरु, आहे कल्पतरु,
समर्थ आहे नेण्या माझी नौका पैलतीरु ॥४॥
ॐकार प्रधान रुप हे साईचे,

**– श्री. महेन्द जनार्दन गुरव**
नवनिर्माण चाळ कमिटी,
खो. नं. ३३, वाघरी वाडा,
दत्तमंदीर रोड, वाकोला ब्रिज,
सांताक्रुझ, मुंबई-४०० ०५४.

# साईनाम सोपे हे

– सौ. भावना दामोदर जेऊरकर
साईधाम, विष्णूनगर, डोंबिवली.

साई. स् +आई =साई. साई म्हणजेच आई. आई इतकाच खोल अर्थ भरला आहे साईनामात. आईसारखेच प्रेम, जिव्हाळा, आपुलकी सामावून राहिली आहे साईत.

साई म्हणजेच सा+ई. सा=साक्षात्, ई=ईश्वर. साई म्हणजे साक्षात् साईश्वर. ईश्वराजवळ असलेली अगाध, अनाकलनीय शक्ती साईत आहे.

साईनामात खूप मोठे सामर्थ्य आहे. साईनामाचा महिमा अजब आहे. साई शब्द उच्चारण्यास सुद्धा किती सोपा आहे. ओठांना, दातांना, जीभेला कोणालाही त्रास पडत नाही. श्वासोच्छवासातून सुद्धा सहजपणे हुंकारला जातो "सा... ई... ."

आपल्या भक्ताला नव्हे लेकराला अगदी सहजपणे आपले नामस्मरण करता यावे म्हणूनच बाबांनी "साई" हे नाम धारण केले. नामस्मरणाने भक्ताने आपल्याशी जवळीक गाठावी, साईबंधनाचे अतूट नाते भक्तात व आपल्यात निर्माण होऊन त्याचे कल्याण करावे, हाच बाबांचा उद्देश असावा. बाबांच्याच शब्दात सांगावयाचे तर...

"वरी एक सांगतो शामा । प्रेमे घेईल जो मन्नामा ।
तयाच्या मी सकल कामा । पुरवी प्रेमा वाढवी ।"

ओवी ११ – अध्याय ३.

साईनामात सर्वकाही आहे. साईनामाने पापाचे पर्वत फुटतात. साईनामाने जन्ममरणाचे फेरे थांबतात, देहाचे बंधन तुटले जाते, घाणेरड्या वासना समूळ नष्ट होतात, काळास सामोरे जाण्याचे धैर्य मिळते.

साईनाम घेण्यास कोणताही प्रयत्न करावा लागत नाही. अंतःकरण शुद्ध होते. जीभेचे भूषण नामउच्चार. हे भूषण साईनामाने अधिक उजळले जाते. साईनामात स्वार्थपरमार्थ दोन्ही पोसला जातो, असाध्य रोगापासून शरीराची मुक्तता होते. मनाची ओढ शुद्ध, पवित्र, निर्मळ अशा साईकडे आकर्षली जाते.

स्नान करुनच साईनाम घ्यावे असे नाही. सांसारिक कर्तव्ये, जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच, खाता-पिता, उठता-बसता एवढेच नाही तर प्रातःविधी उरकतानासुद्धा साईनाम उच्चारावे. अगदी झोपेतसुद्धा जीभेवर नाम असावे. "सा...ई.." साईनाम रोमारोमांतून, श्वासोच्छवासांतून, हाडांत इतके मुरले पाहिजे.

साईनामात एक प्रकारचा सुगंध आहे. सतत "साई" उच्चारल्याने आत्मशांती मिळते, मन समाधानी पावते. साईनामाचा सुगंध सतत हुंगावयास मिळतो. साईनामाची कास धरल्याने अहंकाराचा लोप होतो, सात्त्विकता प्राप्त होते. अमृतधारेचा वर्षाव होतो. शरीराची व मनाची पवित्रता वाढते.

साईनाम सतत घेतल्याने आपले रक्षण करण्यासाठी बाबा सदैव पाठीशी उभे

असतात. श्रद्धायुक्त नाम घेतल्याने आपला आध्यात्मिक उद्धार होतो.

शेवटी बाबांच्याच शब्दात सांगायचे तर–

"साई–साईति" नामस्मरण । करिल सकल कलिमल दहन
वाणी श्रवणगत पाप भंजन । एक लोटांगण घालितां ॥२०॥ ओवी, अध्याय ३.

असे हे सोपे साईनाम जर आपण निष्ठापूर्वक सतत जपत राहिले तर साई या कलियुगातील उत्पन्न होणाऱ्या वासना, अस्थिर परिस्थितीतून आपल्याला तारुन नेणार आहे. मग का बरे आपण वंचित व्हावे साईनामापासून?

म्हणूनच म्हणावेसे वाटते–

साईनाम सोपे हे । साईनाम सोपे हे...

# सदा मनी बाबा साई

सदा मनी बाबा साई
धुनी जळे द्वारकामाई
माझी श्रद्धा त्यांचे ठायी
चित्त माझे त्यांचे पायी

माझे बाबा तुम्ही साई
माझी आई द्वारकामाई
श्रद्धा-सबुरी माझ्या भगिनी
सदा लीन तुमच्या चरणी

जेव्हा जेव्हा होय कष्टी
मार्ग दावी कृपादृष्टी
केले आम्हा दुःखमुक्त
एक विभूतीने फक्त

नित्य लाभो कृपा दृष्टी
सदा वाढो माझी भक्ती
एक माझी ही प्रार्थना !
बाबा, माझी ही याचना !

– सौ. भारती म. मोघे
सैफी मंझील, ३ रा मजला,
खो. नं. २५, केनेडी ब्रीज,
मुंबई-४.

# भविष्यकाळ आणि साईसंदेश

**श्री. शं. ल. अवधूत**
जयंत भवन, रावंतपारा,
जगदलपूर, बस्तर (म. प्र.),
-४९४ ००१.

आजच्या समाजाचे, देशाचे आणि पर्यायाने जगाचे सुक्ष्मरितीने अवलोकन केल्यास विचारवंतांच्या दृष्टीला कोणते दृष्य दृष्टीगोचर होते? त्यांत प्रत्येक व्यक्तीचे स्थान कोठे आहे? तो कोणत्या दिशेला जात आहे? वास्तविकरित्या तो उत्कर्षाकडे जात आहे की अवनतीकडे? सकृद्दर्शनी उत्कर्षाची जी वाटचाल आपण करीत आहोत, त्यामुळे संपूर्ण मानवजात बरोखरच प्रगती करीत आहे किंवा अधोगतीचा खंदक आपल्याच हातूने आपण होवून खणत आहे? आज प्रत्येक व्यक्ती आणि पर्यायाने सपूळ मानवजातीचा भावी काळ असाच गूढ होत राहिला तर त्याची परिणती कोठे, केव्हा आणि कशा रितीने होणार, ह्याची कल्पना कोणाला तरी आहे का?

वर्तमानकाळाच्या परिस्थितीचे विहंगमालोचन करीत असताना, साहजिकपणे मनुष्याच्या भावपटलावर वरील प्रश्न चिन्हें गोंधळ घालू लागतात. आपण विचार करतो आणि आप-आपल्या सद्‌सद्‌विवेकबुद्धी नुसार निर्णय घेतो आणि म्हणूनच स्वतःला माणूस म्हणवून घेतो. आजची संपूर्ण परिस्थिती, समाजव्यवस्था आणि त्यांची अक्षुण्णता पूर्णतः विस्कळीत झालेली आहे. व्यक्ती-व्यक्तींचे उदाहरण घ्यावयाचे म्हणजे आपला शेजारी आपल्याला विचारीत नाही, त्याच्या सुखदुःखांची त्याला पर्वा नसते. मशिनगती प्रमाणे स्विच दाबला की, तो कामाला लागतो आणि त्यात तो इतका गुरफटून जातो की, शेजारील दारात काय घडून राहिले आहे, ह्याची जाणीव घ्यावयाला त्याला फुरसद नसते. शेजारी मग दुःखात असो किंवा मृतावस्थेत, मनुष्याच्या माणूसकीला जाग येत नसते. पाठीवर पाठ देवून आलेला भाऊ, परंतु तो वैरी ठरतो, मुलें जन्मदात्या आईबापांना तिरस्काराने पहातात तर जीव की प्राण ठरणारा घनिष्ठ मित्र शेवटी जीवाचा काळ ठरतो. स्वार्थ आणि केवळ स्वार्थ हा आजचा मूलमंत्र, मग ती स्वार्थसिद्धी करण्याकरिता वाटेल ते घृणीत काम करावयाला तो कोणाची दखल घेत नाही. सद्‌बुद्धी, भातृप्रेम, सद्‌भावना, विश्वबंधूत्व वगैरे गोष्टी आज भूतकाळात जमा झालेल्या आहेत. प्रश्न हा पुढे उभा राहतो की, हीच आजच्या मानवाची बौद्धिक परंपरा आहे का? आपल्या महान पूर्वजांनी, साधूसंतांनी, ऋषीमुनींनी आणि वेळोवेळी जन्म घेतलेल्या थोर व्यक्तींनी घालून दिलेल्या आणि त्यामुळे उत्कर्षाला पोहोचलेल्या भूतकाळातील जगाला आणि परंपरेला आज आपण कितपत प्रामाणिक आहोत? आजचे जगणे सर्व दृष्टींनी अस्थिर झालेले आहे—मग ते सामाजिक, आर्थिक, भौतिक, अध्यात्मिक किंवा पारमार्थिक दृष्ट्या असो, वैचारिक दृष्ट्या त्याचे विश्लेषण करणे, मनोविकारांच्या अथांग महासागरात गटांगळ्या खाण्यासारखे व्यर्थहीन झाले आहे.

आज आपल्या देशाची आणि जगाची परिस्थिती लक्षांत घेतली तर, मनुष्य आधुनिक प्रगतीच्या नावाखाली सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या-रसातळाला चालला आहे, अधोगतीच्या खोल दरीकडे झपाट्याने धावू लागला आहे आणि आपली मागील परंपरा आणि संस्कृती विसरुन सर्वनाशाच्या अप्राकृतीक साधनांकडे तो जावू लागला आहे,यांत शंकेला वाव उरत नाही. आज सर्व जग आधुनिक प्रगतीच्या नावाखाली एका भयंकर ज्वालामुखीच्या शिखरावर पोहचलेले आहे. त्या ज्वालामुखीचा उद्रेक होवून कोणत्या क्षणीं संपूर्ण मानवजात नष्ट होईल हे सांगणे जरी कठीण असले तरी असंभव नाही. अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार, लाचलूचपत, व्यभिचार, निर्दयता ह्या सर्व गोष्टी इतक्या सांधारण झालेल्या आहेत की,त्यांना दुर्गुणांच्या ऐवजी सद्‌गुणांची उपमा देणें जास्त श्रेयस्कर झालेले आहे. वाह रे प्रगती! आधुनिक मशीनयुगाच्या नावाखाली प्रगतीचा विपर्यास,हे म्हणणे सयुक्तीक ठरेल. आणि खरोखरच त्याला प्रगती म्हणावयाची असेल, तर त्या दयाधन, सर्वव्यापी परमेश्वराला हे सांगणे आवश्यक वाटेल की– देवा, तू लवकर धावून ये. तूच निर्माण केलेला मानव तू निर्माण केलेल्या सृष्टीला पायाखाली तुडवून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि तुझीच वसूंधरा मूक दृष्टीने नष्ट होवू पहात आहे. धाव, परमेश्वरा धांव. आत्मग्लानी, भय निराशा आणि विफलता समूळ मानवजातीला ग्रासू पहात आहे.

जागतिक परिस्थितीचे आजचे एकंदर भयंकर आणि विनाशकारी रूप पाहिल्यानंतर आजपर्यंत जन्म घेतलेल्या अवतारांची, महान आत्म्यांची आणि त्यांनी प्रतिपादीत केलेल्या संदेशाची अनुभूती होते. त्यांचे संदेश आज दिवास्वप्ने झालेली आहेत, परंतु त्यांचा मूळ उद्देश अजूनही मानवजातीला मार्गदर्शक ठरणारा आहे. तो मूळ संदेश अंमलात आणल्यास अजूनही परिस्थिती ताळ्यावर येण्यासारखी आहे. परस्परांबद्दल प्रेम, विश्वबंधूत्वाची कळकळ, सहिष्णूता,सर्व जग माझेच आहे, आपण सर्व एकाच आईची आणि पित्याची लेकरे आहोंत, प्रामाणिकपणा, सद्‌भावना, दयेची विश्वव्यापक दृष्टी आणि ब्रह्मांड शक्तींवर अढळ विश्वास ह्या वरील सर्व गोष्टींचा जर नव्याने उपयोग केला,तर आज असहणीय झालेले जग थोड्याश्या अवधीमध्ये पूर्वस्थितीला यावयाला वेळ लागणार नाही. ह्या संदर्भात आपल्या पूर्वजांनी, साईबाबांसारख्या संत महात्म्यांनी आणि महान व्यक्तींनी वेळोवेळी शांती, क्षमा, दया, प्रेमाची भावना आणि तत्सम उपयुक्त गोष्टी सांगितल्या आहेत.त्या त्या गोष्टींची आज आपल्याला अतिशय आवश्यकता आहे. आपल्या संपूर्ण हयातीत आपल्या आचरणाने आणि प्रत्यक्ष कृतीने सद्‌गुरु साईनाथ महाराजांनी जो अमूल्य शांतीसंदेश आपणां सर्वांप्रत पोहचविला आहे, तो निःसंशय वाखाणण्यासारखा आणि कृतीत आणण्यासारखा आहे. सद्‌भावना, परस्परांवर प्रेम, विश्वबंधूत्व हा महान आदर्श त्यांनी देणगी म्हणून वारसा हक्काने आपल्याला दिला आहे आणि त्या आदर्शाचे पालन करणे, त्याची जोपासना करणे आणि भावी पिढीला त्यानुसार प्रेरित करणे,हे आपणां सर्वांचे कर्तव्य ठरेल, आणि आजच्या जगाला वरील सर्व गोष्टी आत्मसात करणे अपरिहार्य आहे. वरील संदर्भात श्री सद्‌गुरु साईनाथांचे स्थान फार महत्वाचे

आहे आणि ते स्थान अढळ, अमर आणि सदैव प्रेरणादायक ठरेल, यात संशयाला जागा नाही.

आणि असे झाले नाही, तर जगाच्या अस्तित्वाकरितां एक फार मोठे प्रश्नचिन्ह डोळ्यांसमोर उभे राहिल आणि सरतेशेवटी त्या विश्वब्रह्मांडरुपी परमेश्वराला त्याच्या उक्तींची आठवण करुन देणे भाग पडेल की—

"परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥"

हीच सर्वव्यापी सद्गुरु साईनाथांना सप्रेम प्रार्थना.

******

## ॥ श्री साईनाम ॥

— श्री. मनोज शंकर बैंदे
सिडीओ क्वार्टर, सी-६/११,
मेरी कॉलनी, दिंडोरी रोड,
नाशिक-४२२ ००४.

आज सारी मानवजात विसाव्या शतकाच्या अखेरच्या चरणात उभी आहे. विज्ञानाच्या सहाय्याने लावलेल्या विविध शोधांनी मानव कधी नव्हत्या एवढ्या भौतीक सुखांचा उपभोग घेत आहे. सारी भौतीक सुखे माणसापुढे हात जोडून उभी आहेत. तरीही माणूस भयभीत आहे. अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे आपला कुठल्या क्षणी घात करतील, या भीतीने माणूस ग्रस्त आहे. ज्या विज्ञानाच्या सहाय्याने आपलं जीवन संघर्षविहीन बनवायला हवं होतं, तेच माणसाने आणखी कलहयुक्त बनवलं आहे. अशांती हा आजच्या माणसाचा स्थायीभाव बनला आहे.

राष्ट्राराष्ट्रांत कलह आहेत. धर्माधर्मात कलह आहेत. हिंसाचाराचा आगडोंब तर सर्वत्र एखाद्या भक्षक राक्षसारखा उसळला आहे. प्रत्येक व्यक्तीचे मग ती गरीब असो, श्रीमंत असो, जीवन कलहयुक्त आहे. माणूस माणुसकीला पारखा झाला आहे. पैसा हा माणसाच्या ठायी देव ठरला आहे. पैसा हे एकच मूल्य त्याच्या जीवनात उरलं आहे. भौतीक सुखांसाठी पैसा, पैशासाठी फसवणूक हा या युगाचा धर्म ठरला आहे. सधर्माची जागा अधर्माने घेतली आहे. इतकंच नाही तर अधर्मालाच सधर्माचा दर्जा देण्याइतकी माणसाची अधोगती झाली आहे. प्रत्येकजण अंधारात चाचपडतो आहे.

या अंधारात चाचपडणाऱ्या माणसाला प्रकाशाचा मार्ग दाखविणारा एकही दीपस्तंभ आज उरलेला नाही कां?—

—आहे. आहे. तो पहा अजूनही एक दीप चाचपडणाऱ्या माणसाला प्रकाश दाखविण्याचे काम शिरडीत निरंतर करतो आहे. त्या दीपाचे नाव आहे, श्री साईबाबा.

दीन-दुबळ्यांचा तारणहार, अनाथांचा नाथ, करुणेचा सागर, साईनाथ शिरडी ग्रामी विसावला आहे. देहरुपाने नसले तरी आत्मरुपाने दुःखितांचे अश्रू पुसण्याचे काम बाबा अजूनही करताहेत. श्रद्धा व सबूरीचा मंत्र देऊन शाश्वत सुखाचा मार्ग दाखवीत आहेत.

जाती-पाती, धर्म, प्रांत, देश यांची बंधनं तोडून माणसं शिरडीला येताहेत. बाबांच्या समाधीवर डोकं टेकून कृतकृत्य होताहेत, चिंतामुक्त होताहेत. रित्या हाताने आलेले जीवन चैतन्याने भरुन घेऊन परत जाताहेत. जो साईला शरण आला, त्याचे दुःख संपले म्हणून समजा. श्री सद्‌गुरु साईबाबांनीच म्हणून ठेवलंय,

"शिरडीस ज्याचे लागतील पाय
टळतील अपाय सर्व त्याचे
माझ्या समाधीची पायरी जो चढेल
दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥"

जो साईला शरण गेला, त्याचा उद्धार झाला. त्रेतायुगात जसा प्रभू श्रीराम, द्वापरयुगात जसा श्रीकृष्ण तसा कलीयुगात श्री साईनाथ। शरण आलेल्याचा भार वाहाणे, हे तर देवाचे ब्रीद.

तुमचा मी भार वाहीन सर्वथा ।
नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥

हे त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री साईचे आश्वासन आहे. आपल्या भक्तांना त्या परब्रह्माचे वचन मिथ्या कसे ठरणार?

अध्यात्मिक शांती मिळविण्याचा राजमार्ग आहे, साईनाम घेणे! जिथे साईनामाचा गजर आहे, तिथे प्रत्यक्ष श्री साईबाबांचा वास आहे. जिथे साईनामाचा उद्‌घोष आहे, तिथे प्रत्यक्ष लक्ष्मीचा संचार आहे. दैन्य, दारिद्र्य, दुःख आणि काम-क्रोधादि षड्‌रिपूंना तिथे थारा नाही. तिथे आहे, संजीवन सुख आणि समाधान — साईकृपेचे अधिष्ठान.

साईनाम घ्यावे आणि कर्म करीत रहावे. मनुष्याचा देह निमित्तमात्र. आपण फक्त साईंच्या हातातलं साधन व्हावं. साईच कर्ता-करविता. जे कर्म करावं, ते साईला अर्पण करावं. कर्माचं जसं फळ मिळेल, ते साईचा प्रसाद म्हणून आनंदाने ग्रहण करावं. जीवन धन्य होते. हाच निष्काम कर्मयोग. आजच्या कलहयुक्त, अशांत वातावरणात आंतरिक शांती आणि समाधान मिळविण्यासाठी श्री साईबाबा प्रेरीत प्रकाशकिरण जीवन उजळविणारा.

"बोलो बोलो साईराम
बोलो बोलो साईशाम ॥"

"अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद श्री समर्थ सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय"

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

— साईनंद

शनिवार, दिनांक २०-१-१९१२

सकाळी मी नित्याप्रमाणे वेळेवरच उठलो. दिवस उगवण्यापूर्वीच मी प्रार्थना पण आटोपली आणि येथल्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या कार्याला सुरुवात केली. दिवस चांगला उगवला आणि तो मावळलाही. मी बापूसाहेब जोग, उपासनी व राममारुती यांचे बरोबर परमामृताचे वाचन केले. भीष्म आणि माझे चिरंजीव बळवंत यांना बरे नव्हते. आम्ही साईमहाराजांना बाहेर जातांना आणि ते पुन्हा परततांना पाहिले. ते आज खुषीत गप्पा मारीत होते. इतक्यात एका जवळच्याच खेड्यातले एक जहागिरदार आले, पण साईमहाराजांनी त्यांना आपल्या जवळपास फिरकू-येऊ दिले नाही. त्यांची तितकी भाव भक्तीही नव्हती. अनेकांनी त्यांच्या भेटीच्या बाबतीत मध्यस्थी केली खरी पण ती व्यर्थ गेली. आप्पा कोते पण आले आणि त्यांनी जहागिरदारांसाठी नित्याची पूजा करण्याची परवानगी मागितली पण ती बाबांनी नाकारली. शेवटी साईंनी त्यांना मशिदीत येऊन धुनीजवळच्या एका खांबाची पुजा करण्याची परवानगी दिली. पण आपण त्यांना 'उदी' देणार नाही म्हणून सांगितले. मला वाटले आज साईबाबा रागावले असावेत, पण खरोखरीच तसे नव्हते. आमची मध्यान्ह आरती नित्याप्रमाणे पार पडली. श्री साईबाबांनी बापूसाहेब जोगांना हुकूम केला की, सर्व आरत्या प्रत्येक दिवशी वेळच्या वेळीच व्हायला हव्यात. त्यांच्या या हुकूमवजा निर्णयाचे भाकीत मी दोन दिवसांपूर्वी जेव्हा मेघा गेला तेव्हाच केले होते. दुपारच्या भोजनानंतर मी काही वेळ वर्तमानपत्रे वाचत बसलो. दिक्षितांचे धाकटे बंधू (जे सध्या भुजचे दिवाण पदावर आहेत) जे खांडवा येथे प्रॅक्टिस करीत होते ते आज सकाळीच आले आणि त्यांचे मुंबईचे एजंट दुपारी आले. दिक्षितांच्या बंधूनी दिक्षितांचे पूर्वीच्याच कामकाजाचे बाबतीत मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. शेवटी त्यांनी स्वतः श्री साईबाबांकडे दाद फिर्याद केली पण बाबांनी ती बाब सर्वस्वी दिक्षितांवरच सोपविली. बापूसाहेब जोगांकडेही आज चार पाहुणे आले. त्यांच्या पत्नीच्या बहिणीचे यजमान जे सांगलीला मुख्य खजिनदार अधिकारी म्हणून होते ते आपल्या सर्व कुटुंबियांना घेऊन आले. दिल्ली दरबारचा सोहळा आटोपून ते परतत असताना वाटेत येथे आले. त्यांच्या पत्नीने बापूसाहेब जोगांच्या पत्नीना आपल्या बरोबर नेण्याची इच्छा प्रदर्शित केली पण साईमहाराजांनी त्यांना नेण्यास परवानगी दिली नाही. आम्ही साईमहाराजांना ते बाहेर येऊन सायंकाळच्या रपेटीला पडताना पाहिले. ते आल्यानंतर वाड्यातील आरती व शेजारती झाली. दिक्षितांनी नेहमीप्रमाणे रामायणाचे वाचन केले. भीष्मांची प्रकृती ठीक नव्हती आणि माझा मुलगा बळवंताची प्रकृती आणखीनच बिघडली म्हणून भजनाचा कार्यक्रम झाला नाही. आज येथे मोरेश्वर जनार्दन पाठारे सपत्नीक आले. त्यांना पक्षघाताचा जबरदस्त झटका

आल्यामुळे त्यांच्या शरीराची बरीचशी हानी झाली होती. वसईचे जोशी येथे आले आणि येताना त्यांनी आपल्या बरोबर येथे गाईल्या जाणाऱ्या प्रार्थनेच्या काही छापील प्रती बरोबर आणल्या.

रविवार, ता. २१-१-१९१२

मी उठलो आणि काकड आरतीस हजर राहिलो. बाळा शिंपी शिवाय त्यावेळी तिथे सर्व नेहमीचीच मंडळी होती. आरतीनंतर साईबाबानी नित्याप्रमाणे छुप्या शत्रूवरुन कठोर शब्द प्रहार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या बोलण्यात आप्पा कोते, तेलीन, वामन तात्या इ.इ. मंडळींची नावे दिली. बापूसाहेब जोग, उपासनी व राममारुती यांचे बरोबर मी परमामृत वाचले. बापूसाहेब जोगांचे सांगलीहून आलेले पाहुणे आमच्या या वर्गास हजर होते. त्यांचे नाव आहे लिमये. आम्ही साईबाबांना बाहेर जातांना आणि नंतर ते पुन्हा मशिदीत परततांना पाहिले. आम्ही मशिदीत असताना माधवराव देशपांडे नगरहून परत आले होते. त्यांच्याबरोबर दादासाहेब करंदीकर आणि बडोद्याचे एक सज्जन होते. करंदीकरांना पाहून मला अतिशय आश्चर्य वाटले. एका कज्जा-खटल्यासाठी ते नगरला आले होते हे कळले. तिथे माधवराव देशपांडेची गाठभेट झाल्यावर त्यांनी साईमहाराजाचे दर्शन घेण्याचे ठरविले. आम्ही गप्पा मारीत बसलो. दुपारी सुमारे ४-३०चे सुमारास ते नगरला परतले. लिमयेसुद्धा गेले. प्रथमतः त्यांना जाण्याची परवानगीच नाकारली होती पण नंतर साईबाबांनी ती दिली. सदाशिवराव दिक्षितांनी सुद्धा जाण्याची इच्छा व्यक्त केली खरी परंतु त्यांनी उद्या सकाळी आपल्या कुटुंबासमवेत, मुलांबरोबर आणि राम मारुती बरोबर निघावे असे सांगण्यात आले. आम्ही साई बाबांना सायकाळच्या रपेटीस बाहेर पडताना पाहिले. सायंकाळच्या आरतीनंतर वाड्यात दिक्षितांनी रामायण वाचनाचा कार्यक्रम केला.

## श्री. शूरसेन जयकर यांचे देहावसान

विलेपारले येथील प्रख्यात वयोवृद्ध साईभक्त व श्री. शामराव जयकर यांच्या आठ चिरंजीवांपैकी क्रमांक दोनचे चिरंजीव श्री. शूरसेन शामराव जयकर यांचे मंगळवार दि. ११-८-८७ रोजी मध्यरात्री देहावसान झाले. निधन समयी त्यांचे वय ८८ वर्षांचे होते. श्री. शूरसेन यांनी आपल्या वडिला समवेत श्री. बाबांचे अनेकदा दर्शन घेतले होते. त्यांचे वडील श्री. शामराव यांनी प्रत्यक्ष साईंना विनंती करुन त्यांना समोर बसवून त्यांचे हुबेहूब तैलचित्र १९१७ साली आपल्या कुचल्याने रेखाटले होते. तेच चित्र आज शिरडी येथील द्वारकामाईत धुनीमातेसमोर कठड्यालगत चांदीच्या फ्रेममध्ये सुशोभित आहे. श्री. शूरसेन यांच्या पश्चात् त्यांच्या ८४ वर्षांच्या वयोवृद्ध पत्नी कमलाबाई या आहेत.

श्री साईमृतात्म्यास चिरशांती व सदगती देवो.

# येणे सोपे टिकणे कठीण

**श्री. अनिल केशवराव रसाळ**
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई-४०० ०३७.

वर्षाचे सर्व दिवस व सर्व वेळ शिर्डीत येणाऱ्यांची तोबा गर्दी असते, गर्दी कमी होत नाही, उलट वाढते. परंतु अशा गर्दीतील बरेचसे भक्त तिथे नियमीत येताना प्रथम काही वर्षे दिसतात, नंतर येत नाहीत. नवी माणसं येताना व वाढत्या प्रमाणावर येताना दिसतात. परंतु थोडी वर्ष येऊन नंतर श्रींची शाळा सोडणारे भक्त जास्त! पास झाल्याचा दाखला घेऊन शाळा सोडलेले कमी, फारच कमी!!

वाढती गर्दी व नवनवीन व दूरदूरच्या ठिकाणांहून येणाऱ्यांची संख्या वाढते. याचा अर्थ श्रीबाबा आम जनतेत वाढत्या प्रमाणात रुजू लागले असा निश्चित होतो. पण काही खेपांनंतर भक्त शिर्डीला येण्याचे सोडतात, हेही तितकेच खरे आहे. याचे कारण किंवा याची कारणं काय असावीत? श्रीबाबांजवळ टिकून रहाण्यात भक्त कुठं कमी पडतात, की त्यांना टिकवून ठेवण्यात श्रीबाबाच कमी पडतात? बरं! नवीन दर्शनार्थींची वाढ व जुन्यांची गळती हे फक्त श्रींच्याबाबत कां घडतं?

सर्वप्रथम आपण श्रीबाबा कुठं कमी पडतात का याचाच विचार करु या. अगदी प्रामाणिकपणे व निःपक्षपाती विचार केल्यास असं आढळून येईल की, श्री जर खरोखरच कमी पडत असते तर नवी व जुनी, अशी दोन्ही भक्तांची गर्दी कमी होत गेलेली दिसली असती. पण इथे नवीन भक्त गर्दी करताना दिसतात. याचाच अर्थ नवीन भक्तांना त्यांच्या लीलांचे, त्यांच्या नवीन घडलेल्या चमत्कारांच्या ऐकिव किंवा प्रत्यक्ष अनुभवानंतर दर्शन घ्यावेसे वाटते. ही दर्शनाची ओढ त्यांना खेचून आणते. त्यांच्या पहिल्या दर्शनात केलेल्या याचनांना श्रींनी उत्तम प्रतिसाद दिलेला असतो. त्यामुळे त्यांना पुन्हा दर्शनाला यावसं वाटणं स्वाभाविक आहे. त्यांचे अनुभव ते मोठ्या प्रमाणावर इतरांना सांगतात. व अशा प्रकारे भक्तांच्या गर्दीचा गुणाकार होतो. या वरुन असं अनुमान काढता येईल की, नव भक्तांच्याबाबत श्रीबाबा कमी पडत नाहीत.

वरील विवेचनाचा दुसरा अर्थ असा निघतो का की, मग श्रीबाबा जुन्या भक्तांना नाविन्यपूर्ण अनुभव देऊ शकत नाहीत. म्हणजेच ते अशा सामर्थ्यात कमी पडतात की काय?

मला वाटतं या प्रश्नाचा आपण वेगळ्या प्रकारें विचार केला तर उत्तर सापडेल.

श्रीसाईबाबा हे समर्थ सद्‌गुरु आहेत. आपल्या शाळेत त्यांनी वेगवेगळ्या इयत्तांचे वर्ग केले आहेत. प्रवेश करताना शाळेत फक्त काही वय पूर्ण झाल्याची अट असते. तशीच अट श्रींच्या शाळेची आहे. किमान पूर्वसुकृत असल्याशिवाय शिरडीचे दर्शन घडत नाही. एकदा दर्शनाला गेलेला भक्त काहीतरी प्रचिती व अनुभव घेऊन जातो.

नंतरही त्याला जावेसे वाटते, ते या अनुभवापोटी.

शाळेत जसा १लीचा अभ्यास पूर्ण झाल्यावर मगच शिक्षक त्या विद्यार्थ्याला दुसरीत, १ली पास झाल्यानंतर घालतो. तसाच प्रकार श्रींच्याबाबत आहे. भक्त काही वर्ष आल्यानंतर श्री त्यांची कसोटी व परीक्षा घेतात. या परीक्षा व कसोट्या त्या भक्तांच्या हितासाठीच ते घेतात.

आपणा सर्वांनाच माहीत आहे की, १लीच्या वर्गातील मुलांना घरचा अभ्यास थोडासा किंवा ज़वळजवळ नसतोच. पण क्रमाक्रमाने वरच्या वर्गाला अभ्यासक्रम, शिस्त व घरचा अभ्यास वाढत्या प्रमाणावर असतो. त्याप्रमाणेच भक्त जसे जुने होतात तशी त्यांची कसोटीपण तितकीच कठीण व दीर्घ काळ असते. आणि नेमके इथेच भक्त सर्व बाजूंनी कमी पडतात. काही देणारा देव सर्वांनाच आवडतो. पण काही कमी करणारा बहुतेकांना नको असतो. उदाहरणार्थ म्हाळसापतींसारखा भक्त आयुष्यभर विपन्नावस्थेत श्रींच्या हयातीत नित्य सेवेत राहिला, पण श्रींनी त्याला पैशाने श्रीमंत केले नाही. उलट येणाऱ्या भक्तांपैकी हंसराज या श्रीमंत भक्ताने देऊ केलेली मोठी रक्कम घेऊ दिली नाही. पण या प्रसंगानंतरही म्हाळसापती श्रींच्या सेवेतच राहिले. कां? याचं खरं कारण श्रींनी त्याला अवीट असं वैराग्य व दृढ विवेक दिला व जो अतिशय अशी अलभ्य गोष्ट शुभदिवशी विनायास मृत्यू व सद्‌गतीपण दिली. ज्यांना धन व इतर मायिक गोष्टी दिल्या, ते बिचारे या गोष्टींच्या आसक्तीमुळे जन्ममरण परंपरेत अडकले गेले. याला कोण सूज्ञ खरी कृपा म्हणेल? परंतु अशी कृपा सहसा कोणालाही नको असते.

वरील गोष्टींमुळे हे निश्चित होते की, बहुतेक भक्तांना मायिक गोष्टी अतिशय प्रिय आहेत. त्या जेव्हा मिळेनाशा होतात किंवा त्या मिळण्यास उशीर होतो किंवा अजिबात मिळत नाहीत. तेव्हा भक्त त्याचा विपरीत अर्थ लावतो.

दुसरे असे की, "घरचा अभ्यास" न केल्यास शिक्षक जसे शिक्षा देतात तसंच श्रीबाबासुद्धा करतात. शिक्षा करणारा शिक्षक प्रिय होत नाही. त्याप्रमाणे बाबांच्या-बाबत होते व भक्त येण्याचे थांबतात.

तिसरे कारण असे की, नेहमीच अभ्यास न करणाऱ्यांना जशी कडक शिक्षा केली जाते, त्याचप्रमाणे नेहमीच श्रींनी दिलेली आचारसंहिता न पाळणाऱ्यां बाबत पण श्री कडक शिक्षा करतात. त्याचं खरं कारण न शोधता व त्याचं खरं मूल्यमापन न करता भक्त अज्ञानापोटी श्रींना दोष देतात व स्वतःत सुधारणा न करता सरळ शिर्डीची वारी कायमची सोडतात. जन्मोजन्मींच्या पूर्व सुकृतांनी मिळालेल्या गुरुचरणांचा आश्रय केवळ क्षणिक व मायिक गोष्टी न मिळाल्याने किंवा स्वतःची अपात्रता न जाणल्याने कायमचा सोडतात.

**श्रीसाईसच्चरित्राचे सुरुवातीचे अध्याय जवळ जवळ २० व्या अध्यायापर्यंतचे** प्राथमिक उपदेश, आचार, विचार, संहिता, साधना यांना वाहिलेले आहेत. पण २१व्या अध्यायात श्री. विनायक ठाकुरांना श्रींनी स्पष्टपणे सांगितले आहे की, "नाणेघाट

रेड्यावर बसून चढण्याइतकं येथील चालणं सोपं नाही. जे तू विचार सागरात वाचलंस ते प्रत्यक्ष आचरावं लागेल. इथं हाडांचं पाणी करावं लागेल."

स्वतः श्रींनी ३२व्या अध्यायात आपण सद्गुरुच्या केलेल्या सेवेचा त्रोटक पण अतिशय छान उल्लेख केला आहे. "तहानभूक हरपून मी माझ्या गुरुचे ध्यान केले" असं ते म्हणाले. बरेचसे भक्त त्यांच्याइतकी उत्कटता व तन्मयता आणू शकणार नाहीत. पण अशा सद्गुरुने घातलेली किमान आचार संहिता त्यांनी कमीत कमी अतिशय प्रांजळपणे आचरणात का आणू नये? आणि काही काळ त्यांच्या शाळेत घालवल्यानंतर बिगरीत किंवा पहिलीतच बसण्याचा का आग्रह करावा? त्यांच्याकडून सद्गति व अंतिम व कायमचे कल्याण का करुन घेऊ नये? वर्ग किंवा शाळाच का सोडवा?

तात्पर्य, या मार्गात सद्गुरुंच्या दर्शनास येणे सोपं आहे पण त्यांच्याबरोबर टिकणं कठीण. यामुळेच शिर्डीत नेहमी गर्दी असूनही जुन्या भक्तांची गळती चालू असते व ते टिकत नाहीत. कारण शिर्डीला येणं सोपं पण इथं टिकणं फार कठीण आहे.

●●●●●●

# साई तव कृपेने फुलू दे मम जीवन

साई असे माझे ध्यान तोचि माझे गान
हृदयी तुझीच मूर्ती व्यापिले माझे जीवन
प्रसाद तुझा लाभता तृप्त झाले मन
साई तव कृपेने फुलू दे मम जीवन

साईनाथ हेच आम्हां भक्तांचे भूषण
साईकृपेचा अगाध महिमा उद्धरले जन
गाऊ या एक दिलाने साईचे गुणगान
साई तव कृपेने फुलू दे मम जीवन

तुझी उदी प्राशन करता झालो मी पावन
साई माझा देव मागतो मी संत कृपादान
साई माझा प्राण साई पायी राहीन लीन
साई तव कृपेने फुलू दे मम जीवन

— **श्री. रमाकांत पंडित,**
प्रभास्मृती, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा, मुं.–१९.

# पू. नानासाहेब ठोसर ऊर्फ श्री नारायणाश्रम स्वामी

**– श्री. व्ही. के. शेंडे**
२/७९, नेहरु नगर,
कुर्ला (पूर्व),
मुंबई-४०० ०२४.

श्री साईलीला मासिकाच्या जुलै १९८६च्या अंकात श्री. नानासाहेब ठोसर यांचा उल्लेख आहे. हे नानासाहेब ठोसर फार मोठे संत होते. साईबाबांच्या दर्शनाने व सहवासाने काही व्यक्ती फार मोठ्या योग्यतेला पोहोचल्या. त्यांपैकी एक म्हणजेच नारायणस्वामी होते. यांची माहीती फारशी कुठे प्रसिद्ध नाही. ते शेवटी शेवटी वाई क्षेत्रांत राहिले. परम पूजनीय अण्णासाहेब घोलप व 'वाई' येथील काही मंडळींनी त्यांच्या संबंधी माहीती दिली. त्यामुळे श्रीयुत नानासाहेब ठोसर यांच्याबद्दल छोटा लेख लिहू शकलो.

श्रीमत परमहंस परिव्राजक श्री. नारायणाश्रम स्वामी यांचे मूळ नाव श्री. नारायण महादेव ठोसर असे होते. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे ते भाचे. त्यांचा जन्म– ई.स. १८७० साली झाला. लहानपणापासून त्यांच्यावर उत्तम संस्कार झाले होते.

शिक्षण पूर्ण झाल्यावर ते जकात खात्यात नोकरीला लागले, त्या खात्यात अधिकारी झाले व १९२५ मध्ये सेवा निवृत्त झाले. त्यांचा आवाज फार गोड होता. अभंग छान म्हणत. केवळ गोड अभंग न म्हणता, स्वतः उत्तम अभंग रचना करीत. अभंग सोपे व अर्थपूर्ण असत. शब्दांचा गोडवा लक्षात येण्याइतका गोड होता. स्वतःला ते 'नानू' म्हणजे 'लहान' म्हणवीत. 'गृहस्थाश्रम' त्यांनी उत्तम प्रकारे केला होता. त्यांची निर्णय शक्ती फार चांगली होती. अडचण आली, अडून राहायचे नाही. पर्यायी विचार करुन काम करीत असत. त्याची एक झलक येथे उद्धृत करतो.

'वाई' क्षेत्री 'दशहरा-उत्सव' प्रत्येक घाटावर होतो व आळीपाळीने प्रत्येक व्यक्तिला काही खाद्य पदार्थ 'प्रसादा'साठी आणावा लागतो. नानासाहेबांना 'पोहे' आणायला सांगितले होते. लढाईचा काळ. 'भाताचे पोहे' मिळेनात. नानांनी 'तांबडे जोंधळे' म्हणजे 'मिलो' रेशन कार्डावर घेतला होता. तो नीट करुन धुतला, वाळवला व रात्री भिजत घालून दुसऱ्या दिवशी त्याच्या लाह्या बनविल्या व त्या लाह्यांचा चिवडा प्रसाद म्हणून वाटला. पण 'नकार' दिला नाही.

नोकरीत असतानाच त्यांनी सपत्निक भारत यात्रा केली होती. त्यांच्या पत्नीचे नाव– 'सखूताई.' संन्यास घेऊनसुद्धा ते सपत्निक रहात. विचार आधुनिक व बुद्धिनिष्ट होते. ते देहयष्टिने उंचपुरे होते व भव्य दिव्य दिसत असत. काषाय वस्त्रे धारण केलेली व हाती दंड कमंडलू धारण केलेली ही व्यक्ती पहाताच लोक नतमस्तक होत.

नानासाहेब ठोसर साईबाबांच्याकडे १९१० मध्ये गेले व त्यांच्या विचारांवर-आचारांवर पू. साई महाराजांचा फार परिणाम झाला होता. सन १९२५ साली ते सेवा निवृत्त झाल्यावर त्यांनी १९३१ पर्यंत सर्व भारताची यात्रा केली व महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्री वास केला. शेवटी १९३१ मध्ये ते काशीला गेले. तिथे त्यांचा सहवास श्रीमत् परमहंस परिव्राजक वेदाश्रम स्वामी (दंडी-स्वामी) यांच्याबरोबर झाला. हे दंडी स्वामी फार विद्वान होते. आचार उत्तम होता. ह्या दंडीस्वामींनी नानासाहेब ठोसर यांना संन्यास दीक्षा दिली. चतुर्थाश्रमांतील त्यांचे नाव 'नारायणाश्रम स्वामी' असे होते. त्यांचे मुखी नेहमी 'नारायण-नारायण' हा शब्द असे. संन्यास घेतल्यावर त्यांचा मुक्काम पार्ल्याला त्यांनीच बांधलेल्या 'श्री साईनाथ हनुमान' ह्या मंदिरात होता. परंतु ते 'पार्ले' सोडून 'वाई'ला आले.

नानासाहेबांनी पैसा शिल्लक ठेवला होता. नानासाहेब हे अपत्यहीन होते. ते व त्यांची पत्नी 'वाई' येथे राहायला आले तेव्हा. त्यांच्या जवळील द्रव्य त्यांनी आपल्या मित्राजवळ 'ठेव' म्हणून ठेवले होते. मित्र 'वारकरी' होता. नाना व त्यांचे मित्र पंढरीची वारी एकत्र करीत. ह्या त्यांच्या मित्राने त्यांची 'ठेव' (द्रव्य) बुडवले. त्यामुळे नानांचे व त्यांच्या पत्नीचे हाल झाले. कारण वृद्धत्व, अपंगत्व आणि मित्राने द्रव्य बुडवलेले. ह्या कारणास्तव शेवटी शेवटी त्यांना फार त्रास झाला.

## कामगिरी

नानांची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे गोपाळनाथ चरित्राचे संपादन – पुनर्लेखन. १९५३ साली 'शाहीर – हैबती' लिखित– 'श्री-नाथ लीला-विलास' हा ग्रंथ त्यांनी 'शुद्ध-प्रत' पद्धतीने लिहून संपादन करून मुद्रणाकरिता सिद्ध केला.

परम पूजनीय 'गोपाल नाथांचे चरित्र' ओवीबद्ध ३२ अध्यायात लिहिलेले चरित्र गोपालनाथांचे बंधू 'शामानंद' ह्यांनी लिहिलेले होते. त्या चरित्राचे संशोधन पुनर्लेखन नानासाहेबांनी केले. वयाच्या ८५व्या वर्षीसुद्धा ते कार्यरत होते. माघ वद्य नवमी शके १८७७ – २३-१२-१९५५ ह्या दिवशी त्यांचे साई-चरणी मिलन झाले.

## तत्वज्ञान

प्रत्येक माणूस– सच्चिदानंद पदी पोहचू शकेल. अहंकार घातक आहे. प्रेम करा, मनापासून प्रेम करा. म्हणजे दृष्टि बदलेल. हृदयातला नारायण जागा होईल. प्रेम, सेवा, भक्ती शरणागती ह्यांचे पालन करा व 'सच्चिदानंद'' पद प्राप्त करा. नारायण-नारायण.

पूजनीय नानासाहेब ठोसर यांची 'श्री-स्वामीसमर्थ' (अक्कलकोट), 'श्री गोपालनाथ'– (त्रिपुटी) व 'साईमहाराज' या तिघांवर फार भक्ती होती. ते नेहमी साई-महाराज पांडुरंग। शिर्डी माझे पंढरपूर, असे म्हणत. त्यांचे दोनतीन अभंग येथे देत आहे.

(१)

कर्मी कर्मठ गुंतले । वर्णावीण भ्रमावले ।
कर्माभिमान बहू खोटा । परमार्था आणी तोटा ।
कर्माचे रहस्य जाणावे । चित्त शुद्धिते पावावे ।
नानू-म्हणे व्हावे निष्काम । हेचि जाणे वर्मकर्म ।

(२)

क्षेत्र-तीर्थ यात्रा सफळ । भक्तिचि झुळझूळ आंत वाहे ।
यात्रा पर्यटणी होतो संत संग ।
वागावे असंग जनामाजी ।
कुटील जनांची करावी उपेक्षां ।
सांप्रदाय दीक्षा मोडू नये ।
नानू म्हणे भावे संतासी वंदावे ।
आणिक बरवे दुजे नाही ॥

(३)

देवाजीने कृपा केली । चित्रवृत्ति स्थिरावली
अवघे विकार मावळले । अंतःकरण शुद्ध झाले
स्वप्न सुबुद्धि विराली । अखंड जागृति राहिली
नानु म्हणे मुक्त झालो । आतां ब्रह्मरुप ठेलो

(४)

बरवे आजि झाले संतांचे दर्शन ।
वृत्तीशी वळण सेवा धर्मी ।
संतदर्शने होईल सफळ ।
अंतःकरण निर्मळ बोधे होय ।
संत आशीर्वाद पावा हो सकळ ।
राजी घननीळ होय तेणे ।
नानूदास म्हणे संतांचा महिमा ।
सांगता – तो आम्हां शक्ति कैची ।

पू. नानासाहेब एका परीने मौनी होते. स्वतःचा विचार करीत नसत. स्वतःबद्दल बोलत नसत. त्यांच्याबद्दलची माहिती फार उपलब्ध नाही.

परम पूजनीय अण्णासाहेब घोलप व वाई येथील सर्वश्री गांधी व पू. टांकसाळे गुरुजी ह्यांचेमुळे सदर माहिती मिळाली. वरील अभंग पू. अण्णासाहेब घोलप यांच्या 'श्री नारायणाश्रम-स्मृती' ह्या आता दुर्मिळ पुस्तिकेमधून घेतले आहेत.



# "ज्याच्या पाठी श्रीसाई, जगी त्यासी भय नाही!"

– श्री. नंदू लक्ष्मण पाटील
महेश कृपा चाळ,
लोकमान्य नगर,
ठाणा-४०० ६०६ (प.).

दयावंत श्रीसाईबाबांची कृपा झाली तर असाध्य गोष्टी सहज साध्य होतात. फक्त श्रद्धा आणि सबूरी हवी.

माझी बहीण सौ. ज्योस्ना हिस १९८१ साली पहिला मुलगा झाला. घरात वंशाचा दिवा लागला म्हणून सर्वांना आनंद झाला. मुलगा ७-८ महिन्याचा असताना त्याला एके दिवशी अचानक फीट आली. मुठी आवळून तो डोळे फिरवू लागला. घरात सर्वत्र गोंधळ माजला. डॉक्टरोपचार झाले. २-३ दिवस सुखाचे गेले आणि पुन्हा मुलाला फीट आली. सर्व काही उपाय झाले.

शेवटी एक दिवस बहीण मुलाला घेऊन माहेरी (अलिबाग येथील घरी) आली. तेथे माझे आई-वडील रहातात. ४ दिवस चांगले गेले. परंतु कर्माचे निदान कोणीच करु शकत नाही, तसेच झाले. तेथेही मुलाला अचानक ताप भरला. आणि क्षणार्धात मुलाने डोळे फिरवले. घरात रडारड झाली. मुलाला स्पेशालीस्ट डॉक्टरांकडे नेण्यात आले. अखेर डॉक्टरांनी सांगितले की, "याला २-३ वर्षाचा होईपर्यंत अशीच फीट येण्याची शक्यता दिसते!" हे ऐकून सर्वांना आभाळ कोसळल्यासारखे झाले. बहीण-मेहुणे चिंतातूर झाले. फार मोठा प्रसंग त्यांच्यावर ओढवला. मला इकडे झालेला प्रकार समजला तेव्हा, मलाही काहीच सुचेनासे झाले. आता फक्त श्री साईबाबांचाच आधार होता. श्री साईबाबा यातून काहीतरी मार्ग काढतील याची पूर्ण खात्री होती. मी बाबांना कळवळून प्रार्थना केली की, "बाबा भाच्याला लवकर बरे वाटू द्या! मी त्याला तुमच्या चरणांशी शिर्डीला घेऊन येईन" आणि, मी भाच्याला पहाण्याकरिता घरी गेलो. माझ्याजवळ शिर्डीहून आणलेली बाबांची उदी होती. त्यातील चिमूटभर त्याच्या तोंडात टाकून, थोडी कपाळाला लावली; व बहिणीला सांगितले की, "माई! आता याला डॉक्टरांकडे नेऊ नकोस फक्त बाबांवर विश्वास ठेव आणि निश्चित रहा. त्याची काळजी घेणारे साई समर्थ आहेत!"

आणि आश्चर्याची गोष्ट की, त्यावेळपासून मुलाला आलेली फिट गेली ती आजतागायत आली नाही. आता भाचा (चि. महेंद्र) शाळेत जाऊ लागला आहे. काय ती बाबांची किमया! डॉक्टरांचे ते वाक्य, हजारो रुपयांचा चुराडा, पण बाबांच्या उदीने जो चमत्कार घडवून आणला तो मी कधीही विसरु शकणार नाही.

# शिरडी वृत्त
# जुलै १९८७

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सव आल्याने "श्रीं"च्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. तसेच पंढरपूर यात्रेस जाणारे व येणारे अशा साईभक्तांची खूपच गर्दी झाली होती. हा उत्सव शुक्रवार दि. १०.७.१९८७ ते रविवार दि. १२.७.१९८७ पर्यन्त ३ दिवस समाधि मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. नामांकित कलाकार श्री. वेणूकांत नार्वेकर, जयवंत कुलकर्णी, मुंबई वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. ह.भ.प. शरदबुवा नेरुलकर, नांदेड यांची कीर्तने झाली.

**गुरुपौर्णिमा उत्सव, सन १९८७**

**प्रारंभ दिन :- दि. १०.७.८७,शुक्रवार** रोजी पहाटे ५.०० वाजता मंदिर उघडले. ५.१५ वा. काकडआरती झाली. सकाळी ६.०० वा. "श्रीं"च्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारमाईत गेली. त्याठिकाणी "श्री साई सत्चरित" अध्याय वाचनास सुरुवात झाली.

या वर्षापासून ग्रंथ पारायण, अध्याय वाचनाची नवीन पद्धत सुरु करण्यात आली. विश्वस्तांसाठी पहिले ५ अध्याय ठेवण्यात आले व राहिलेल्या ४८ अध्यायांसाठी आदल्या दिवशी दि. ९.७.८७ रोजी दुपारी ४ ते ८ यावेळेत अध्याय वाचन करु इच्छिणाऱ्या भक्तांची नावे नोंदवण्यात आली व सोडत पद्धतीने भक्तांच्या समक्ष रात्रौ ८ ते ९ या वेळेत ४८ भाग्यवान साईभक्तांना निवडण्यात आले. त्यांची नावे मंदिर प्रमुख श्री. वि.वि. बागवे यांनी जाहीर केली व त्याप्रमाणे त्या भक्तांना अध्याय वाचनाचे अनुक्रमांक देण्यात आले.

श्रींचे स्नान, अभिषेक पूजा, आरती झाल्यानंतर दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. शरदबुवा नेरलकर, नांदेड यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. ७ वा. धुपारती झाली. रात्रौ ७.३० ते ९ पर्यंत श्री. वेणूकांत नार्वेकर, मुंबई (हे प्रसिद्ध गायक पंडीत जितेंद्र अभिषेकी, मुंबई यांचे शिष्य गायक आहेत.) यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९.१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. पालखीस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्रौ ११.०० वा. पालखीची मिरवणूक गावातून परत आल्यानंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस–** दि. ११.७.८७, शनिवार रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे, साईभक्तांची गर्दी बरीच होती. पहाटे ५.१५ वा. काकडआरती सुरु झाली. सकाळी अध्याय वाचन पूर्ण झाल्यानंतर श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगल स्नान झाले. नित्याच्या कार्यक्रमां व्यतिरिक्त दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. शरदबुवा नेरलकर, नांदेड यांचे कीर्तन झाले. त्यानंतर धुपारती

झाली. रात्रौ ९.१५ वा श्रींच्या रथाची मिरवणूक समाधि मंदिरातून वाद्यांच्या गजरात निघाली. सनई, चौघडा, टाळ, मृदुंग, गायन, भजन, बँडपथक, रहाता, चौघडा-नगारा, कोपरगाव, पुणे येथील मयूर बँड व न्यू गंधर्व बँडपथक, डफ, ढोल, अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानच्या गुरुस्थान नजीक आला. त्याठिकाणी संस्थान कर्मचारी, साईभक्त ग्रामस्थ यांनी गारुड, भारुड कार्यक्रम केले. गारुड कार्यक्रमात सर्वश्री तुकाराम परदेशी, एकनाथ पाटील कोते, सुरेश भोसले, दिनकर बापूराव साळवे, किसनराव हणमंता पा. गोंदकर, दिलीप मच्छिंद्र माळी, रामदास नामदेव जाधव यांनी भाग घेतला. पुण्याचे सिने कलाकार श्री. रघुनाथ सांडभोर यांनी नकला व भारुड कार्यक्रम केले. त्यानंतर रात्रौ ११.४५ वा. रथ मिरवणूक समाधी मंदिरात आली. मिरवणुकीतील भक्त कलाकारांच्या कार्यक्रमात सहभागी झाले. सकाळी ६ वाजेपर्यंत कलाकारांच्या हजेऱ्या (जागर) झाल्या. साईभक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते.

**उत्सव सांगता दिन:– रविवार, दि. १२.७.८७** रोजी सकाळी ६ वा. "श्रीं"चे मंगलस्नान झाले. ७.३० ते ८.३० पर्यंत गुरुस्थान येथे रुद्राभिषेक झाला. १०.३० ते १२.३० पर्यंत ह.भ.प. शरदबुवा नेरलकर, नांदेड यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर मध्यान्ह आरती झाली व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला व उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी "श्री"च्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे:–

**कीर्तन :–**

१) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी (गवई), कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) ह.भ.प. शरदबुवा नारायणराव नेरलकर, नांदेड.

३) ह.भ.प. शुक्लेश्वर महाराज कदम, मोर्वीस (कोपरगाव).

**प्रवचन :–**

१) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, शिरडी.

**भजन, गायन, वादन इ. :–**

१) श्री. वेणुकांत नार्वेकर, मुंबई २) श्री. आप्पासाहेब सामंत, मुंबई ३) श्री. प्रकाश सुकटणकर, मुंबई ४) श्री. आनंद जोशी, मुंबई ५) श्री. द्वारकानाथ मालवणकर, मुंबई ६) श्री. अनिल केशवराव रसाळ, मुंबई ७) श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई ८) श्री. गणपत बाळाजी जाधव, शिर्डी ९) कु. योगीता काशीनाथ रसाळ, मुंबई १०) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई ११) श्री. सुधीर संभाजीराव सावंत, मुंबई १२) श्री. शेखर नटवर विसपुते, शिरडी १३) श्री. कचरु तरटे, नांदेड १४) श्री. अनिल उत्तरवार, नांदेड १५) श्री. दौलतभाई, मुंबई १६) श्री. ज्ञानोबा जगन्नाथ नगरकर, पुणे १७) श्री. नाना बिडवे, पुणे १८) श्री. तुकाराम दैठणकर, पुणे १९) श्री. अशोक दैठणकर, पुणे २०) श्री. प्रमोद रं. मेढी, शिरडी २१) श्री. अनंत पांचाळ, मुंबई २२) श्री. चंद्रकांत

बाईत, मुंबई २३) कु. कुमुदिना बाईत, मुंबई २४) श्री. उदय बाईत, मुंबई २५) कु. वनीता गवंस, मुंबई २६) श्री. अनिल बाईत, मुंबई २७) श्री. कमलेश पांचाळ, मुंबई २८) कु. सुनीता चव्हाण, मुंबई २९) श्री. मनोहर घडसे, मुंबई ३०) श्री. विजय मालवणकर, मुंबई ३१) श्री. कीसनदा दुगर, मुंबई ३२) श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे ३३) कु. निर्मला देसाई, मुंबई ३४) कु. शुभदा देसाई, मुंबई ३५) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई ३६) श्री. मनोहर कदम, मुंबई ३७) श्री. अशोक कदम, मुंबई ३८) श्री. अरविंद म्हात्रे, मुंबई ३९) श्री. अविनाश कदम, मुंबई ४०) श्री. यशवंत पांडुरंग गवाणकर, मुंबई ४१) श्री. नाना विद्वांस, मुंबई ४२) श्री. मंगेश तांबडे, मुंबई ४३) श्री. नितीन टिलू, मुंबई ४४) श्री. रत्नाकर घुमटे, मुंबई ४५) श्री. राजाभाऊ कुलकर्णी, मुंबई ४६) श्री. रामदास जाधव, शिरडी ४७) श्री. शाहीर सुरेश डी. धुमाळ, पुणे ४८) श्री. सूर्यकांत वाव्हळ, पुणे ४९) श्री. प्रकाश बरडे ५०) श्री. गजेंद्र कामतेकर, मुंबई ५१) श्री. दिलीप सावंत, पुणे ५२) श्री. प्रदीप पवार, पुणे ५३) श्री. चंद्रकांत मीश्री, पुणे ५४) श्री. रवी पाणवलकर, पुणे ५५) श्री. सुभाष पारेवाल, विजापूर ५६) श्री. प्रकाश खैरमोडे, पुणे ५७) सौ. रेखा महावी, भिंगार ५८) श्री. धनंजय उईके, वर्धा ५९) श्री. रामचंद्र दिवेकर, श्रीरामपूर ६०) सौ. विमला नागेश्वरराव, विजयवाडा ६१) सौ. सीमा दिवेकर, श्रीरामपूर ६२) श्री. आप्पा सामंत, दादर ६३) श्री. प्रभुदास बाबा, जामगांव ६४) श्री. भास्कर वराडकर, बोरीवली ६५) श्री. भागराव राघुजी गुरुजी, कोपरगांव ६६) श्री. अशोक दळवी, श्रीरामपूर ६७) श्री. दामुअण्णा दळवी, श्रीरामपूर ६८) श्री. नामदेव गणपत शिंदे, श्रीरामपूर ६९) श्री. पांडुबुवा गुरव, श्रीरामपूर ७०) श्री. ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, शिर्डी ७१) श्री. बालमभाई पापाभाई सय्यद, राहाता ७२) सौ. विमलताई शिर्के, जळगांव ७३) श्री. नाथा बन्सी सोनवणे, शिरुर ७४) श्री. उमाकांत एकबोटे, शिरुर ७५) श्री. त्र्यंबक परशराम शिरोडे, शिरुर ७६) श्री. सदाशिव जाधव गुरुजी, पुणे ७७) श्री. दत्तात्रय कर्डीले, वैजापूर ७८) श्री. अशोक गाडेकर, वैजापूर ७९) श्री. सोन्याबापू डांगे, वैजापूर ८०) श्री. विठ्ठल दत्तात्रय घाग, वैजापूर ८१) श्री. राजाराम देशपांडे, पुणे ८२) श्री. अशोक आढाव, पुणे ८३) श्री. दिगंबर भातोडे, रहाता ८४) श्रीमती प्रमीला पैठणकर, कोपरगाव ८५) श्री. रघुवीर शांताराम मिराणे, शिरडी ८६) श्री. श्रीधर शंकर साठे, दौंड ८७) श्री. विजय वाकचौरे, पुणे ८८) कु. अजय देवीदास वाकचौरे, पुणे ८९) श्री. पुंजाबा दवंगे, शिरडी ९०) श्री. नामदेव बडवे, मळेगांव ९१) श्री. शेखर नवाब उमरपटेल, अस्तगांव ९२) श्री. नथुलाल लक्ष्मीनारायण पाराशर, वरळी ९३) श्री. अशोक शिरतुरे, भिंगार ९४) श्री. छबू उल्लीटे, हनुमंतगाव ९५) श्री. शिवाजी बापूजी घोलप, हनुमंतगांव ९६) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, सावळी विहीर ९७) श्री. वसंत गोपीनाथ काळोखे, शिरडी ९८) श्री. फाकटकर गुरुजी, मंगरुळ ९९) श्री. राजेंद्र फाकटकर, मंगरुळ १००) श्री. मधुकर उपासनी, दहेगांव १०१) सौ. लिलावती गुजराथी, शिरडी १०२) श्री. नंदकिशोर पुरोहीत, शिरडी १०३) श्री. विश्वास जोशी, खेड १०४) श्री. मुरलीधर वाडेकर, सातारा १०५) श्री. नारायण दगडू राहुरकर, पुणे १०६) श्री. जयंत नगरकर, पुणे

१०७) श्री. सखाराम राधुजी गुरव, कोपरगाव १०८) श्री. रामकृष्ण स. गुरव, कोपरगांव १०९) श्री. गंगाधर जाधव, पुणे ११०) श्री. नानासाहेब गुरव, शिरडी. १११) श्री. अशोक नाना कोराटे ११२) श्री. शांताराम राऊत, पुणे ११३) श्री. मधुकर सोनवणे, बडोदा ११४) श्री. राजकुमार रास्तूर, संगमनेर ११५) श्री. सुक्लेश्वर द. मोरे, कल्याण ११६) श्री. प्रसाद हुंडे, मुंबई ११७) श्री. राजेंद्र गं जाधव, पुणे ११८) श्री. माधव तुपे, पुणे ११९) श्री. गोविंद कदम, पुणे १२०) श्री. रंगनाथ शंकर, संगमनेर १२१) श्री. राजेंद्र राऊत, नगर १२२) श्री. सुनील राऊत, नगर १२३) श्री. देवेंद्र देवळणकर, नगर १२४) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी १२५) श्री. शशिकांत दळवी, मुंबई १२६) श्री. बारकु मांडवकर, मुंबई १२७) श्री. सतीश नागेश राव, मुंबई १२८) श्री. सुरेश आंजर्लेकर, मुंबई १२९) श्री. विलास महाडीक, मुंबई १३०) श्री. नरेश नाईक, मुंबई १३१) श्री. मयुर ब्रास बँड, पुणे १३२) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी १३३) श्री. चतुर्धनशेठ नागरे, शिरडी १३४) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी १३५) श्री. शांताराम मिराणेसर, शिर्डी १३६) श्री. बारावकर काका, शिरडी १३७) श्री. माणिक साळीं, शिरडी १३८) श्री. पवार गॅस वेल्डींग, शिरडी १३९) श्री. नंदु चव्हाण, मुंबई १४०) श्री. न्यु गंधर्व ब्रास बँड, पुणे १४१) श्री. ह.भ.प. शरदबुवा नेरलकर, नांदेड १४२) श्री. विठ्ठल सीताराम गोसावी, नांदेड १४३) श्री. दासराव लक्ष्मणराव काटे, नांदेड १४४) श्री. रमेश सहानी, नांदेड १४५) श्री. एस.एम. चव्हाण, मुंबई १४६) श्री. जी.एस. माळीवाडकर, शिरडी १४७) श्री. एच.ए. पटेल, शिरडी १४८) श्री. बी.व्ही. काळपांडे, शिरडी १४९) श्री. मोहनराव आंबोडकर, शिरडी १५०) श्री. एस.एच. वाघ, शिरडी १५१) श्री. एस.एस. कोटस्थाने, शिरडी १५२) श्री. पंडीतराव यादव, शिरडी १५३) श्री. बाबळे पाटील, शिरडी १५४) श्री. डी.वाय. गिरमे, शिरडी १५५) श्री. डॉ. गुरावे, शिरडी १५६) श्री. व्ही. रामदास, मुंबई १५७) श्री. ओंकार विलास परळकर, मुंबई १५८) श्री. विवेक मुळे, मुंबई १५९) श्री. प्रदिप रासने, नगर १६०) श्री. सदाशिव बिडवे, नगर १६१) श्री. पी. पालम स्वामी, जहिराबाद १६२) श्री. शिवराम बाबूराव बिडवे १६३) सौ. अनुराधा पिंपळगांवकर, पुणे १६४) श्री. गणेश चुडी, आगाशी १६५) श्री. सय्यद बाबू ढोलीबाजावाला, राहता १६६) श्री. डॉ. नागेश्वर राव विप्राळा, विजयवाडा १६७) श्री. राममंदिर भजन मंडळ, वेसावा १६८) कु. अपर्णा मिश्रा, कानपूर १६९) कु. वंदना मिश्रा १७०) सौ. रेशमा शिवकुमार जोशी, मुंबई १७१) श्री. गंगाधर गयाजीराव गायकवाड, बडोदा १७२) श्री. दत्तात्रय गंगाधर गायकवाड १७३) श्री. मुकुंद गंगाधर गायकवाड १७४) श्री. सुधीर गंगाधर गायकवाड १७५) श्री. सुनील गंगाधर गायकवाड १७६) श्री. वसंत काशीनाथ कांडणेकर १७७) श्री. वसंत गोपीनाथ काळोखे १७८) श्री. सुभाष पागड, झाबुआ १७९) इंद्रायणी महिला मंडळ, तुळजा माता महिला मंडळ, आकुर्डी, पुणे १८०) श्री. अरुण सोमाणी, संगमनेर.

**हवापाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस कमी प्रमाणात पडला.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19 Licence To Post Without
Prepayment at Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १ | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७"-x२२" | २-८० | ५-५० |
| २. | -,,- | १४" X२०" | १-५० | ५-५० |
| ३. | -,,- | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" x२०" | ०-८० | ५-५० |
| ५. | मूर्ती फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ६. | पालखी फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ७. | ऑफसेट फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :-**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

**मुद्रक :** श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१.

**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर, मुंबई-४०० ०१४.